चरित्र ९४ सन १९८२

ले. म. रा. चिटणीस

पु. नांव श्रीमान छत्रपती संभाजी

व थोरले राजाराम महाराज.

( श्री प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स, ठाणे )

१८

श्रीमान छत्रपती संभाजी महाराज व थोरले राजाराम महाराज

चरित्र

ग्रं. नं. ८०

कैलासवासी
[illegible]राम निळकंठ पटवर्धन
यांचे स्मरणार्थ,
मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणें,
या संस्थेस नजर.
ग. स. पटवर्धन
९-१०-२२

[ काव्येतिहास-संग्रह. ]

६

मल्हार रामराव चिटणीस विरचित,

# श्रीमंत छत्रपति संभाजी महाराज

व

# थोरले राजाराम महाराज

# यांचीं चरित्रें.

हीं

अनेक प्रतींवरून शुद्ध करून अर्थनिर्णायक व अवांतर

माहितीच्या विपुल टीपांसह

**काव्येतिहास-संग्रहकर्ते**

यांनीं

प्रकाशित केलीं.

कुठारें जरी तोडिलें हो वटाला । तरी नोम येई फुटे पान त्याला ॥
सरारे पुन्हा तो जटांचा पसारा । तयें व्यापि आधीं तलप्रांत सारा ॥
जटांचे पहा वृक्ष होती अचाट । पुरा व्यापिती देश भोंतीं अफाट ॥

इ० स० १८८९.

श्री

महाराष्ट्राच्या भाषेचा व इतिहासाचा आस्थापूर्वक

अभ्यास करूं इच्छिणाऱ्या सज्जनांस

हा ग्रंथ

प्रेमपूर्वक अर्पण करितों.

ग्रंथप्रकाशक.

# श्रीमन्महाराज

# संभाजीराजे यांचें चरित्र.

श्रीमन्महाराज राजश्री **संभाजी महाराज दिलेलखाना** कडून आल्यावर **शिवाजी महाराज** यांणीं बोध करून **पन्हाळ्यावर** रहावें असा निश्चय करून तेथें ठेविलें[2]. किल्याचा बंदोबस्त व प्रांताचा सरकारी कारभारी ठेवून राखून, त्यास खाजगी खर्च पाहिजे तशी नेमणूक करून देऊन, तो खर्च तालुकदार यांणीं दरमहा द्यावा. त्यास कारभारी **विठ्ठल त्रिंबक महाडकर देशपांडे, बाजी[3] मुरार** यांचे नातू, हे खासनिशी करून देऊन **पन्हाळ्यावर महाराजांचे** आज्ञे प्रमाणें वर्तणूक करून राहिले असतां **शिवाजी महाराज** यांणीं अवतार समाप्त करून **कैलासवास** केला. ते समयीं मातोश्री **सोयराबाईसाहेब** यांणीं मुत्सद्दी हातीं घेऊन **मोरोपंत प्रधान** व **निळोपंत अमात्य** व **अण्णाजी दत्तो सचिव** हे प्रमुख व **हंबीरराव मोहिते सेनापती** व **रूपाजी भोंसले, आनंदराव निंबाळकर, काटकर** व **माहाडीक, गुजर** व **पालकर, शिर्के** वगैरे सरदार असे सर्वांनीं विचार केला कीं, **महाराज** यांणीं आज्ञा केली कीं, **संभाजी महाराज** यांची उग्र प्रकृति यांस

---

१. हें चरित्र मल्हार रामराव चिटनवीस निसबत छत्रपति सरकार सातारा यांणीं श्री० छ० दुसरे शाहूराजे ऊर्फ आबा साहेब यांच्या आज्ञेवरून मागील कागदपत्र वगैरे पाहून स० इ० १८१०।११ या साली रचिलें. ह्याची अस्सल प्रत हल्लींचे आबा साहेब यांचे दफ्तरीं असल्याचें कळतें. त्या चरित्राच्या २ नकला आह्मांपाशीं आहेत. त्याच्या आणखी प्रती मिळाल्यास आह्मांकडे पाठविण्याची तजवीज आमचे मित्र करतील. साताराची मूळप्रत मिळण्याविषयीं आह्मी फारच खटपट केली परंतु ती अद्याप सफळ झाली नाहीं. चिटणिसांचें वृत्त मागाहून देऊं.

२. संभाजीच्या दुर्वृत्ताबद्दल त्याला शिवाजीनें पन्हाळे किल्यावर नजर कैदेंत ठेविलें होतें. 'शिवछत्रपतीचें' चरित्र पृ० ७७ पहा.

३. 'माजी मुरार' पाठांतर. बाजी मुरार महाडकर, ज्याने पुरंदरीं असतां दिलेलखानास दाद दिली नाहीं. ह्याचें नांव बाजी मुरार कीं मुरार बाजी हें स्पष्ट कळत नाहीं. ग्रां० ड० पहिलें नांव देतो व कृष्णाजी अनंत सभासद दुसरें देतो. असो ह्या देशपांड्याचें शौर्य कसें होतें व तो कसा पडला तें 'शि० छ० च०'•पृ० ३५पहा. ह्मणजे ध्यानीं येईल.

४. खासनिशी=खासगी कडील कारभारी [?]

५. चैत्र शुद्ध १५ रविवार, दोनप्रहर शके १६०२ रौद्रनामसंवत्सरे.

६. शिवाजीला चार स्त्रिया होत्या. पैकीं सईबाई, निंबाळकरांची कन्या, ही स० इ० १६५९ मध्यें वारली; हिचा पुत्र संभाजी दुसरी सोयराबाई, शिर्के यांची कन्या; हिचा पुत्र राजाराम. तिसरी मोहित्यांची कन्या हिचें नांव पुतळाबाई असें होतें. चवथी विषयीं माहिती मिळत नाहीं. पुतळाबाई ही सती गेली. सोयराबाईबद्दल हकीकत पुढें येईलच.

राज्य आवरणार नाहीं. सर्वांचा नाश करून आपणही नाश पावतील. **औरंगजेब** महाशत्रु **भागानगर**[७] प्रांता समीप येऊन पावला. त्याचा पराभव यांचे वस्तु[८] होणार नाहीं. **राजाराम** सुबुद्ध व यांचे हातें राज्यरक्षण होऊन सर्वांचें कल्याण घडेल.[९] त्या अर्थी **संभाजीराजे** यांस आहेत तसेच बंदोबस्त करवून, कैदेंत राखून, **राजाराम** यांसच घेऊन राज्य रक्षून कारभार चालवावा. **औरंगजेब** आला हें विघ्न सर्वांनीं निवारण करून, **महाराजांनीं** राज्य साधिलें हें रक्षून, नंतर वडील राज्याचे अधिकारी सिंहासनाचे तेच आहेत, त्यांचे स्वाधीन राज्य करावें. मग पुढें रक्षोत अथवा न रक्षोत. परंतु ही मसलत प्राप्त आहे. ती सिद्धीस गेलियावांचून त्यांसच आणून करूं जातां अनर्थ घडून राज्य जाईल. यास्तव कृत निश्चय करून **राजाराम** घेऊन राज्य चालवावेंसें केलें. आणि किल्याचा बंदोबस्त हवालदार **कान्होजी भांडवलकर**[१०] होते व सर्नोबत **शहाजी भोरवे**[११] यांज पासून करविलें कीं, किल्ले दरवाजे **रायगड** याचे महामूर[१२] राखावे, दिंड्या मात्र उघड्या राखाव्या. **मालसांवत** वगैरे **मावळे** लोक यांचे सरदार दहा हजार लोक सुद्धां **पांचवड** येथें ठेवावे. त्याणीं तेथें रहावें. **सेनापति** यांणीं फौज घेऊन **कोल्हापुरीं** जाण्यास **कऱ्हाडप्रांतीं** जावें. **रायगडाहून प्रतापगडास** कांहीं सरदार पाठविले. त्यांणीं **गोळे, पारठे** वगैरे **मावळे** लोक जमाव[१३] करून **सातान्यास** जावें असें करविलें. आणि **बाळाजी आवजी**[१४] यास बोलावणें करविलें. जे, सरदार व **पन्हाळा** येथें बंदोबस्ताचीं पत्रें लिहावीं, ह्मणून सांगितलें. त्यांणीं उत्तर केलें कीं, "आह्मी दरखदार[१५] राजाचे. खावंद वडील **संभाजी** महाराज असतां अशीं पत्रें आह्मी लिहिणार नाहीं. तेव्हां तुह्मांस हा आग्रह करण्याचें कारण नाहीं." "तुमचे हातचें पत्र नसल्यास लोकांस[१६] पत्राचा विश्वास पडणार नाहीं. यास्तव तुह्माकडे दरख, त्या अर्थें बरीं वाईट पत्रें तुह्मीं लिहावीं, हें तुह्मांस पात्र. लिहून द्यावीं."

---

७. 'भागानरानजीक' पा०. भागानगर म० दक्षिण हैदराबाद. औरंगजेब ह्यावेळीं भागानगरीं आल्याबद्दल दाखला इंग्रजी ऐतिहासिक पुस्तकांत-नाहीं.

८ यांचे वस्तु = यांच्या हस्तें, यांच्या मार्फत.

९. हें भाकित 'शि० छ०च०' पृ० ८७। ८८ येथें पहा.

१०. 'भांडाळकर' असें ही कदाचित् होईल.

११. 'शहाजी भोंसले' पाठांतर.

१२. महामूर राखावे = बंद ठेवावे.

१३. 'जमाकरून' पाठांतर.

१४. हे चिटणिसांचे मूळपुरुष.

१५. दरखदार = वरील प्रतीचा वंशपरंपरेनें चालणारा अधिकार तो 'दरख'. असा अधिकार आहे ज्यास असा अधिकारी. चिटणीस, वांकनीस वगैरे.

१६. कोणास' पा०

ते समयीं निरूपाय व साहेबांची इतराजी दिसोन आली, त्यावरून, "मी लिहीत नाहीं. मूल **आवजी** आहे, त्यास स्वाधीन करितों. पाहिजे तसें करवा." ह्मणोन उठोन गेले. **आवजी**बोवा पासून पत्रें लिहून रवाना केलीं. **पन्हाळ्यास** हवालदार **वहिरजीनाईक इंगळे** होते व **सोमाजी नाईक वंकी** व **हिरोजी फरजंद** यांस **खंडोजीनाइक** जासुदांचा नाईक व **गणोजी कावळा** यांजबरोबर पत्रें पाठविलीं व **जनार्दनपंत सुमंत करविरीं** होते यांसही पाठविलीं कीं, "येथील प्रसंग येक प्रकारचा आहे. **संभाजी महाराज** यांस कैद करून बहुत सावधपणें असावें. **महाराजांचें** वर्तमान * फुटूं देऊं नये." **संभाजी महाराज** यांसही पत्र त्यांजपाशींच दिलें. परंतु बंदोबस्त जहाल्यावर द्यावें असें सांगितलें. त्यांनीं जाऊन त्या अन्वयें पत्र देऊन कांहीं बंदोबस्त जाहाला.

इकडे **महाराजांची** क्रिया **सावाँजी**[17] **भोंसले** यांजपासून करवून समाप्त केली. वर्तमान **राजास** समजूं नये असें केलें असतां येवढी थोरली गोष्ट दबून कशी रहाती ? कर्णोपकर्णीं राजे यांस श्रुत जाहालें. याजवरून जासूद आले त्यांस बोलावून आणून त्यांस दवावून विचारिलें कीं, "**आबासाहेब** कसे आहेत तें खरें सांगा, नाहीं तर पारिपत्य करीन." ते समयीं जासुदांस धीर निवेनां[18]. जाहलें वर्तमान सविस्तर सांगितलें. कांहीं श्रमी होऊन लागलेच किल्यावर हवालदार व सबनीस बोलावून आणून त्यांज देखत पुन्हां जासुदांस विचारिलें. तेव्हां पुन्हा त्यांणीं तसेंच सांगितलें वर[19] तत्काळींच त्यांस बेड्या घालून कैद केलें. **हिरोजी फरजंद** कांहीं कारखाना जवाहीर घेऊन पळून **चिपळुणाकडे** गेला. **सोमाजी नाईक वंकी** व **सूर्याजिकिंक मावळा** सरदार या उभयतांस मारून टाकिलें. **रायगडीं** फितूर जाहला. **सोयराबाईसाहेब** व अष्ट प्रधान यांणीं राजकारण करून **राजारामास** राज्य देणार. आह्मांस कैद करणार. त्या अर्थी पक्केपणीं याचा विचार करावा. ह्मणून किल्याचा पक्का बंदोबस्त करून कांहीं दिवस राहिले.

इकडे **राजाराम** यास विचार करून सर्वांनीं शके १६०२ वैशाख वद्य ३ तृतियेस मंचकारूढ करून, कारभार चालवून, किल्ले पन्हाळ्याचा बंदोबस्त राहिला नाहीं. **संभाजी राजे** यांणीं केला. परंतु फौज व

---

* शिवाजीच्या मृत्यूचें.

१७ 'संभाजी' पाठभेद. भा० इ० ह्मणतात 'शहाजी'

१८. 'न निघे' पाठांतर

१९ 'सांगितलें त्या काळींच' पा०

खालीं **जनार्दनपंत** आहेतच. बंदोबस्त राखावा असें करविलें. ते समयीं **राजे** यांणीं फौजेंतील सर्व सरदार वगैरे लोक यांजकडे राजकारणें व आपले नांवें पत्र पाठवून कांहीं कांहीं आपले लक्षांत आणिले. व कांहीं लोकही जमा केले. **संभाजीराजे** वडील, राज्याचे अधिकारी, यांजमुळें बहुतेक लोक लक्ष राखून राजकारणें राखून करते जाले. **सेनापंतीस** ही पत्रें पाठवून त्यांचें राजकारण केलें. आपले पक्षें चालावे असें केलें आणि **हिरोजी फरजंद चिपलुणास** कांहीं खजीना व जवाहीर घेऊन गेला [होता] त्यास धरून आणून, खजीना घेऊन, त्याचें पारिपत्य केलें. कैद केला. आणि कांहीं लोक जमाव करून, **कोल्हापुरीं** घेऊन, **जनार्दनपंत सुमंत** यांस कैद करून बेडी घातली. हें वर्तमान **रायगडीं** कळल्यावर तेथेंही लोकांचा धर सुटला. **महाराज महाडास** तावडतोब येऊन **पांचवडास** आले. तेथें सरदार लोक होते. त्यांणींही मुजरे करून तसेच बरोबर किल्यावर चढले. तों **सरनोबत** व नाईकवाडी[21] **येसजीकंक** हे **महाराजांचे** लक्षांत आले होते व किल्यावरील लोक कित्येक फितले होते. दिंडी लाविली नाहीं. **महाराज** दिंडीनेंच किल्यावर गेले. **कंक** व **सरनोबत** भेटले आणि **कान्होजी भांडवलकर** हवलदार संदेरेस[22] होते त्यांस आधीं कैद केले. आणि **मोरोपंत प्रधान** व **अंणाजी सचिव** यांचे घरीं चौक्या पाठवून कैद केलें. **माल सांवत** वगैरे लोक फितव्यांत होते. ते दहा पंधरा असामी तेच समयीं मारिले. **पिलाजी शिर्के** दहा पंधरा हजार **मावळे** लोक जमाकरून सर्व किल्याचे खबरदारीस नेमून चौक्या उठवून, त्यांचे लोक बसवून किल्याचा बंदोबस्त केला. **सोमाजीनाईक बंकी** त्याचा लेक होता. त्यास येकनाकीवरून[23] लोटून दिला व मारला. व **बापुजी भाऊराव** व **सूर्याजी काळे** यांचीं डोसकीं मारलीं. **कान्होजी भांडवलकर** याजवरच कृपाळू होऊन हवालदारी त्यासच सांगितली. **येसाजी फरजंद** व **सोमाजी फरजंद** यांस किल्यावरील चौकी पाहाऱ्याचें काम सांगितलें. **मोरोपंत प्रधान** व **सचिव** यांचीं घरें लुटून बेड्या घातल्या. **राजारामसाहेब** यांस नजरबंद केलें. वाड्यांत आले. **सोयराबाईसाहेब** यांजपाशीं जाऊन बाईसाहेब कोठें आहेत

२० हंबीरराव मोहिते हा त्यावेळीं कऱ्हाडास बंदोबस्ता करितां फौजे सुद्धां होता. जनार्दनपंत सुमंत यांस कैद केल्यावर हा संभाजीस मिळाला.

२१ नाईकवाडी = हशम लोकांचा मुख्य 'यत्तु नाईकवाडी तु पत्तिनायकनाम तत्' राजव्यवहार कोश:

२२ "सदर:सभा" रा० व्य० को०

२३. 'येकनाकी (?) कडेलोट करण्याचें शिखर. आमचे महाडकर मित्र या स्थानाचा शोध लावितील तर सहज लागेल

२४. 'घेरा उठवून' पाठांतर.

ह्मणून बहुत क्रोधें करून विचारिलें. ते समयीं जवळील बायका सर्व भयें करून निघाल्या. "तुह्मीं राज्य लोभास्तव महाराजांस विषप्रयोग करून मारिलें," असा आरोप-शब्द बोलून, कोनाडा भिंतीस करून, त्यांत **सोयराबाईसाहेबांस** चिणोन दुग्ध मात्र घालीत जावें [असें] सांगून, "आतां पुत्रास घेऊन राज्य करावें" असें बोलिले. त्या नंतर तीन दिवस ती तशीच होती. तिसरे दिवशीं प्राण गेला. हें कळल्यावर दहन केलें. क्रिया करविली. याप्रमाणें उग्रपणें मातबर सरदार दोनशें पर्यंत माणूस शासन करून उग्र दंड केला. प्रळय केला. शके मजकुरीं आषाढ शुद्ध २ स किल्यावर येऊन या प्रमाणें बंदोबस्त केला. आणि तमाम किल्यांस आणि सुभ्यांस पत्रें पाठविलीं. आणि श्रावण शुद्ध ९ स मंचकारूढ झाले. सुमुहुर्तें करून पुढें राज्याभिषेकें सिंहासनारूढ व्हावें ह्मणून या प्रमाणें केलें[25]. आणि विविक्तपणें [?] बसून कारभार करणें व खजीने, कारखाने, जवाहीर यांची चौकशी करून मोजदादी केल्या. घोडीं, पागा, हत्ती वगैरे पाहून मोजदादी केल्या. बहुत संपत्ती पाहून कृतकृत्य जाले. **श्रीरामदासस्वामी** यांस वस्त्रें व देवास पोषाक, जवाहीर कारकून यांजवळ देऊन पाठविलें. त्यावरून ते समयीं **श्रीरामदासस्वामींनीं** पत्रें[26] लिहिलें. **रामदासस्वामींचें** आलेलें पत्र पाहून ठेवण्यास दिलें. सर्व सरदार व लोक आले त्यांची भेट घेऊन **कार्तीक** मासीं **केळशीस** स्वारी उतरून येऊन तेथें **बावा अँवलीया[27] फकीर** महाराजांनी स्थापिले होते त्यांचेंही दर्शन घेऊन मागती आठ दिवशीं परत आले.

त्याजवर शके १६०२ रौद्र नामसंवत्सरे **मार्गशीर्ष** शुद्ध १०स **येसूबाईसाहेब** प्रसूत होऊन पुत्र जाहाले. बहुत उत्साह करून दानधर्म केला. नामकरण **शिवाजीराजे** असें ठेविलें. तेच **शाहुमहाराज**. ब्राह्मण भोजन करिते जाहाले. राज्याभिषेक करावा हा सिद्धांत करून माघ शुद्ध १० गुरुवार हा मुहूर्त ज्योतिषी यांचे विचारें सिद्धांत केला. सर्व संभार व साहित्य करण्याची आज्ञा केली. मंडपादि करविलें. सुभेदार व मुजुमदार व जमीनिसें[28] जुमलेदार वगैरे सरदार व कारखानीस व सरकारकून यांजवर कृपा करून तैनाता जास्त करविल्या. आबदागिरे, पालख्या देऊन सर्वांचें समाधान केलें. **हरजी महाडीक** व **गणोजीराव शिरके** व **अचेंलोजीराजे[29] महाडीक** व **तुको-**

---

२५. 'बोलले' पाठांतर.

२६ हें पत्र प्रत्येकानें वाचून मनन करण्या जोगें आहे. हें ओवीबद्ध आहे. निबंधमालेचा अंक २३ पृ० ३४ पहा. अगर रामदासस्वामींची बखर पहा.

२७. हा बावा अवलिया कोण?

२८ जमनिस = एक मुलकी अधिकारी.

२९ किंवा 'दत्तकाजी'?

जी पालकर व महादाजी निंबाळकर मेहुणे राजाचे व **जोसाजी केसरकर** यांणीं व **त्रिंबक बाजी देशपांडे खासनीस** यांणीं व आणखी ममतेंतील यांणीं **महाराजांस** विनंती करून बोलले कीं, "साहेब सिंहासनाधीश होणार आणि प्रधान यांचे घरीं चौक्या, हें विहित नाहीं." याजवरून चौक्या उठविल्या. **बाळाजी आवजी प्रभु चिटणीस** यांणीं आपलें काम करावें[30], [असें] सांगून कृपा केली. **प्रधान** यांचे गुमास्ते व **अमात्य** वगैरे यांणीं काम तूर्त करावें, अशी आज्ञा जाहली. आणि सेवा घेऊं लागले. **येसाजी फरजंद** व **सोमाजी फरजंद** वगैरे **मराठे** लोक सरदार आपले आपले पेशजी सेवा करीत आले तशा हवाली[31] केल्या. माघ शुद्ध १० गुरुवार शके मजकुरीं यांस राज्याभिषेक होऊन सिंहासनारूढ जाले. तोफा करविल्या. तों[32] सूर्यदर्शन व्हावें तें जालें नाहीं. कारण अभ्र आलें होतें. सिंहासनावरून उठोन रथावर बसले. तेथून काळपुरुष[33] मारावा ह्मणून निघाले तों मार्गीं रथ मोडला. तसेच जाऊन, काळपुरुष मारून, बाजाराचे बाहेर जाऊन, हत्तीवर स्वार होऊन, मिरवत समारंभें करून महालांत आले. तेथून यज्ञ शाला केली. तेथें **कवजीचे**[34] सांगण्यावरून सोनें, रूपें, तांबें, पितळ, लोखंड, कापूस, रूपें, तेल, मीठ, सुपारी, नारळ, गूळ, साखर आठरा धान्यें [यांच्या] तुळा केल्या. अष्टप्रधान यांचे सन्मान वस्त्रें अलंकार देऊन ब्राह्मण तीस चाळीस हजार जाले. त्यांस दक्षणा [देऊन] ब्राह्मण भोजन करविलें. तेव्हां दक्षणेचे दाटींत कांहीं ब्राह्मणही मेले. गुणी गायकें[35] यांसही द्रव्य बहुत देऊन संतोषित केलें. ते समयीं अष्टप्रधान जाहले ते पूर्वीं होते तेच. **पेशवे मोरोपंत** करून त्यांचे गुमास्ते **उद्धव पुंगदेव**[36] व **बहिरोपंत** यांचे हातीं कारभार घेतला. वरकडांचे गुमास्ते यांचे हातीं कारभार घेतले. बहुमान पोंचे [?] त्यांस दिले व पाठविले.

याजवर **श्रीरामदसस्वामी** माघ वद्य ९ शके १६०३ **दुर्मती** नामसंवत्सरे मंदवारीं समाधिस्त जाहले. कवी **कलुषा कवजी** ह्मणोन **कनोजी** ब्राह्मण बहुत विद्वान मंत्र शास्त्र विद्या आगम त्यास बहुत गम्य असे होते. त्यांची स्त्रीही चतुर होती. त्यांणीं महाराज वश्य करावें ह्मणून वश्य—कर्णमंत्र

---

३० "करावें अशी आज्ञा झाली" पा०

३१. 'बवम' ? पाठांतर.

३२ मूळांत 'तें' असें आहे.

३३. काळ पुरुष=यम? राज्याभिषेकाच्या वेळीं हा 'काळ पुरुष' मारणें अवश्य आहे.

३४. 'कतबीचे' पा० कवजी (कविजी) ह्मणजे कलुषा प्रधान. हा कवी होता ह्मणून त्याचें नांव 'कवजी' असें पडलें.

३५. 'गाशक' पाठांतर.

३६ 'युगदेव' की 'पुंगदेव' ?

प्रयोग करून **महाराजांची** बहुत जवळीक व कृपा संपादून अगोदर समीप राज्याभिषेका पूर्वी होतेच. वाममार्गविशीं[३७] अनुष्ठानें प्रयोग संपत्ती करणें व राज्यवृद्धि होणें यश येणें असें समजाऊन प्रयोग अनुष्ठान करविलें. पुढें दिवसें दिवस बुद्धीस भ्रंश पडून त्या मार्गांत अनुसरावें असें केलें. रेडे मारून त्यांचे ओले कातड्यावर अनुष्ठानें व मद्यमांस पशुवधाचीं बहुत करूं लागले. ब्राह्मणां पासून प्रयोग करविणें[३८] यांत **महाराजांचे** अंतःकरण बहुत व्याप्त जाहालें*. कोणी हें करणें युक्त नव्हे असें बहुत सांगून कळविलें असतां त्यासच दरबार मना करून कैद करावें; असें होऊं लागलें. ते समयीं **महाराजांची** मर्जी तशी जाहाली असें जाणून सर्वांनीं ती गोष्ट सोडिली. त्या कारभारांत युक्त अयुक्त कांहीं न ह्मणावें. असें कारभारी वगैरे यांणीं केलें. होईल तें पाहूं लागले. दोन वर्षें स्वारी तेथेंच राहिली.

नंतर कांहीं दिवस **मोरोपंत प्रधान** किल्यावरच ठेविले. त्यांचे पुत्र **निळकंठ मोरेश्वर** यांज पासून सेवा घेऊं लागले. याजवर **रायगडाहून** निघोन **पन्हाळ्याकडे** चालिले. ते समयीं **अकबर** ह्मणून पातशाहाजादा **दिल्लीहून** पागी होऊन देशीं[४०] आले. त्यांणीं **महाराजांकडे** येतों ह्मणून वकील कारकून पत्रें वस्त्रें देऊन पाठविले. ते समयीं **औरंगजेब** पातशाहा यांनीं **रणथंबें** सर करून तेथें कांहीं दिवस छावणी करून **गोंडवण, चांदे-**

---

३७. वाममार्ग–शाक्तपंथ–या पंथाचे लोक देवीची डावे हातानें पूजा करितात ह्मणून व त्यांचे सर्वच प्रकार उलटे असतात ह्मणून त्यांस 'वाममार्गी' असें ह्मणतात. मद्यमांस यांचें सेवन ही यांमध्यें चालू असतें.

३८. 'करविलें' पा०

* कलुषा हा औरंगजेबाकडून संभाजी राजास भ्रष्ट करण्याकरतां व दुर्मार्गास लावून त्यांसधरून बादशहाचे स्वाधीन करण्याकरितां, विडा उचलून आला होता असा कांहीं मराठी जुन्या लेखांचा रोंख असतो. कांहीं स्थळीं तर तो कलीचा अवतार असून शिवाजीनें सुरू केलेल्या राज्यक्रमाचें व धर्म-संस्थापनेचें उच्छेदन करण्या करितां तो प्रकट झाला होता असें ही आढळतें.

४०. पागी होऊन =स्वार होऊन, पळून. देशीं =महाराष्ट्रांत.

अकबर—हा औरंगजेबाचा तिसरा मुलगा. याजवर त्याची फार मर्जी असे. सन इ० १६८० चे सुमारास रजपूत लोकांनीं 'जिझिया' नामक करावरून जें बंड केलें तें मोडण्यासाठीं दुसऱ्या मुलां बरोबर अकबर याची ही बादशहानें रवानगी केली. तेव्हां त्याचें वय सुमारें २३ वर्षांचें होतें. पुढें रजपूत लोकांचा मुख्य सरदार जो दुर्गादास त्याणें अकबर याचें मन वळवून त्यास आपले पक्षास मिळविलें. व अकबरा जवळ ७० हजार फौज जमली. परंतु पुढें औरंगजेबानें मोठ्या युक्तीनें हें आपल्या मुलाचें बंड मोडून त्याजकडे फितूर झालेले आपले लोक परत आणिले. तेव्हां तेथें निभाव लागणें कठीण हें जाणून अकबर निघून कोंकणांत संभाजीकडे आला.

**देवगड** प्रांतीं येऊन तो प्रांत किल्ले ठाणीं सर केलीं आणि **भागानगरावर** फौज पाठवून, शह देऊन, खांसाही पुढें त्या प्रांतीं येऊन राहिले, आणि **भागानगर** जेर केलें.

**महाराज पन्हाळयास** जातां **साताऱ्यास** येऊन तेथून किल्ले **परळी** पहाण्यास गेले. तेथून येतांनां **बाळाजी आवजी चिटणीस** यांचा व **दादजी रघुनाथ** प्रभु देशपांडे **महाडकर** यांचा बहुत द्वेष होता. ते बहुत कृपेंत, अंतरंगांत, **कब**जीकडील कारभारांत होते, त्यांणीं चिटणीशी व कारखाननीशी आपण करावी हे इच्छा [धरून] **महाराजांस** सुचविलें जे, **बाळाजी आवजी चिटणीस** यांणीं पत्रें फितव्याचीं येकंदर राज्यांत व **पन्हाळयास** लिहिलीं असतां त्याजवर कृपा करूं नये. येखत्यारीत ठेवणें चांगलें नाहीं. त्यांचे भाऊ **शामजी आवजी** कारखाननीस व **सचिव** यांणीं राजकारण हें बैठाविलें." असें समजाविलें. तेव्हां **महाराज** यांणी ही, "फितव्यांत होते" असें उत्तर केलें. **बाळाजी आवजींनीं** आग्रह धरून पत्रें लिहिलीं नाहींत. त्याजवरून आपण निराळे राहून पुत्राकडून करविलें असें गैरवांका भासविलें. **महाराजांची** मर्जी क्रूर आणि त्यांत समय येक प्रकार पाहून समजाविलें. ते समयीं त्यांचे पुत्रास मारावें [अशी] आज्ञा केली यावरून त्यास आणावयास पाठविलें. त्यांणीं पुत्रास मारणार, त्यास पारिपत्य करणें तें आपलेंच करावें, असें ह्मटलें. त्याजवरून **महाराजांस बाळाजी आवजीचा** आग्रह आहे [असें दिसलें.] आधीं आपणास मारावें नंतर पुत्रास करणें तें करावें. त्यावरून आग्रह केल्यास दोघांस ही मारावे लागतील [असें] बोलले. तेच परवानगी सांगून उभयतां **बाळाजी आवजी** व त्यांचे वडील पुत्र **आवजी बल्लाळ** व **शामजी** असे तिघे ही हत्ती खालीं घालून मारिले. व **अंणाजीपंत सचिव**ही मारिलें. व **बहिरोजी फरजंद** यांस ही मारिलें. या प्रमाणें जाहल्यावर **महाराजांस बाळाजी आवजी** पुत्रासुद्धां तिघांसही मारिलें असें कळलें. तेव्हां "त्यास मारावयाचें कारण नव्हतें" असें बोलिले. आणि महालांत गेले. तेथें **येसूबाईसाहेब** यांणीं, "**बाळाजी प्रभु** मारिले हें उचित न केलें, बहुतां दिवसांचे आणि इतबारी व पोख्त. थोरले **महाराज** कृपालु सर्व अंतरंग त्याजपाशीं होते. चिटणीस

४१. औरंगजेब १६८३ सालीं ब्ऱ्हाणपुरास येऊन छावणीस राहिला. भागानगर = हैदराबाद.

४२. मागें पृ० २१३ पाहा

४३. यखत्यारी = अधिकार.

४४. बोलाविलें.' असें एका प्रतींत आहे.

४५. 'गैरवांका' = खोटी गोष्ट सांगून, उलट मजकूर कळवून.

४६. येसूबाई ही संभाजीची स्त्री.

राज्याचे व आपले प्राण ऐसे म्हणत आले. वंशपरंपरेनें चिटणिशी देऊन पत्र शपथपूर्वक त्यांस दिलें, तें माहित असोन, त्यांणीं अपराधही कांहीं केला नाहीं, लहानाचे सांगण्यावर हे गोष्टी कशी केली? सर्व कारकून गेले, मारिले, बेदील झाले, अन्यायीही झाले, एक एक होते तेही ऐसे केले. पुढें राज्य कसें चालेल?" इत्यादि बोलली. तेव्हां, "आमचेही मनांत ही गोष्ट नव्हती, परंतु रागाचे समयीं बोललों जितक्यावर परवानगी सांगून जाले तें वाईट वाटून उठून आलों. वाईट गोष्ट झाली खरी. तुम्हीं त्यांचे धाकटे पुत्र दोघे आहेत ते खासगीकडे त्याचा बंदोबस्त दरमहा देऊन चालवावे, त्यांचे कारकून लिहिणार त्यांचे हातेंच काम चालविण्याचें. मुलें लहान आहेत. त्यांजवर कृपा करावयाची" असें सांगितलें. त्याजवरून येसूबाई साहेब यांणीं मुलें दोन खंडो बल्लाळ व निळो बल्लाळ यांचें रक्षण केलें. शिक्के शिवाजी महाराज जिजाबाई साहेब यांजकडे ठेऊन करवीत होते, त्याप्रमाणें संभाजी महाराज यांणीं शिक्के पेटींत घालून, देवापाशीं ठेऊन पेटीची किल्ली वाड्यांत असावी; शिक्के करणें ते परवानगीची याद जाली म्हणजे नेऊन समजवावी[४७], नंतर शिक्के तेथेंच अणोन करावे, असें येसूबाई साहेब याजपासून करवूं लागले. असें चालत होतें. याजवर त्या कागदावर शिक्के करविणें व आपले कागदपत्र लिहविणें चिट्टीचपाटी[४८] लिहविणें ते येसूबाई साहेब खंडो बल्लाळ याजपासून करवूं लागली.

महाराज पन्हाळ्यास जाऊन मागती रायगडावर आले. ते पाचाडे[४९] माचीस राहिले. नवरात्राचा होम कबजीनें करविला. तसा व वार्षिकाचा करून कांहीं दिवशीं हरबाजी फरजंद, व वासुदेव बाळाजी, सूरराव काकडे यांस कोणी समजाविल्यावरून मारिलें. कबजी बावांनीं चिटणीशी व कारखानिशी दादजी देशपांडे यांस सांगावी, म्हणोन विनंती केली. तेव्हां महाराजांनीं "कैलासवासी महाराजांनीं वतनी वंशपरंपरेनें देऊन शपथ वचन दिलें [ त्या अर्थी ] ती गोष्ट घडावयाची नाहीं" असें सांगितलें. त्या दिवसांत अकबर शाहाजादे त्रिंबकास येऊन पावले. यांची बातमी आलियावरि त्यांस राहण्यास जागा धोंडसें म्हणोन गांव रायगडाजवळ आहे तेथें करविली. आणि पादशाहाजादे जवळ आलियावरि पुढें जाऊन भेट घेतली. आणि घेऊन येऊन नेमिले जागां ठेविलें. दरमहा लाख रुपये खर्चास नेमून देऊन चालविलें.

त्यानंतर कोंडाजी[५०] फरजंद यांणीं आपण जंजिरे येथें जाऊन फितूर करितों

---

४७. ही शिवाजिची पद्धति ध्यानांत ठेवण्याजोगी आहे.

४८. 'चिठ्ठेचे पोटीं' पाठांतर.

४९. 'पाचाड' कीं 'पाचाऊ'?

५०. 'खड्डजी' ग्रं० ड०

[ असें ] म्हटल्यावरून रवाना केला. त्याणें तिकडे जाऊन चाकरी धरिली. आंत जाऊन दारूखाना वगैरे आग लाऊन जाळवावें, भेद होईल तो करावा, असें सांगून ठेविलें होते. त्यांणीं बटकी खरेदी करून लोकांच्या बायका करून देऊन आपणही एक ठेऊन कबिले सुद्धां म्हणोन चाकरीस राहिले. कांहीं दिवशीं काजी महमद तालकर याची बांदी महाराजांचे सरकारांत[५१] गेली होती ती तेथें त्यांणीं ओळखली. आणि हबशी यांस सर्व वर्तमान सांगितलें. ते समयीं चौकशी करितां सर्व कळलें. नंतर फरजंद याची डोचकी मारिली. कोणास बुडविलें. कोणी पळाले. असें जाहालें. हें वर्तमान महाराजांस कळलियावरि जंजिरा कसेंही करून घ्यावा हें मनांत आणिलें, ते समयीं कबजीचे मारफतीनें दादजी रघुनाथ देशपांड्ये प्रभु महाडकर यांणीं जंजिरा घेऊन देतों म्हणोन बोलणें लाविलें. तेव्हां जंजिरा घेणेंविशीं मसलत करावी हा मनांतील खबीर[५२], त्यांत कबजीचें राजकारण, जंजिरा घेऊन दिला म्हणजे मजमु अमात्यपद द्यावें असा करार यादीवर करून देऊन आरमाराचे सुभे दौलतखान व मायनाक व कावजी महमद व गोविंदजी कान्हो सरंजाम सुद्धां मदतीस देऊन व लोक बराबर देऊन दादजी देशपांड्ये रवाना केले.

आपण धोंडसें गांव येथें पादशहा [जादे] राहिले म्हणून त्याचें नांव पादशहापूर असें ठेविलें. तेथें गेले. अकबर पादशहाची भेट घेऊन आलियावरि भागानगरची पादशाही औरंगजेब यांणीं घेतली [ हें ] वर्तमान आलें. शके १६०५ त घेऊन तेथील बंदोबस्त करून तेथेंच पादशहा छावणीस राहिले. आणि शिवाजी राजे वारले. संभाजी राजे यांणीं लोक बहुत मारिले. बंदोबस्त बेखबरदारी-ही राहतात. या उपर विजापूरची बादशहात आधीं घेऊन नंतर त्याजवर स्वारी करावी ऐसा विचार करून त्याचे प्रांतांतही फौजा पाठविल्या. हीं वर्तमानें येत गेलीं. शाहाजादे याचे बोलणें कीं, " तुम्हीं सारी फौज गोळा करून व आपण मिळोन थोरली मसलत[५३] करून पादशहा याजवरि जावें. " हें महाराज यांजकडून घडलें नाहीं. यावरून महाराजांचे चरित्र एक प्रकारचें. यांचे वस्तु[५४] आपले सरबरा[५५] होऊन साध्य घडावयाचे नाहीं. आपण तिकडून येऊन पादशाहाचेही द्वेषी जाहालों. पुढें परिणाम नाहीं. यास्तव बोलणें लाविलें कीं, " आम्हांस सुरतेस जावयाचें. तेथून मक्केस जाऊं. याजकरितां सुरतेपर्यंत

---

५१. सरकारांत=अमलांत ? मुलुखांत ?

५२. खबीर=निश्चितपणा-निश्चय.

५३ थोरली मसलत=दिल्लीचो बादशाहो मिळण्याचा मनसुबा. अकबरास मराठे व रजपूत साहाय्य होऊन त्यास दिल्लीचे तक्तावर बसविणार अशी गप्प त्यावेळीं जिकडे तिकडे उडाली होती.

५४. यांचे वस्तु=यांच्यामार्फत, हातून.

५५. सरबरा=तयारी, मदत.

पोंचवावें." त्याजवरून निरोप देऊन बरोबर रूपाजी भोसले व मानसिंग मोरे देऊन पोंचविले. ते मक्केस[५६] निघून गेले.

इकडे दादजी देशपांड्ये जंजिरे याजवर जाऊन, प्रांतांत बहुत धामधूम केली. आरमारही भोंवतें ठेऊन जिकडून तिकडून बंदी केली. ऐसे बहुत जेरदस्तींत आणिले. हल्लाही एक दोन वेळां शिड्या लाऊन केला, परंतु त्यांणीं कापून काढिल्या. लोक बहुत मारिले. साध्य न होय. याजमुळें लोक बेदील होऊन उठून चालले. मसलत सिद्धीस जात नाहीं, ऐसें पाहून नामोहरम होऊन उठोन माघारे आले. आरमारही उठोन गेलें. हबशी यांणीं स्वारी करून देशपांड्ये यांचा कबिला महाडाहून धरून नेला. व चौलावर स्वारी करून तेथूनही लोक बहुत धरून नेले. त्याजवरि सिद्दी [५७]मिसरी व दौलतखान व मायनाक भंडारी, संताजी पवळा, गोविंदजी जाधव, व गोविंद कान्हो हे आरमाराचे सरदार नागोठणें व आपटें याकडे आरमार घेऊन गेले. ते उरणचे खाडीनजीक हबशी याचे आरमार जात होतें [ तेथें ] त्यांची यांची गांठ पडली. युद्ध बहुत जाहले. महाराजांकडील पंधरा गलबतें व सिद्दी मिसरी पाडाव करून नेले. कितेक गलबतें बुडविलीं. कितेक पळून गेले. त्याजवर हबशी बळावत चालला. खैरतखान हबशी याणें मुलकांमध्यें स्वाऱ्या घालून थोर थोर माणसांचे [५८]कबिले धरून नेऊं लागले. लोकांस नांवाजून बक्षीस देऊन मुलकांत फार उपद्रव देऊं लागले. कितेक इकडील लोक राजाची क्रूरता पाहून हबशी याजकडे जाऊन चाकरीस राहते जाहले.

रणमस्तखान[५९] कल्याणप्रांतीं येऊन उपद्रव केला. हें वर्तमान महाराजास कळल्यावरि रायगडाहून निघोन फौजेसुद्धां कल्याणास गेले. रणमस्तखान यांशीं युद्ध देऊन रसद बंदी [ करून ] व कही मारून जेर केले असतां याकुदखान जंजिऱ्याहून कुमकेस गेले. त्याणीं जाहाजांतून उतरून मधीं मोरचे देऊन रणमस्तखान॰ यास रसद पोंचवणें वगैरे पुरावा केला. तो घाटावर रोहिलाखान होते त्यांस कळलियावरि तेही कुमकेस येऊन रणमस्तखान यास निभाऊन घेऊन घाट चढून गेले. महाराज माघारे रायगडास आले.

---

५६. 'इराणास गेले' असें ग्रां० ड० ह्मणतात.

५७. सिद्दी मिसरी हा जंजिऱ्याहून फितुर होऊन संभाजीस मिळाला होता.

५८. कबिले=स्त्रिया. खुद्द महाडकर देशपांडे यांचीही स्त्री धरून नेली होती असें वर आलें आहेच.

५९. रणमस्तखान—हा मोंगली सरदार होता.

६०. रसद=दाणादुण्याचा व पैशाचा पुरवठा. कही मारणें=दाणावैरण आणाऱ्यास गेलेल्या टोळीवर हल्ला करून ती लुटणें.

चंजीचे रघुनाथपंतांनीं[६१] भेटीस येतों म्हणून लिहून पाठऊन पांच हजार स्वार व दहा हजार पायदळ बरोबर घेऊन दर्शनास आले. समागमें तीस चाळीस लाख होन तिकडील रसदें[६२] घेऊन आले. बिरवाडीस नदी-किनारां-मांडव घालून भेटी समारंभें करून जाल्या. महाराजांस मेजवानी पंतांनीं केली. सरकारकून वगैरे यांचे बहुमान केले. व महाराजांनीं पंतांचा बहुमान केला. त्याजवरि जनार्दनपंत, व निळो मोरेश्वर प्रधान, व आबाजी सोनदेव, प्रल्हाद निराजी, व उमाजीपंत, संक्राजीपंत व त्रिंबकजी खासनवीस, व रूपाजी भोसले, व हंबीरराव मोहिते सेनापति व नेतोजी पालकर व शिर्के, महाडीक. व आणखी कितेक लोक मजालिसीत[६३] बसले असतां रघुनाथपंतांनीं महाराजांस विचारलें कीं, " राज्य दिवसेंदिवस वृद्धी व्हावी तें कमीच होत चाललें याचें कारण काय? हबशी वगैरे पुंड पाळेगार बळावत चालले हें काय? लोक बेदील.—कितेक ब्राम्हण वगैरे सरदार लोक हे अन्यायी तरि त्यांस बेड्या घालून किल्यावर ठेवून मारावें, ते शिरच्छेद करून, कर्ते मारिले. असो, पुढें सबळ शत्रु औरंगजेब येऊन भिडला याचा विचार काय केला आहे? महा-राज कैलासवासी होऊन बहुत दिवस जाहले नाहींत तों प्रांत उजाड झाले व पाळेगार बळाविले. महाराज कांहीं घेऊन गेले नाहींत." ऐसा पंतानीं प्रश्न केला असतां महाराजांस[६४] हितावह वाटावें तें न घडलें. वाईटच वाटून "राज्या-चा खर्च वाढला आहे." इतकेंच उत्तर केलें. मजालस जहालियावरि आपलें बोलणें महाराजांस वाईट वाटलें, हें पंतास समजलियावरि व दिवसें दिवस एक प्रकारची रीत व कबजीचें प्राबल्य, त्यास राजे परम वश, व लहान माणसें जवळ बोलाविलीं, महाराजांस त्यांचीं बोलणीं व करणीं हितकर वाटतात, आपण आलों असतां पुढील राज्यभार अथवा मसलत [यांजबद्दल] कांहीं एक विचार नाहीं; विजा-पूरची व भागानगरची कुमक करण्याचें राजकारण[६५] पंतावरोबर आलें, त्याचा विचार महाराजांस कांहीं एक न माने; ऐसें पाहून तेथें रहाणें [ येणेंकरून ] आपले स्वरूपाची हानि मात्र होईल, वडिलीं मेळविली योग्यता व आज तागाईत आम्हीं

---

६१. रघुनाथ नारायण हनवंते—यांस तं-जावराकडील व कर्नाटकांतील कारभार प-हाण्यास शिवाजीनें ठेविलें होतें. हे अमात्य प्रधान होत.

६२ रसद=मुलुखाचा वसूल. वर ६० टी० पहा.

६३. 'मजालसी सभा ज्ञेया' राजव्यव-हारकोश. पंतांची निस्पृहता, धैर्य व राजभक्ति हीं पुढील मजकुरावरून स्पष्ट होतात.

६४. महाराजांस=संभाजीस.

६५. विजापूर व गोवळकोंडें येथील रा-जांनीं आपला व संभाजीचा एक विचार होऊन तिघांनीं एक जुटानें औरंगजेबास प्रतिबंध करावा अशा मसलतीचीं बोलणी पंतांकडे लाविलीं होतीं, त्यांस उद्देशून वरील लेख असावा.

संपादिली ते सर्व जाईल. कबजीसारखे प्रमुख तेव्हां रहाणें ठीक नाहीं. कालाची गतिच अशी दिसती. म्हणून [ व ] चंदी प्रांताचा बंदोबस्त राहिला पाहिजे, तिकडे औरंगजेब यांची फौज धांवेल, म्हणून निरोप घेऊन, स्वार होऊन गेले. चंदीस पावतांच कांहीं दिवशीं वारले. हें वर्तमान आलियावर संस्थान थोर, रक्षिलें पाहिजे. यास योग्य कोण पाठवावें हा विचार करून हरजी राजे महाडीक व निळो मोरेश्वर प्रधान या उभयतांची रवानगी केली. निळो बल्लाळ चिटणीस बरोबर दिल्हे.

महाराज रायगडाहून किल्ले पन्हाळ प्रांतीं जावयास प्रतापगडचे देवीचें दर्शन करून परळीस येऊन समाधीचें दर्शन घेऊन तेथें पूजा अर्चा उत्साह ह्याचे बंदोबतास गांव वगैरे नेमून दिले. व चाफळचे उत्साहाचा बंदोबस्त करून पनाळ्यास स्वारी पावली. तेथून राजापूर प्रांतीं गेलियावर तेथेंच कांहीं दिवस राहिले. ते समयी गोंव्याचें राज कारण आलें. तें सिद्ध करून खासाच फौजबंदी, पायलोक करून, समुद्रास भरतें न आलें तों समय नेमला. ते वेळेस जाऊन पोहोंचावें. डांक ठेऊन जावेंसें सिद्धांत करून स्वारी केली. महाराजांनीं डाक चौकीचे लोक ठेऊन त्वरें करून पाठवावे ऐसा बेत केला. तैसेंच निघोन जातां वाटेस मदनगडचीं पत्रें बातमीचीं आलीं. ते समयीं लिहिणार कोणी आहे नाहीं विचारिलें. तों खंडो बल्लाळ यांणीं महाराज कृपा करीत तों पायउतारा स्वारी बरोबर असावें, ऐसें वृत्त केलें होतें. तसेंच पायउतारा पाठीमागें जात होते. तों लोकांनीं सांगितलें कीं, खंडोबा चिटणीस धांवत येत आहेत. ते समयीं हांक मारविली. तों धावून येऊन पावले. त्यांस जाब लेहून देणें [ असें ] सांगितलें. तों बसोन लेहून दिल्हे. स्वारी पुढें गेली. पुन्हा धावून निर्शांण करून दिल्हे. तों रक्त ओकले. [ तें ] पाहून औस्ताव्यांतून पाणी देववून खासा घोडा जिलेबीस होता तो देऊन बसा म्हणोन सांगितलें. गोंव्या नजीक गेलियावरि पालखींतून उतरून घोडीवर स्वार जाले.

---

६६. समाधि–रामदास स्वामींचा.

६७. 'शिणाव' सातारा प्रत. निशाण=शिक्का, मोर्तब. नवव्या पृष्ठाचे आरंभापासून मजकूर खुद्द चिटणीस यांजकडील प्रतींतून मुख्यतः घेतला आहे. ही प्रत सातारकर महाराजांच्या चिटणिसांचे वंशज ह्मणजे बखर रचणार मल्हार रामराव यांचे नातु रा० रा० खंडेरावजी चिटणीस यांणी आह्मीं मागितल्यावरून आम्हांकडे पाठविली याबद्दल आह्मीं त्यांचे फार आभारी आहों. ह्या प्रतीविषयीं विशेष हकीगत पुढें देऊं. चिटणिसांचें हें वर्तन आमच्या इतर जुन्या घराण्यांतील गृहस्थांनीं ध्यानांत घेण्या जोगें आहे.

६८. अस्तावा=झारी, लोटी. 'अस्तावा नाम भृंगारी' राजव्यवहारकोश.

६९. जिलीब–लवाजमा.

आणि निकडीनें जाऊन आटोपावें म्हणून पोहोंचले. तो त्या अवसरीं भरतें प्राप्त जालें. फिरंगी सावध होऊन उभे राहिले. लढाई पडली. **फि**रंगी मोडिला. लोक फार मारिले असतां पळून **गों**व्याचे किल्यांत गेले. **म**हाराजांनीं खासा घोडिया वरून जिनास पाणी लागे तों घोडा घातला. त्यांजबराबर **खं**डो **ब**ल्लाळ याणीं घोडा घालून तरवार मारिली. शिपायगिरी केली. **गों**वेकर सावध जाले. पाणी चढलें तेव्हां माघारे फिरले. तों घोडा पहुणीस लागला. **खं**डो **ब**ल्लळ यांणीं उडी टाकून **म**हाराजांचा घोडा धरून पोहून बाहेर निघाले. ते समयीं बहुत संतोष होऊन पोटाशीं धरिले आणि बोलिले जे, " तुझे वडील निरापराधें लुच्यांचे सांगण्यावरून विचार न करितां मारिले असतां आज चाकरीची शर्त केली. तुझी **चि**टणीशी **म**हाराजांनीं वंशपरंपरें करून दिल्ही, निसबतीचे धंदे **का**रखानिशा **ज**मनिशा ते बहाल आहेत. **कै**लासवासी **म**हाराज तुमचे वडिलावरि प्रीति व विश्वास ठेऊन [ काम ] करीत होते तें पाहिलें आहे. त्याहून अधिक तुम्हांवर प्रीति, विश्वास ठेऊन चालवीन. कुलीन खरे." ऐसें नांवाजून " आमचे वंशींचा असेल तो परंपरेनें तिन्ही धंदे चालवील " ऐसें पुन्हा आश्वासन देऊन घोडा बक्षीस दिला. खांसा उतार-पोशाख[७०] व मोत्यांची कंठी व तुरा दिला. स्वारी माघारी आलियावरि पालखी बहुमान देऊन गौरव करून मुतालीक[७१] लिहिणार बोलावून " यांचे आज्ञेत सांगतील तसें चालवें, तेरीख[७२] व पत्रें यांचे सांगण्याखेरीज लेहूं नये " ऐसें सांगितलें. वरकड लोकही बराबरचे यांणीं कामें काजें केलीं, तरवारा मारिल्या, व पाण्यांत उड्या टाकिल्या त्यांस बक्षिसें दिल्हीं. तैनाताही वाढविल्या. **म**हाराज **सं**गमेश्वरींच रहाते जाले[७३].

[ पुढें ] दिवसेंदिवस **क**बजीचे स्वाधीन अधिकच होत चालले. इतबार मनसबा सर्व त्याचेच स्वाधीन. कोणीही पुरातन राज्यांतील इतबारी त्याची प्रतिष्ठा, अथवा मसलतींत घ्यावा, हे गोष्ट राहिली. उग्रपणें शासन कोण्ही वर्णविचार न करितां शिरच्छेद करावा. ऐसें करीत चालले. **क**बजीचे सहवासें त्याचें वाममार्ग

---

७० उतार पोशाख=अंगावर घातलेला पोषाख.

७१. मुतालीक=' उपमंत्री मुतालीको ' रा० व्य० को०. बाळाजी आवजी चिटणिसास मारिल्यापासून चिटणिशीचा कारभार मुतालिकांच्या मार्फत होत असे असें दिसतें. त्या मुतालिकांस आतां चिटणिसांच्या हुकुमांत वागण्यास आज्ञा झाली.

७२. तेरीख=तारीख=मिती. तारीख घालणें किंवा पत्र संपविणें हें खुद्द अधिकारी करीत.

७३. गोव्यावरील. स्वारी--इ० स० १६८३।८४ गोंवेकरांची खोड मोडण्याकरितां संभाजीनें पुष्कळ प्रयत्न केले; तथापि जरी त्याला कधीं कधीं जय येई तरी शेवटीं ते सर्व फुकट गेले.

कर्म तेणेंकरून फारच विचार राहिला नाहीं. माणूसमात्र फारच त्रास पावते जाले. सर्व प्रजेचीही क्षोभता जाली. न्यायाची रीत राहिली नाहीं. देव ब्राह्मणाचे ठायींही निष्ठा राहिली नाहीं. असें आचरण धरिलें. एक कबजी सांगितील तें प्रमाण. दैवयोगें करून होणार काल प्राप्त झाला. त्या योगें दुसरें सुचूं नये याप्रमाणें जालें. मातबर[*] व बुद्धिवंत व शूर होते ते हतवीर्य जाले. महाराजांनीं नूतन पराक्रम करावा, नवें राज्य साधन करावें, हें राहिलें नाहीं. सुभेदारं प्रांतांतील वगैरे, तैसेच गडकिल्ले यांचे कारभारी, यांजवरि हा कारभारांत खातो म्हणून चुगली करितांच त्याचा विचार न करितां त्यास आणावा, मारावा, नागवावा. अंतरें[७४]च असलिया शिरच्छेद करावा. या भयें करून मातबर चार होते ते कोण्ही जवळ बोलूं न पावत. त्यांस आपली आपलीच अबरू प्रतिष्ठा जतन होणें हेंच येऊन पडलें. एक कबजीचें सांगणें मात्र प्रमाण. त्या नादें महाराज चालणार. त्यासच अनुमोदन देणें. मग विचार कळलाच आहे. तजकरे[७५] घ्यावे, घरें बुडवावीं, नागवावें. माणूस राज्यांत वाढले ते कांहीं परराज्यांतून आणून वाढविले ऐसें घडत नाहीं. ऐशीं राज्यक्षयाचीं लक्षणें होत चाललीं. राज्य क्षयास जाणार त्या योगें [ असें ] घडत चाललें. वडिलोपार्जित सेवकांच्या प्रतिष्ठा राहिल्या नाहींत. सर्वही लघु मनुष्यें वृद्धिंगत जालीं. राज्यांतील सर्व कारभारी किल्ले सुभे यांणीं रोजमरा वाटणें इत्यादिक बारीक मोठी वर्तणूक करणें ते आज्ञा नेऊन करावी, तसें चालवें, हे थोरल्या महाराजांनीं रीत घातली. बंदोवस्त हुकुमाशिवाय काडी न हालावी असें केलें होतें. त्या चालीनें सर्व जागजागांचीं लिहिलीं यावीं. ते समयीं सर्वाध्यक्ष कबजी अति प्रीति त्यांणीं इतका कारभार कोठवर करावा ऐसें म्हणावें. व त्यास ' छंदोगामात्य कवि कलश पंडितराव ' ऐसा किताब दिल्हा. तेव्हां सर्व आला कारभार, त्यांजकडे जा म्हणावें. बावा[७६]नीं कागद पहाणें केलेलेंच आहे, तथापि लिहिणार इतके काय म्हणून लिहितात, यांत काय आहे, हंशील कलम ल्याहावें, तें चराठीं कशास लिहितात व चंदीपर्यंत किल्ले घेऊन काय समजोन करणारांनीं केले कळत नाहीं. किल्याचा बोभाट यावा. गनिमांनीं वेढा घालावा. त्याचें वर्तमान येथें येऊन पोहोंचून उपराळा[७७] जावा तों तो किल्ला जावा. लोक मारले जावे. हें पातक किती घडतें, व दुर्लौकिक मोठा होतो कीं नाहीं. राज्य आंगठीचे ठिकडे[७८] असें आस पास असावें. पहातां सर्व ध्यानांत येत असावें. म्हणजे

---

* मातबर=थोर, कुलीन, श्रीमंत.

७४. अंतर=सेवेंत, निष्ठेत अतर; कसुरी–फितुरी.

७५ तजकरा–लुच्चेगिरीनें दुसऱ्याचें वित्त हरण करणें, परवित्तापहार.

७६ बावा=कबजी.

७७. उपराळा=मदत, सुटका करण्याकरितां सैन्य.

७८. आंगठिचे ठिकडें–अंगठीचा खडा

उपराळाही होतो. बंदोबस्त यथास्थित राहतो. सेवक मर्यादेनें चालतात. असे अनेक प्रकारें कल्पना कराव्या. बोलवें. त्यांस महाजांनीं ऐकावें [ हें ] त्याचें दैव ! ब्राह्मण लँघु असतां योग्यता आली तेव्हां त्यास तर्क व कर्तेपणा बुद्धि कोठील कळतच आहे. राजे तरि त्याचे स्वाधीनच वश जाले. राज्यभ्रष्ट होणार. तेणेंकरून कांहीं सुचतें न झालें थोर थोर ज्याणीं राज्याविशीं पराक्रम केले, राज्य वृद्धीस नेलें व शूर पराक्रमी यांणींही ऐकावें, आचरण सकल पहावें, आणि म्हणावें कीं, "देवांनीं आम्हांस कां ठेविलें ? कैलास वास महाराजांनीं केला त्या अगोदर मेलों असतों, अगर महाराजांनीं सर्व मारिले यांत मारिलें असतें तरी उत्तम होतें, परंतु असे दिवशीं हें पहाणें अनुचित. ज्याचें अन्न बहुत दिवस खादलें व या राज्यांत वाढलों, लौकिक मेळविला, तें व्यर्थ जिणें ऐसें घडलें. महाराजांचें अकल्याण होतें. आम्हांत पराक्रम बुद्धि असून व्यर्थ झाली." ऐसे बहुत श्रमें[80] करून "होणें तें होईल, पहाणें प्राप्त; उगेच असावें." ऐसे सर्व करिते जाले. सर्वही हतवीर्य होऊन कांहींएक न बोलतां राहते जाले. पागा हत्ती सर्व कारखाने फौज जिकडील तिकडे बेनिगेनें[81] बुडाले, मेले, गेले. फौजेचा दरकार नाहीं बुडाली. लोक नामी, माणसें कर्ती चहूंकडे चार गेलीं. पिलाजी शिर्के व ताना-जी शिर्के, गणोजी शिर्के हे महाराजांचे आप्त. याणीं राजा वेडा जाला, कब-जीनें वश केलें, राज्य बुडतें, त्या अर्थीं हिय्या करून शिवाजी[82] राजे शिर्के यांचे भाचे यांस घेऊन राज्यावर बसवावें. राजाराम काढून त्याचे हातें कारभार चा-लवून राज्य रक्षावें. ऐसें राजकारण केलें. तें संभाजी महराज यांस समजलें. फुटलें. आधींच क्रूर मर्जी, यांत याजपासून अंतर ऐसें समजलें तेव्हां इतराजी केली. घरीं जप्ती पाठविली. [घरें] लुटलीं, जाळलीं. एक दोन शिर्के सांपडले ते मारिले. शिर्के जेथें असतील तितके मारावें ऐशी आज्ञा. करून शिरकाण[83] करविलें. ते समयीं दौलतराव शिर्के गणोजी व देवजी शिर्के वगैरे पळोन सर्व शिर्के तितके कुटुंब सुद्धां हबसाणांत गेले. चहूंकडे चार जाऊन मोगलाईंत जाऊन चाकऱ्या करूं लागले.

[इकडे] औरंगजेब भागानगर घेऊन[84] तेथील [तानाशहा] पातशहा कैद केले. कैदेंत असतां एके दिवशीं त्यांणीं मध्य रात्रीचे ठायीं चौघड्याचे वाजंत्री याणीं राग गाइला तो [ऐकून] बहुत खूष होऊन लाख रुपये बक्षीस त्यास द्यावे म्हणून सांगितलें.

---

७९. 'भिकारी' सा० प्र.

८० श्रम=दुःख, खेद.

८१. बेनिगा=अपरक्षण.

८२. शिवाजी राजे=संभाजीचा मुलगा शाहू.

८३. शिरकाण=शिरक्यांचा नाइनाट, समूळ उच्छेद. ( ? )

८४. गोंवळकोड्याचें राज्य स० इ० १६८७ त घेतलें.

आणि जवळ पोशाख होते ते पाठविले. हें वृत्त औरंगजेब यास समजलें तेव्हां लाख रुपये त्यांजकडे पाठऊन नगारजीस बक्षीस देवविले. विजापुरास मसलत करून, कबजेंत आणूनें पादशहा पुढें आले. शिवाजी राजे यांणीं लोक चांगले पराक्रमी बाळगिले. मराठी राज्य केलें. किल्ले कोट भांडून घेणें [तरि] झाडी दुर्घट. राजे वारले तरि एक एक माणूस त्यांचे पदरीं त्यांहून अधिक पराक्रमी. याउपरि आपणास तरि तें स्थान घेणें. हा समय [योग्य] आहे. दोन पादशाहाती बुडविल्या. संभाजी राजे शिवाजीचे बेटे आहेत ते बेखबरदारै आहेत, ऐसें ऐकितों. म्हणून बातम्या पाठविल्या तों इकडूनही खबरी अव्यवस्थित गेल्या. कबजीनें वश्य करून बेहोष आहेत, हें पक्कें समजलें. तेव्हां विचार केला कीं, याजउपरि बहुत आयास पडणार नाहींत. कसें राज्य येईल हे चिंता करीत होतों. संभाजी दैवहीन जाला. आमचा शिवाजी सारखा शत्रु वारला. आमचे तालें[८७] चांगले म्हणून याची अशी अवस्था जाली. या प्रकारें खुषी मानते जाले. याउपरि आपण निघाल्यापासून त्याचे गळां पडून, राजकारण करून, आपलासा करावा म्हणत होतों. आणि इतके दिवस दम खादला. ते गोष्ट खुदानें आपणास बक्षीस केली. याउपरि मोहीम करावी. ऐसा विचार ठरविला. तेसमयीं इलाचीबेग याणीं प्रतिज्ञा करून बोलिला जे; "जसे रणथंबे येथील मसलत केली तैशीच हीही मसलत जाऊन करितों. आपणास रवाना करावे" ऐसें बोलले. यावरि त्याची रवानगी केली. त्याणीं हजार दोन हजार फौज लोक घेऊन पुढें निघाला. पाठीमागें दहा पांच हजार फौज आणखी घेतली.

हें वर्तमान पादशहांनीं मोहीम करून फौज रवाना केली तें आलियावरि महाराजांनीं बावास कळवावें सांगितलें. बावांनीं विचार सांगितला "हे फौज आलियाची काय मुज्यार्की आहे? प्रयोगास प्रारंभ करून एक क्षणांत नाश होय ऐसें करितों." त्याजवरि महाराज यांस सरकारकून व सरदार यांणीं सर्वांनीं विचार करून बोलले जे, "आम्ही सर्व आहों. थोरले महाराजांनीं जिवापलीकडे पाळिलें. ये समयीं जीवांभ्य श्रम करून दौलत वाचवूं. औरंगजेब याचे फौजेचा गुमान काय आहे? आज्ञा करावी म्हणजे जमाव करून तोंडावरि जातों. पागा वगैरे बोलवाव्या. सर्व सरदारांस पत्रें लिहावीं." ऐसें सांगितलें असतां

८५. विजापूर–इ॰ स॰ १६८६.

८६. बेखबरदार=अनवहित, अदक्ष.

८७. तालें=नशीब, दैव.

८८ 'त्याचे श म पडून राजकारण करून' सा॰ प्र॰.

'त्याचे गळां पडूं नये राजकारण करून' चि॰ प्र॰.

८९. मुजाका=मुजाखा=बखा, महत्व.

९०. जीवाभ्य, जीवादारभ्य=मनापासून, तनमनधनें करून. सातारा प्रतींत 'जीवा पलीकडे' असें आहे.

९१. गुमान=हिशेब, थोरवी.

" बावाशीं बोला. त्याचे विचारें होईल तैसें करा " ऐशी आज्ञा झाली. वारंवार बोलावें, सांगावें तरि कोण्हाचा प्रवेश नाहीं, दर्शन नाहीं. ऐसा प्रकार बनला. तेव्हां सर्वांनीं विचार केला कीं, हा समय ईश्वरांनीं असा आणिला. या उपरि जीव व्यर्थ! आपण येथें जवळ असोन कांहीं कोण्ही न केलें व जालें नाहीं हें वांट्यास घेऊं नये. म्हणोन निमित्यें करून एक एक मातबर सरदार सरकारकून निघोन जाते जाले. कितेक रायगडास गेले.

[12]इलैचीबेग विशाळगडाचे घाटें उतरून हजार पांचशें निशीं पुढें आला. बातमी नेली. त्यांत महाराज बेहोष, तजवीज तयारी कांहीं एक नाहीं. त्या अर्थीं वकीलीस आलों ऐसा बहाणाकरून, पुढें पत्रें पाठऊन, दौड करून, संगमेश्वरीं जाऊन पोंहोचला. ते समयीं सर्व लोक राहिले तेही पळाले. आणि रायगडास गेले. येसूबाई साहेब व शिवाजी राजेही रायगडींच होते. फौज येऊन पावली. इलाचीबेग आला म्हणोन महाराजांस बातमी सांगितली, तेव्हां "बावा कोठें आहेत? त्यांस बोलावा. कां आलें ते शोध करून त्यांस पुढें भेटीस जावयास [13]सांगा," ऐसें म्हणतात तों दरवाज्याजवळ येऊन पावले. तेव्हां लोकांनीं "अद्यापि सावध व्हावें. आपणास पाठीशीं बांधून काढून पन्हाळ्यास नेतों" ऐसें बोलले असतां न ऐकत. तों जवळ शेंपन्नास मात्र माणूस राहिलें. खासांच उठोन दरवाज्यांतें[14] आले. तो इलाचीबेग याणें पुढें होऊन धरलें आणि कैद केलें. कोणीं हत्यार धरिलें त्यास तेच वेळेस मारिलें. कबजी बावासही कैद करून पादशाहा विजापूरप्रांत सर्व हस्तगत करून, तेथील पादशाहा किल्यांत कोंडून, भोवती फौज ठेवून, मोर्चे देऊन, तुळापुरीं मुक्कामास आले [ होते ] तेथें इलाचीबेग याणीं महाराजांस धरून माघारे जातां आपले लोक ठेवित ठेवित आला होता त्यांत मिळोन दहापांच हजार फौजेनें जमावानशीं तुळापुरास जाऊन पोंहोचला.

त्या नंतर पादशहास वर्तमान पोंहोचलियावरि कबजीस नेऊन [15]गुंजरला. तेव्हां पादशहा बोलले जे, "हा [16]अहिमक कबजी याणें येवढें राज्य राजास वेडें

---

१२. ग्रां० इ० ह्मणतात, गोंवळकोंडकर तुकरीबखान व त्याचा मुलगा इखलासखान यांणीं संभाजीस धरण्याचें काम कोल्हापुराहून येऊन साधिलें.

१३. ग्रां० इ० म्ह० बातमी घेऊन जासूद आले तेव्हां संभाजी अमलाच्या धुंदींत असून, असें भलतेंच बकाल तर तुमचीं नाकें कापीन याप्रमाणें त्यांस बोलला.

१४. वेष पालटून जाण्याच्या संधींत असतां संभाजीस त्याचे आंगावर बहुमोल दागिने पाहून धरिलें व ओळखिलें ग्रां० इ०.

१५. गुजरला=स्वाधीन केला, ताब्यांत दिला.

१६. आहमक=महामूर्ख, पाजी. 'अहमक' असें दोन्ही प्रतींत आहे, परंतु चि० प्रतींत शोध घालून 'बजी' अशीं अक्षरें

करून बुडविलें. यास लागलाच सुळीं देऊन, तीरमार करून मारा " म्हणून सांगितलें. त्याप्रमाणें मारला. संभाजी राजे धरून आणिले ते समयीं पादशहा बहुत खुषी होऊन कृतकृत्य जाले. भागानगर व विजापूर दोनी मसलैती[97] करून हस्तगत जालीं. हें तरि कांहीं एक आयास न पडतां मोठे आयासाचें काम तें सहज जालें. दरोबस्त दक्षण साध्य होऊन फत्ते जाली. हें चित्तांत येऊन [98]बक्षीला फौज [99]कलमी किती आहे विचारिलें. या उपरि एक वर्ण करावा, हिंदु ठेवूंच नये, म्हणून ओलें अन्न विकावें ऐसा हुकूम केला. तेव्हां सर्व वजीर यांणीं व सरदार यांणीं विचार केला जे, "पादशहा या उपरि निरंकुश[100] जाले. [म्हणून] हे बुद्धि जाली. पुढे परिणाम ठीक नाहीं. जाणून आसदखान वजीर वगैरे उमराव यांस विचार पडला. फौज कलमी विचारली. तेव्हां मसलत[1] राहिली नाहीं, हें जाणून लोक दूर बडतर्फ करावे म्हणतील. व ओलें अन्न विकणें यांणीं हिंदु कसे ऐकतील ? परवरदिगारें[2] यांगीं जात निर्माण केली ती मोडती हें घडत नाहीं. हे दोन्ही बुद्धि[3] पादशहास चांगल्या जाल्या नाहींत. विनाशकाळ जवळच दिसतो." ऐसे तर्क करून विचार करिते जाले. ओलें अन्न विकण्यास सांगितलें. ते समयीं भीमा पैल तीरीं पादशहा होते. तेथून यत्किंचित[4] हिंदु मातबर सरदार व वाणी उदमी जैसिंग आदिकरून हिंदु तितके निघोन परतीरीं जाऊन उतरले. ते समयीं मुसलमान थोडे, हिंदु बहुत, हें कळलें. वजीरांनीं " हें करणें चांगलें नाहीं. हिंदु फार, सर्व बदलल्यावरि उत्तम गती होणार नाहीं, " ऐसे प्रकारें अर्ज केलियावरि मना करून चालतें तसें चालविलें. फौज विचारिली या उपरि दूर करतील हें जाणोन सर्वांनीं वजिरांनीं मसलत केली कीं, " दोनी पादशहाती तरि फत्ते जाल्या. एक महाराष्ट्र[5] राहिलें. त्यास संभाजी हस्तगत जाले, परंतु किल्ले, कोट हातीं लागणें व त्यांचे भाऊबंद व बेटे आहेत, तसेच लोक मर्दाने शिवाजी राजे यांचे पदरचे उमराव कर्ते आहेत. राजा बेहोष जाला त्याचें फळ पावलाच. तत्रापि यास कैदेंत ठेविलियानें हे किल्ले कोट देवितील. यास्तव यास कसें करावें म्हणून पादशहा विचारतील तेव्हां यास मारावें, ठेवूं नये, हेच सर्वांनीं सल्ला

---

घातलीं आहेत व 'ह' 'ध' सारखा दिसतो त्यावरून 'अधम कबजो' असें झालें आहे तें कोणी गैर समजुतीनें पाठीमागुन केलें असावें.

९७ मसलत=(खटपट) स्वारी, मोहीम.

९८. बक्षी=सेनापति.

९९. कलमी—कागदी लागलेली, नक्की ?

१००. निरंकुश=बंधनरहित, प्रतिबंधरहित, निर्कंटक (राज्य).

१. मसलत=स्वारी. वर ९७ टीप पहा.

२. परवरदिगार=पोषण-कर्ता (परमेश.)

३. हिंदूंस बाटविण्याची व फौज कमी करण्याची ह्या दोन.

४. यत्किंचित=यच्चयावत्, सर्व.

५. 'महाराष्ट्री राहिली.' सा० प्र०.

द्यावी. हे जीवंत असतां त्यांचे राज्यांतील माणसांस दुग्धां पडेल. यांचा वचक धरतील. यास्तव यांस विल्हे लाविलें म्हणजे यांचे भाऊबंद सर्व सरदार एक होऊन किल्ले कोट बळावून भांडतील. मोहीम प्राप्त होईल. सर्व अलॅम यांचें पोट भरेल." असा विचार सर्वांनीं ठरविला.

संभाजी राजे बत्तीस पस्तीस वर्षांत, तारूण्य, पूर्ववयांत, बहुत स्वरूप सुंदर होते. पादशहांनीं पाहून विचार केला कीं, "यास बाटवावा, मुसलमान करून नंतर मनसब सरदारी देऊन ठेवावा, म्हणजे मुसलमानी झाली. हा पुरुष चांगला व थोरले घरंदाज [ कुळांतील ] आहे." म्हणून विचारावयास पाठविलें कीं, "तुम्हीं बाटावें म्हणजे जीव वाचवून तुमची दौलत तुमचे स्वाधीन करितों." त्याजवरून राजे यांणीं उत्तर केलें कीं, "बाटा म्हणतां तरि हे गोष्ट घडावयाची नाहीं. ज्या अर्थीं कैदेंत आलों, तेव्हां वाचणें तें काय? तुमचे विचारास येईल तें करावें. तथापि तुमची बेटी द्यावी म्हणजे बाटतों." ऐसें उत्तर सांगून पाठविलें. त्याजवरून पादशहास कोप आला. आणि सर्व वजीर अमीर यांस विचारलें कीं, "यास काय करावें?" तेव्हां सर्वांनीं सल्ला दिली जे "हा आहमक आहे. बेहोष व उद्दाम आहे. याचा शिरच्छेद करावा." याप्रमाणें बोलतांच आयुर्दाय सरला तशी पादशहास बुद्धि होऊन शिरच्छेद करावयास सांगितलें. तेव्हां तत्काळ आणून तुळापुरावरि शके १६१० विभवनाम संवत्सर यांत मारिलें. संभाजी राजे सुरतपाव म्हणोन पादशाह बोलून ठेवीत होते. त्यांणीं उत्तर केलें कीं, तुमची बेटी द्यावी. त्याजवरून पादशहा त्यांचा वध करितात, हें बेगमेस कळोन, सांगोन पाठविलें कीं, वध करूं नये. तों मारिले. याजमुळें बेगम बोलीली जे, "त्याचा प्राण माझे नांवें करून गेला. याउपरि आपण दुसरा भ्रतार करणार नाहीं." ऐसा निश्चय करून राहिली हें पादशहास समजलें.

ऐसें झालें असतां संभाजी राजे यांचे पुत्र शिवाजी राजे, व येसूबाई साहेब व आणखी नाटकशाळा व मदनसिंग संभाजी महाराजांचा इलाखा ठेवून राजाराम साहेब

---

६. दुग्धा=(द्विधा) अनिश्चय, करूं न करूं.

७. अलम=लोक, फौजेंतील लोक.

येथें असें ह्मटलें आहे पण ग्रां० डु० ह्मणतात, उमराव लोकांनीं संभाजीचा जीव वांचवाना ह्मणजे त्याचे लोक किल्ले आपल्या स्वाधीन करतील अशी सल्ला पादशहास दिली. हे लेख परस्परांस अगदीं विरुद्ध आहेत.

८. उत्तर देतांना शेवटीं पैगंबर महंमद यांस गालिप्रदानही केलें. ग्रां० डु०.

९. येथें दोन्ही प्रतींत 'अहमक' असेंच आहे.

१०. सुरत पाव=सुंदर चेहऱ्याचे.

११. ही औरंगजेबाची बेटी.

१२. नाटकशाळा=वेश्या ( संभाजी राजाच्या. )

१३. इलाखा=भाग, संबंध, कुटुंब.

रायगडीं होते ते नजरबंद होते. तेथें हे वर्तमान समजलें. शिवाजी राजे लहान सहा सात वर्षांचे वय. राज्यभार आटोपणें घडणार नाहीं. राजाराम साहेब सुबुद्ध, कर्ते, तेव्हां सर्वांनीं येसूबाई साहेब यां सहवर्तमान विचार करून राजाराम साहेबीं मसलत करावी, राज्याचा आटोप कारभार करावा, ऐसें केलें. रायगडीं शिवाजी राजे [व] येसूबाई साहेब राहून पादशाहाची फौज रायगडावर येणार, निघाली, हें कळतांच सर्व कारभारी मातबर सुद्धां रायगडचा बंदोबस्त करून, पन्हाळा विशाळगडाकडे जावेसें करून, निघोन गेले. त्यासमयीं विजापूरचे पादशाही कोट घेऊन शके १६११ शुक्ल संवत्सरे ते पादशाहत बुडविली.[१४] रायगडास फौज रवाना जाली. आणि जंजिरेकर हबशी यांस लिहून रायगडास मोर्चे देणें म्हणून हुकूम केला. आणि आसदखान वजीर यांचे लेक जुल्फकारखानें[१५] यांसच रवाना केले. हबशी यास लिहिलियावरून त्याचा वेढा किलियास येऊन बसला. किल्लेकरी यांणीं झुंजणें, मोर्च्यांवर पडणें, इत्यादि शर्त करणें ती केली. दहा महिने किल्ला भांडविला. बाहेरील कुमक येणें राहिले. राजाराम साहेब चंदीकडे[१६] सर्व कारभारीसह निघोन गेले. शाहे[१७] भारी. परिणामही नाहीं. तेव्हां जुल्फकारखान यांणीं सांगून पाठविलें कीं, "सर्व सरदार व राजाराम गेले. संभाजी राजे यांचा इलाखा यास काडी इतके भय नाहीं. बेगम इजला ही समजलें. तिनें पादशाहाशीं बोलविलें कीं, 'तो बेटा माझा. त्यास अभय कौल देऊन आणावें." हें सर्व येसूबाई साहेबांस सांगून पाठविलें. तेव्हां बाई साहेब बोलिली "असे सांपडलों म्हणजे आधींच अविंध त्यांत द्वेषी. चांगलें नाहीं. जुल्फकारखान याचें इमान प्रमाण करून त्याचा आश्रय करावा हें उत्तम दिसतें. व बेगमेचेही निरोप आदरयुक्त आले तेच साधन करावे आणि जाऊन भेटावें." ऐशी मसलत सर्वांचे विचारें करून जुल्फकारखान याशीं राजकारण बळाविलें. त्यांत बेगमेसही निरोप पाठवून पक्के केलें. तिचें इमान आश्वासन आणिलें आणि महाराज उतरून आणून खानाचे मांडीवरि बसविले. यांचे वडील, चुलते ते सर्व सोडून गेले. सर्वांविशीं वडील तुम्हीं आहां. असें म्हटल्यावरि त्यांणींही "येविशीं या उपरि तुम्हीं खतरा[१८] न करणें. याचे जीवास व आब्रूस कदापि धक्का लागूं देणार नाहीं" म्हणून कुराण उचलून दिलें. खातरजमा केली. आणि

---

१४. विजापूर आधींच घेतलें होतें. मागें टीप ८५ पहा.

१५. याचें नांव 'यातिकदखान' असें होतें. संभाजीच्या मुलां माणसांस धरून घेऊन आणिल्यावर त्यास 'झुल्फिकारखान' असा किताब दिला. त्याच्याकडेच पन्हाळ्याचा सुभा असतां त्याचा हस्तक तुकरीबखान याणें संभाजीस धरिलें.

१६. इंग्रजींत 'जिंजी' असें या किल्ल्याचें नांव.

१७. शह मारी=कोंडमारा अतिशय.

१८. खत्रा=संशय, भीति.

शिवाजी राजे व मदनसिंग नाटक शाळेचे पोटीं होते व येसूबाईसाहेब आणखी नाटक शाळा एक दोन इत्यादि सर्व घेऊन खान सर्व दौलत खजिना, मालमत्ता, सोनें, रुपें, हत्ती, घोडे, व तक्ताचें सोनेंही सांपडलें तें घेऊन पादशहाकडे निघोन गेले. किल्ला खालीं करून आपले लोक त्यांणीं चेंढविले.[19] जुने लोक वगैरे यांस हरएकें[20] उपद्रव न केला. आणि पादशहापाशीं जाऊन शिवाजी राजे यांस भेट केली. शिवाजी राजे भेटालियावरि वरकड 'चोर' हा राजा 'साहु' आहे बोलिले, आणि बहुत प्रीति व आदर केला. नांव शाहू ऐसें जाहलें. हें वर्तमान बेगमेस कळलियावरि तेचक्षणीं पादशहास अर्ज केला कीं, "माझा बेटा हा, याविशीं याउपरि दुसरा विचार नसावा." म्हणून आश्वासन घेऊन महाराज व सर्व आपले भेटीस नेले. जवळ बसवून, फार प्रीतियुक्त बोलून, येसूबाई साहेबांस भेटून, त्यांचे समाधान करून बहुत आबरूनें जैसें उचित तैसेंच आपले डेऱ्या लगत, दुसरे कोणी जाऊं नये, असे मर्यादेनें जाळींत* ठेविली. खर्चाची बेगमी व शागिर्दपेशी[21] व दरमहा यथायोग्य नेमून आपण सर्व पाहून, पावतें करून, नित्य दोन वेळां जातीनें जाणें, समाचार घेणें, राजास अलंकार, वस्त्रें आदि लहान हत्ती बसण्यास व घोडीं वगैरे [देऊन] बहुतच आदर करिती झाली. आणि पादशहांनीं आपले बरोबर बाहेर चौकी पहारे ठेवून, "तुम्हीं या उपरि आपले लोक [ यांशीं मसलत ] अथवा कांहीं एक फितवा न करितां स्वस्थ असावें" सांगून समागमें ठेविलें. याप्रमाणें तेथें राहिले. ते समयीं जोत्याजी केशरकर करवीर प्रांतीं पुंजाळ गांवचे पाटील हे संभाजी महाराज यांजपाशीं सेवा करून इतबारी व कर्ते, शहाणे होते. शाहू महाराज बाळवय असतां त्यांस खेळवणें, शिक्षा लावणें [ याजकारितां ] ठेविले होते. ते महाराजांबरोबर गेले होते. त्यांणीं बेगमेकडे जाणें, बोलणें व पादशहाकडे जाणें, येणें वगैरे इतबारी कामांत तेच राहिले. याप्रमाणें संभाजी महाराज यांचे चरित्र समाप्त जालें.

[ चिटणवीस यांजकडील प्रत पाठीमागून मिळाली. सातारच्या व ह्या प्रतींत ८ पृष्ठ अखेर फेरफार आहेत ते येणेंप्रमाणें.]

---

१९. सूर्याजी पिसाळ नांवाच्या एका जुन्या नौकरानें वांईची देशमुखी व रायगडची हवालदारी मिळावी या लोभानें किल्ला सर करण्यांत मदत केली. ग्रां० ड०.

२०. हरएक=कोणताही.

* जाळी=पडदा.

२१. शागिर्दपेशा=परिचारक, सेवक.

| पृ० | ओ० | सातारा प्रत. | चिटणीस यांची प्रत. |
|---|---|---|---|
| १ | १२ | आज्ञा केली कीं. | आज्ञा केली आहे कीं. |
| २ | १४ | तसेच बंदोबस्त. | तसेच तेथील बंदोबस्त. |
| २ | ६ | सर्वांनीं निवारण करून. | सर्वांनीं एक विचारें निवारण करून. |
| २ | १३ | किल्ले दरवाजे. | दरवाजे किल्याचे. |
| २ | १४ | राखा‌ऱ्या. | अमात्या. |
| २ | १६ | पाचवड. | पाचाड. |
| २ | १२ | बोलावणें करविलें जे. | बोलाऊं केलें जे. |
| २ | २३ | पत्राचा विश्वास. | विश्वास पत्राची. |
| ३ | २ | मूल आवजी आहे. | मूल आवजी बावा आहे. |
| ३ | ६ | सुमंत करवीरीं. | सुमंत हे करवीरीं होते. |
| ३ | १५ | त्यांस बोलावून आणून त्यांस दबावून विचारले कीं. | यांस बोलावून आणवावे सांगितलें आणि आणून त्यांस दबावून विचारलें कीं, |
| ३ | १८ | किल्यावर हवालदार. | किल्लेदार हवालदार. |
| ३ | २१ | जवाहीर घेऊन. | जवाहीर वगैरे घेऊन |
| ४ | ५ | लक्ष राखून राजकारणें राखून करिते जाले. | लक्ष राखुन राजकारणें करिते जाले. |
| ४ | ६ | ऐसें केलें. | ऐसे दुलग पाडिलें. |
| ४ | २५ | चौकी पहाऱ्याचें काम. | चौकी पहारा खबरदारीचें काम. |
| ५ | ४ | चिणोन. | चालोन. ( ? ) |
| ५ | ६ | याप्रमाणें. | ऐसे परि व. |
| ५ | १२ | बहुत संपत्ती पाहून. | बहुत द्रव्य व सपत्ती पाहून. |
| ५ | १६ | रामदास स्वामींचें आलेले पत्र पाहून ठेवणेस दिलें. | याप्रमाणें श्री स्वामींचें पत्र आलें तें वाचून पाहून ठेवायास दिलें. [याचे पूर्वी चि० प्रतींत पत्र समग्र आहे तें पुढें दिलें आहे. ] |
| ५ | १८ | बावा अवलिया फकीर. | बावा याकुद अवलिया फकीर. |
| ६ | ६ | अमात्य वगैरे. | अमात्याचे वगैरे. |
| ६ | १० | राज्याभिषेक [ या पुढें ] | ‘यथाविधि विनायक शांति व पारेन्द्र ( ? ) शांति होम करून नंतर अभिषेक करून’ असे शब्द. |
| ६ | ११ | तों सूर्य० [ याजबदल ] | ते दिवशी सूर्य दर्शन न्हावें तें अस्तमानपर्यंत अभ्र येऊन न जालें. |
| ६ | २२ | पुंगदेव. | योगदेव. |
| ६ | २३ | बहु मान पोंचे त्यास. | बहुमान ज्याचे त्यास. |
| ६ | २५ | समाधिस्त जाहले. | समाधिस्त परळी किल्यावर होते जाले. |
| ६ | २७ | वश्यकर्ण. | वशीकरण. |
| ७ | २ | वाममार्ग. | वशीकरण मार्ग. |
| ७ | १० | युक्त अयुक्त. | सूक्त असूक्त. |
| ७ | १५ | पागी. | यागी. ( ? ) |
| ८ | २२ | बहिरोजी. | हिरोजी. |

[ पृ० ५ यांत ‘रामदास स्वामींनीं पत्र लिहिलें’ इतकेंच सातार प्रतींत आहे. चिटणीस यांचे प्रतींत समग्र पत्र दिलें आहे तें येथें देतों. मागें पृ० ५ टी० २६ पहा. ]

।श्री। अखंड सावधान असावें। दुश्चित कदापी नसावें। तजविजा करीत बैसावें।एकांत स्थळीं ॥१॥ कांहीं उग्रस्थिती सोडावी। कांहीं सौम्यता धरावी। चिंता [1]लागावी परावी। अंतर्यामीं ॥२॥ मागील अपराध क्षमावे। कारभारी हातीं धरावे। सुखी करून सोडावे। कामाकडे ॥३॥ पाटांतील तुंब निघेना। तरि मग पाणी चालेना। तैसें जनांच्या मना। कळलें पाहिजे ॥ ४ ॥ जनांचा प्रवाहो चालला। म्हणजे कार्यभाग आटोपला। जन ठायीं [2]ठायीं तुंबला। म्हणजे खोटें ॥५॥ श्रेष्ठीं जें जें मिळविलें। त्यासाठीं भांडत बैसलें। तरि मग जाणावें फावलें। गनीमांसी ॥६॥ ऐसें सहसा करूं नये। दोघे भांडतां तिसऱ्या जथें[3]। धीर धरूनी महत्कार्य[4]। समजूनि करावें ॥७॥ आधींच पडली धास्ती। म्हणजे कार्यभाग होय नास्ति। या कारणें समस्तीं। बुद्धी शोधावी ॥८॥ राजीं राखितां जग। मग कार्यभागाची लगबग। ऐसें जाणोनि। सांग समाधान करावें ॥ ९॥ सकळ लोक एक करावे। गनिमां लोटोनि[5] काढावें। येणें करितां कीर्ती धांवे। दिगांतरीं ॥ १० ॥ आधीं गाजवावे तडाखे। तरि मग भूमंडळ धाके। ऐसें न होतां धक्के[6]। राज्यास होती ॥ ११ ॥ समय प्रसंग वोळखावा। राग निपटून सांडावा। आला तरी कळों न द्यावा। जनांमध्यें ॥ १२ ॥ राज्यामध्यें सकळ लोक। सलगी देऊन करावे साफ। लोकांचे मनां मध्यें धाक। उपजोंचि नये ॥१३॥ बहुत लोक मेळवावे। लोक विर्चारें भरावे। कष्ट करोनी घसरावें। म्लेंछावरी ॥ १४ ॥ आहे तितुकें जतन करावें। पुढें आणीक मेळवावें। महाराष्ट्र राज्यची करावें। जिकडे तिकडे ॥ १५॥ लोकीं हिंमत धरावी। शर्तीची तरवार करावी। चढती वाढती पदवी। पावाल येणें ॥ १६ ॥ शिव राजास आठवावें। जीवित्व तृणा समान मानावें। इहलोकीं परलोकीं तरावें। कीर्तिरूपीं ॥१७॥ शिव राजाचें आठवावें रूप। शिव राजाचा आठवावा साक्षेप। शिव राजाचा आठवावा प्रताप। भूमंडळीं ॥१८॥ शिव राजाचें कैसें बोलणें। शिव राजाचें कैसें चालणें। शिव राजाची सलगी देणें। कैसी असे ॥ १९ ॥ सकळ सुखाचा त्याग। करोनि साधिजे तो योग। राज्य साधण्याची लगबग। कैसी केली ॥ २० ॥ त्याहूनि करावें विशेष। तरिच म्हणावें पुरुष। या उपरी[11] आतां विशेष ॥ काय ल्याहावें ॥ २१ ॥ *

---

१. 'चिंता लागावी पराची' पाठांतर. या पाठांत 'पराची लागावी' असा क्रम असावासें वाटतें. २. 'ठायींचे ठायीं' पा०. ३. 'तिसऱ्या जाय' पा० ४. 'मग कार्य' पा०. ५. 'गनीम निवटून काढावे' आणि 'गनीमां लोटूनि टाकावें' पाठांतरें. ६ 'धाके' पा० ७. 'जगामाजी' पा०. ८. लोकां विचारें भरावें' आणि 'एका विचारें भरावें' पाठांतरें. ९. 'अहंमती लोकीं धरावी' पा०. १०. 'बढती' पा०. ११. 'या परी' पा०.

*हें पत्र चिटणिसांचे प्रतींत दोन ठिकाणीं आलें आहे व 'रामदासाच्या बखरींत' ही आहे. या तिहींत फेरफार आहेत ते वर नमूद केले आहेत. पत्रांतील उपदेशाप्रमाणें संभाजीच्या हातून कांहीं घडलें नाहींच.

श्री.

# थोरले राजाराम यांचें चरित्र प्रकरण.*

श्रीमन् महाराज राजश्री राजारामसाहेब यांस संभाजी महाराजांनीं राज्य आक्रमण करून रायगडीं नजरबंद ठेविलें होतें. तेथें असतां संभाजी महाराज यांस औरंगजेब बादशहांनीं धरून नेलें आणि शेवट जाला. रायगडास बादशहांनीं जुल्फकारखान यांची कांहीं फौज देऊन रवानगी केली. ते निघाले हें वर्तमान समजलियावरि बहुत संकट प्राप्त होऊन, सर्व मुत्सद्दी व सरकारकून व सरदार जमा होऊन, पुढें विचार काय करावा, येथून निघोन सर्वांनीं बाहेर जाऊन मसलत करावी बळवावी, तरि संधी राहिली नाहीं. फौज पागा सर्व मोडलें गेलें. किल्ले यांचे बंदोबस्त व सामान पूर्वील § धारे मोडून बेसरंजाम जाले. बंदोबस्तास यथायोग्य जेथील तेथें माणसें ठेविलीं त्यांच्या घालमेली जाल्या. सेनापति अष्टप्रधान सर्व यांचे विध्वंस जाले. कर्तीं माणसें चार चहूंकडे लागलीं. हंबीरराव सेनापति वांईवर[1] संभाजी राजे यांणीं रवाना केले होते तेथें गोळा लागून पडले. मोरोपंत प्रधानही वारले. चिटणीस मारिले[2]. खजीना खराब जाला. राज्याचे अधिकारी शिवाजी राजे, संभाजी राजे यांचे पुत्र, लहान. वय पांच सहा वर्षांचें. यांस घेऊन व सर्व कुटुंब घेऊन निघोन गेलें असतां निभाव पडणार नाहीं. जिकडे जाऊं तिकडेच पैगंम[3] पाठीवर आधीं करितील.

---

* हेंही प्रकरण मल्हारराव राम चिटनवीस यांणीं रचिलें. रा० खंडेरावजी चिटणविसांकडून जीं प्रकरणें आम्हांकडे आलीं त्यांत हें दुबार लिहिलें आहे. खेरीज ह्या प्रकरणाचीच दुसरी एक प्रत पुणें येथें आम्हांस उपलब्ध झाली. ही प्रत त्रुटित आहे. ह्या प्रकरणाची एक प्रत सातार्‍यास असल्याचें कळतें. आमचे सातारकर मित्र ती मिळविण्याविषयीं तजवीज करतील तर तिचा ह्या समयीं पुष्कळ उपयोग होईल. असो. संभाजी महाराज व राजाराम महाराज यांचीं चरित्रें एका ठिकाणींच बांधतां यावीं म्हणून पृष्ठांचा क्रम न बदलतां तसाच सुरू ठेविला. चिटणिसांची व त्यांजकडून आम्हांस मिळालेल्या प्रकरणांची हकीगत पुढें देऊं.

§ धारे, धारा=नियम, वहिवाट.

१. विजापूरचें राज्य मोडल्यावर तेथील एक सरदार सरजीखान मोंगलाकडेस राहिला. त्याजला संभाजीचे मुलुखावर औरंगजेबानें पाठविलें. ह्या सरजीखानाशीं लढाई करून वांई येथें त्याचा हंबीररावानें पराभव केला. परंतु त्याच लढाईंत तो मारला गेला.

२. संभाजी महाराजांचें चरित्र पृ० ८ पहा.

३. पैगम=खटपट, प्रयत्न, धांवणी.

राजारामसाहेब सर्व गुणसंपन्न व वयेंकरून प्रौढ. कजाखी[4] करणें पडेल तशीं राजकारणें, लढाई करण्यास युक्त. यांणीं शिवाजी राजे यांस सिंहासन राज्याभिषेक करून, सर्व कार्य कारभार करून, दौलत सर्व गेली ती जमवावी. औरंगजेबा सारखा शत्रु यांणीं ग्राशिलें. त्यास जाहांबाजीचे[5] हुन्नेरें[6] गेलें राज्य साधवें. इतकें करण्यास युक्त आहेत.

[ असें ] म्हणून सईबाई[7] साहेब यांस सर्वांनीं पुढें विचार कसा करावा, विचारिलें. तेसमयीं त्यांणीं सल्ला सांगितली जे, "मुलाचें वय लहान, राज्य तरि गेलेंच, त्या अर्थी तुम्ही सर्वही पराक्रमी मनसबदार शूर यांणीं एक विचारें होऊन, राजारामसाहेब यांस घेऊन बाहेर पडावें. मुलास बाहेर जाऊन रहाणें यास जवळ जागा रायगडाहून बाकी ऐशी दुसरी नाहींच. त्या अर्थी मुलास व आम्हांस येथील बंदोबस्त करून येथें ठेवावें. तुम्हीं सर्वांनीं राजारामसाहेब सहवर्तमान बाहेर पडून, फौज जमा करून, प्रांताचा बंदोबस्त राखिला असतां सर्व मसलत[8] तिकडे आधीं वोढ पडेल. येथें कांहीं गिल्ला[9] पडणार नाहीं. तत्रापि थोडी बहुत मसलत पडली असतांही हा किल्ला बेलाग[10], मजबूद, वर्ष सहा महिने टिकाव पडेल. तों तुमचा सर्वांचा एखादे ठायीं जमाव पोक्त जाला म्हणजे आम्हांस काढून न्यावें. किंवा शत्रुचें प्राबल्य विशेष [ दिसतें ] त्या अर्थी चंदी चंदावर[11] प्रांतीं दम खाऊन पुन्हा मसलत बळावून राज्य साधनही करणें पडेल. तरि येसमयीं सर्व कुटुंब निघोन एकदांच सर्वांनीं शत्रूस हस्तगत व्हावें ऐसें होईल. पल्ला पोंहोचणार नाहीं. यास्तव राजारामसाहेब व त्यांचा कबिला ऐसे काढून निघोन जावें. सर्वांनीं एके ठायीं मोहास पडून राहिल्यास सारी मसलत[12] येथेंच पडून सर्वांनीं सांपडावें ऐसें घडेल." म्हणोन सांगितलें व "येविषयीं राज्याभिषेक करणें अथवा कांहींएक [ कृत्य संपादण्यास ] संधी राहिली नाहीं. राज्याभिषेक पूर्वींच झाला आहे, व सिंहासनाचे अधिकारी ईश्वरें निर्माण केले आहेतच. दैवेंकरून ऐसे शत्रूचा पराभव होऊन श्रीचें वरदान सत्य असल्यास सर्व गोष्टी शत्रुपराभव व राज्य स्वस्थ जालियावरि घडून येतील."*

---

४. कजाखी=( कजाख Cossack, Kosak. रशियाचे अग्नेय भागांत राहणारे प्रसिद्ध घोडेस्वार ) कटकट, मारामारी, लढाई.

५. जहांबाजी=हुशारी, वस्तादगिरी.

६. हुन्नर=युक्ति, हिकमत.

७. सईबाई-संभाजीची आई ! ती तर सन इ० १६५९ मध्यें मरण पावली असें इतिहासांतरीं आढळतें. 'सईबाईच्या' ठिकाणीं 'येसूबाई' असावेंसें दिसतें.

८. मसलत=स्वारी, मोहीम-मोंगलांची.

९. 'गलबल' पाठांतर.

१०. बेलाग=दुःसाध्य.

११ चंदी=( इंग्रजींत ) जिंजी. चंदावर=( इं० ) तंजावर.

१२. मसलत=स्वारी, हल्ला. वर टी. ८ पहा.

* येसूबाई मोठी शहाणी व धीराची बायको होती. मागें पृ० ८।९ व २१।२२ पहा.

या प्रकारें [ बाईंनीं ] सांगितलें तें सर्वांचे चित्तास बहुत योग्य मसलत ऐसें वाटून सर्वांसही हर्ष जाला. परंतु महाराज केवळ लहान. प्रसंग असा. एकटें ठेवून जाणें प्रशस्त वाटत नाहीं ऐसें राजाराम साहेबांसहवर्तमान संकट पडलें. तत्रापि मसलती करून करणें [ ? ] प्राप्त येऊन, किल्याचा बंदोबस्त सामान पोक्त व लोक वगैरे करणें तसा करून, कारभारी मुख्यलें यांस ठेवून, राजारामसाहेब यांणीं सर्व प्रधान व राहिले मुत्सद्दी व सेनाधिकारी व सरदार यांचीं समाधानें [ करून बोलले ] " येसमयीं पूर्वीं महाराजांनीं सर्वांस वाढविलें, तें लक्ष चित्तांत ठेवून मधील कारकीर्द जाली हें कोण्ही एकांनीं चित्तांत तिळप्राय वैषम्य आणूं नये. सर्वांनीं एकविचारें चित्तांतील विषण्णता[१३] सोडून, राज्याचे अधिकारी शिवाजी राजे पूर्वींचे तेच हे ऐसें लक्ष ठेवून, आम्ही कारभारी, आमचे आज्ञेत राहून, पूर्वींहून विशेष ज्याची जसी शक्ति त्याहून अधिक पराक्रम करून, औरंगजेब शत्रु यास जिंकून राज्य रक्षावें. येविशीं सर्वांची शफता प्रमाणें व्हावीं." म्हणून येसूबाई साहेब व शिवाजी राजे यांस बसवून, आपणांसुद्धां वाक्यता‡ केली. आणि पूर्वीं प्रतापराव गुजरांची सोयरीक झाली ती वारलियावरि संभाजी महाराज यांचे कारकीर्दीत दोन लग्नें जालीं. एक मोहिते यांची कन्या ताराबाईसाहेब, व एक कागलकर घाटगे यांची कन्या राजसबाईसाहेब, ऐशी केली होती. त्या दोनी स्त्रिया समागमें घेऊन व सर्व सरकारकून व प्रल्हाद[१४] निराजी व खंडो बल्लाळ चिटणवीस व संताजी घोरपडे व धनाजी जाधवराव व खंडेराव दाभाडे वगैरे सरदार जितके कार्य कर्ते माणूस तितके घेऊन निघाले. संभाजी महाराजांचें कुटुंब सर्व रायगडीं ठेविलें.

निघोन प्रतापगडीं येऊन देवदर्शन केलें. आणि सर्व किल्ले यांची हुषारी व सर्वांस पत्रें पाठविणें सामान जेथील तेथें लोक वगैरे आहे नाहीं हें पाहून, बंदोबस्त कराविले. राजाराम नांव, तसेच महाराज गंभीर व चतुर, शूर, धैर्यवान, सर्वांस वेध लावून मसलत मंत्र करणें या विषयीं परम विचक्षण, ऐसें सर्वांस भासून सर्व लोक महाराजांस वश जाले. कार्य करूं लागले. प्रतापगडीं श्रीदेवीची प्रार्थना केली. " प्रसंग तरि असा येऊन प्राप्त जाला. हें राज्य तुझें देणें. पूर्वीं वरप्रदान दिलें* ते लज्या तुजला. प्रसाद तुझा रक्षण करणें तसें करावें " म्हणतां श्रीदेवींनीं प्रसाद पुष्पें आंगावरील दिलीं. तीं मस्तकीं वंदन केलीं.

---

१३. विषण्णता=खिन्नता.

‡ वाक्यता केली=आणभाक घेतली.

१४. प्रल्हाद निराजी–हे पूर्वींच्या न्यायाधिशांचे चिरंजीव. यांणींच ह्या वेळीं पुढें सरसावून सर्वांचें एकमत करून मसलती केल्या.

* " तुझें घराणें सत्तावीस पिढ्या राज्य करील " असा शिवाजीस दृष्टांत झाला होता त्यास अनुलक्षून वरील वाक्य आहे. वर पृ० २३ आ० २४ पहा.

आणि तेथील किलियाचा बंदोबस्त करून, साताऱ्यास येऊन, तेथून परळीस जाऊन, श्रीरामदास स्वामींचे समाधीचें दर्शन घेऊन, पूजा प्रार्थना करून पनाळियास गेले. मध्यें राहून दम खाऊन लोक ठेवणें, फौजबंदी करणें, यास अवकाश पडून पाहून करण्यास मोंगलाच्या फौजा हिंडूं लागल्या. दाटी पडली. तेव्हां पनाळियास जाऊन पोहोंचले. तेथें जमाव करितात तों संभाजीचे भाऊ व सर्व सरदार पन्हाळ प्रांतीं जाऊन जमाव करितात हें पादशहास समजलें. त्यांजवरि फौज रवाना केली. तिकडे रायगडास जुल्फकारखान जाऊन पोहोंचून वेढा बसविला. तेव्हां पन्हाळियास राहणें ठीक नाहीं. विकट जागा सह्याद्री पर्वतांतील बांधारियाचे किल्यास जाऊन राहावें, म्हणजे पहाडांत जिकडे म्हटलें तिकडे जाणें, दम खाणें, यास युक्त पडेल व खालीं कोंकणप्रांत [तिकडून] रसद सामान, फौज, लोक येऊन पोहोंचेल म्हणोन विशाळगड रांगणाप्रांतीं गेले. सर्व देशांत पादशहाची फौज फिरूं लागली. राज्य व्यापिलें. पन्हाळ्यास वेढा घालून विशाळगड रांगण्याकडे फौजा धांवल्या. तेव्हां बहुत विचार दुर्घट प्राप्त जाला. सहा चार महिने दम खाऊन फौज मसलत बळावत नाहीं. एखादे किलियावर राहून किल्ला भांडवून दम खावा ह्मणतांही किल्लेबंद † झाले असतां परिणाम नाहीं. एखादे ठायीं बाहेर असतां दगा‡ झाला [तर] तेंही ठीक नाहीं. त्या अर्थी कबिले एखादे किल्यावरि ठेवून जमाव येथून फोडावा. जिकडील तिकडे वारापाणी करून गेले फुटले ऐसें करून, सर्वांनीं ज्यांस जसें कळेल तसे दहा पांच एकटे दुकटे ऐसें करून व मोगलाईत रोजगारास जातों ऐसें करून, पागा घोडे जसें निभावेल तें करून चंदीस येऊन पोहोंचावें. आपण सडे होऊन पांच पंचवीस मुत्सद्दी सरदार ऐसे वेश बदलून जंगम लिंगाईत कापडी[१५] यांचे वेश घेऊन चंदीस जाऊन पोंचावें. कबिल्यापाशीं रामचंद्र निळकंठ[१६] यांणीं या प्रांतीं राहून आह्मी तिकडे गेलियावरि कबिलेही युक्तीनें काढून पोहोंचवावे. रायगडचीही बातमी वरचेवर राखून तीही काढून आणून तिकडे युक्तीनें शिवाजीराजे कबिले पोहोंचतसे करून आपण याच प्रांतीं राहून संस्थानें जतन होतील तीं करून, पुढें जसा विचार सुचेल तसें करावें ह्मणोन सांगोन ठेविलें. आणि चंदीस निळोपंत प्रधान व हरजी महाडीक पूर्वी संभाजी महाराज यांणीं

---

† किल्लेबंद=किल्यांत कोंडलेला.

‡ 'दगा' किंवा 'दंगा'

१५. कापडी=जपमाळा, गंगोदक इत्यादि विकणारे व भगवी पताका घेऊन एका क्षेत्राहून दुसऱ्या क्षेत्रास जाणारे गोसांवी; यात्रेकरू.

१६. रामचंद्रपंत बावडेकर यांस 'हुकुमतपन्हा' हा किताब देऊन इकडील सर्व घाटमाथ्याचा कारभार त्यांजकडे सोंपविला होता. कबिले=स्त्रिया.

पाठविले ‡ होते त्यांस इकडील सर्व वर्तमान लिहून, " तुम्ही त्या प्रांतीं फौज व जमियत व स्थानें बहुत बहुत खबरदारीनें रक्षावींत. कायम असावें. तों आम्हीही हरतऱ्हेनें तुह्मांपाशीं येऊन पावतों. ऐशीं पत्रें लिहून व शहाणीं माणसें इतबारी यांजबरोबर सांगोन पाठविलें. आणि मुत्सद्दी व सरदार यांचे सर्वांचे मसलतीनें ठराव केला. लांबचा पल्ला निभावून गेलें पाहिजे म्हणोन गौप्यरूपें जावें. त्याजवरून संताजी घोरपडे व धनाजी जाधवराव व खंडेराव दाभाडे व प्रल्हाद निराजी व खंडो बल्लाळ चिटणीस ऐसे [ यांणीं ] महाराजसुद्धां लिंगाईत वाण्याचे वेष धारण केले. आणखीही कोणी सरदार मातबर यांस वेष देऊन सर्वांनीं एक मार्गें जावें हें ठीक नाहीं, घोळका न दिसावा, म्हणोन निराळे निराळे लावून दिल्हे. आणि गोकर्णावरून सैं‍ध्यावरून श्रीव्यंकटेशावरून बेंगरूळावरून जावें [ असें ठरविलें. ] सोबत लोक आणखी निघाले. ते बेंगरूळपर्यंत जाऊन पावले.

तेथें महाराजांचे पाय धुतां पाणी पायांवर घातलें. ते समयीं तेथील लोकांनीं पाहिलियावरि कानडे भाषेनें चर्चा केली कीं, " हे कापडी दिसतात, परंतु पायांवरि पाणी घालून पाय धुवून घेणार, तेव्हां कोण्ही मातबर आहेत." असें आपले भाषेनें बोलतां यांतही कोणी भाषा जाणणार[१७] होते त्यांणीं ऐकिलें. कानडे निघोन कोटांत गेले. तेथें ठाणें औरंगजेबाचें बसलें होतें. तेव्हां बोलणें समजणारासि सांगितलें. यावरून बहुतच दुर्घट प्रसंग पडला जे परिणाम ठीक दिसत नाहीं. कसें करावें ? म्हणतां विचार करितां खंडो बल्लाळ चिटणीस यांणीं सांगितलें कीं, " घाबरे न होतां महाराज व संताजी घोरपडे व जाधवराव व दाभाडे यांणीं एक मार्गें जावें. प्रल्हाद निराजी वगैरे यांणीं राहिले सर्वांस घेऊन एक मार्गें जावें. निघावें. आम्ही आमचे दोन चार आसामी आहेत ते घेऊन येथें राहातों. चौकशी पडली असतां कजाखी करून जावें. न सांगतां सुटून येऊन प्रल्हाद निराजी याणीं आमके स्थळीं दम खावा तेथें पोहोंचूं. न घडल्यासही कोठें तरि जाऊन गाठूं. सर्वांनींच गेलें असतां मागून धांवणें येईल." म्हणून काढून दिले.

ते गेलियावर कानडे यांणीं कोटांत वर्तमान सांगितलें. हे स्वयंपाक करून जेवितात तों चौकी आली. यांस धरून नेलें. कोण ह्मणोन विचारिलें. " कापडी, यात्रेकरू, श्री रामेश्वरीं जातों. दहा पांच आणखी होते ते जिकडे जाणार तिकडे गेले. आम्हांस दुसरीकडे जाणें ह्मणोन राहिलों." सांगितलें

‡ रघुनाथपंत हनमंते यांच्या मरणानंतर मागें पृ० १३ पहा.

१७. खंडेराव चिटणीस यांणीं. ग्रां० इ०.

असतां त्यांस मारहाण करूं लागले. डोईवर दगड दिले. चाबूक मारिले, परंतु कापडीच ह्मणोन सांगितलें. शेवट राखेचा तोबरा दिला असतांही आह्मी यात्रेकरू म्हणून सांगितलें. तेव्हां सर्वांनीं सांगितलें जे " यात्रेकरू हें खरेंच. तसेंच असतें तरि इतके मारापुढें बोलते. यात्रेकरू यांस पीडा करणें ठीक नाहीं." तीन चार दिवस कैदेंत ठेविलें. तीन उपोषणें झालीं. यांणीं " आह्मी यात्रेकरू बंदांतून सुटल्यावांचून अन्न-ग्रहण करीत नाहीं, " ऐसे आग्रह धरून बसल्यावरि सोडून दिलें. ते संकेताप्रमाणें तेथें जाऊन प्रल्हाद निराजी वगैरे एक जागां जाहले. आणि पुढें गेले. महाराजही चंदी नजीक जाऊन पोहोंचले. तेथें यांणीं सर्वांनीं जाऊन गांठिलें. एकत्र जाले. आणि चंदीस पूर्वी लिहिलें होतें, आणखी लिहून पाठवून सूचना केली.

हें वर्तमान प्रधान व महाडीक व तेथें हणमंते[18] होते त्यांस कळलियावरि महाडीक सर्व सलेतनत[19] घेऊन येऊन महाराजांचे दर्शन घेऊन सर्वांस मंगळस्नान करून वस्त्राभरणें देऊन चंदीस घेऊन गेले. पोहोंचले. तेथें राजधानी व सर्व दौलत इकंडील[20] दौलत जमली ऐशीच होती ते करूं* लागले. महाराज पोंचले हें देशीं समजलियावरि कितेक सरदार कारकून लोक राज्यांतील कर्ती माणसें तितकीं हर प्रकारें नानावेष धरून, बैलावर बसोन, ज्यास जसें कळलें तसे गुप्त, प्रगट, रोजगार निमित्य, जाऊन पोहोंचले. त्यांचे सत्कार करणें, त्यांस योग्यता तसें वाढवणें, घोडीं हत्ती देणें, ऐसें करून फौज व जमाव पाडिले[21].

या समयांत जुल्फकारखान यांणीं दहा महिने रायगडीं बसोन तह करून शिवाजी राजे यांस व सर्व मालमत्ता घेऊन गेले. पन्हाळ प्रांतीं फौजा गेल्या. कोकण प्रांतांत पाऊस बहुत झाडी टिकाव नाहीं. रामचंद्रपंतीं विशाळगड, रांगणा बळावून जागां जागां फौज घालवणें, मारणें, करूं लागले. याजवरून पादशहांनीं राजाराम जाऊन चंदीस पावले, तिकडे फौज वगैरे जमाव पडिले[22], रायगडीं संभाजीचे बेटे होते तेही हस्तगत जाले, याउपरि किल्लेकोट यांस उगेंच माणूस मोठी मसलत करून खराब करावे हें विशेष नाहीं; पन्हाळा प्रांत हस्तगत जाला, रांगणा किल्ला व कोंकण बांधारीचे[23] किल्ले परजन्य काळ यांत फौजेचा टिकाव होऊन येत नाहींत म्हणोन पन्हाळा येथें सरदार व थोडी बहुत फौज ठेवून त्यांसच सोई सोईनें किल्ले घ्यावे सांगितलें. आणि

---

१८ हे हणमते जनार्दनपंत होत.

१९ सलतनत=चतुरंगदळ, सर्वप्रकारची फौज.

२०. इकडील=देशी, महाराष्ट्रांतील.

* दौलत करणें=राज्योपभोग करणें.

२१. पाडिला=मिळविला; वाढविला.

२२. पडिला=मिळाला, वाढला.

२३. बांधारी=( बंधारा ) शिखरांची किंवा किल्यांची रांग? बाजू? मागें पृ० २८ ओ० १ पहा.

आपण सारी फौज घेऊन निघाले. प्रांतांत सर्व अम्मल बसविला. कांहीं किल्ले घेत चालिले. परंतु राजाराम चंदीस पोहोंचले, तिकडे जमाव पडला, हें वर्तमान जेथें बिकट जागे[२४] व मर्द माणसें होतीं त्यांजला [ समजतांच ] दम घेऊन जवामर्दीनें राखिते जाले. जेथें मोंगलांनीं बहुतच लगट केला, जोर पडला, ते[२५] गेले. पादशहांनीं मसलत मनांत आणिली कीं, इकडील राज्य हस्तगत जालेंच आहे. परंतु राजाराम तिकडे जाऊन पुन्हा पूर्ववत् फौजेनशीनें[२६] जाले. खजिनाही जाला. व दौलत प्रांतही जाला. तिकडेच स्वारी जावी फौज पाठवावी तरि इकडील किल्ले बांके, व माणूसही पदरीं कजाक[२७]. फिरोन अंमल करतील. यास्तव तूर्त या प्रांतींच असावें म्हणोन कर्नाटक प्रांतींचे सरदार चाकर माहीत होते ते व कांहीं फौज देऊन त्यांचे तोंडावर पाठविलें. आपण छावणी करून भीमा गंगामध्यें ‡ राहिले. [ इकडे ] चंदी प्रांतीं राजाराम गेले त्यांणीं फौजबंदी करून घोरपडे व जाधवराव यांस मुलकांत व फौज आली त्याजवर पाठविलें. लढाया होऊन त्या फौजांचें चालूं दिलें नाहीं. यानंतर खासा पादशहा सिंहगडास येऊन मोर्चे देऊन एक वर्ष छावणी करून सिंहगड पुरंदर हे किल्ले घेतले. मधीलें[२८] किल्ले किरकोळ घेऊन तिकडेच छावणी करून राहिले. महाराजांची फौज हिंडूं लागली. आपले[२९] लोक गेले त्यांचे वस्तु[३०] कांहीं होत नाहीं म्हणून जुल्फकारखान यांस फौज देऊन, त्यांजबराबर सरदार दाउदखान व किलीजखान ऐसे चंदीवर रवाना[३१] केले.

इकडे रामचंद्र निळकंठ यांणीं बांधारीचे किल्ले विशाळगड रांगणा वगैरे बळावून जवामर्दीनें खालीं प्रांतांत स्वारिया करून मारून नेऊन बेजमी करावी. कोंकण प्रांतही राखावा. जेव्हां त्यांचे कोणी आल्यास लढावें. पुनः जवळील मुलूख राखून असावें. ऐसें करूं लागले. राहिले. महाराज चंदीस असतां [ तिकडे ] सरदार गेले. भोसले, पवार, आटोळे, पांढरे, बंडगर व कोकाटे, देवकांते, महार्णवर, कडू व कांकडे, वाघमोडे, ढमढेरे, थोरात वगैरे यांणीं जाऊन, आपणास सरंजाम चौथ देशमुखीचा लावून, लोकांच्या सरदाऱ्या व किताब

२४. जागे=( मराठ्यांचे ) किल्ले, गढ्या वगैरे.

२५. ते=जागे.

२६. फौजेनशीन=फौजबंद. 'फौजेनिशीं जाले' पाठांतर.

२७. कजाख=भांडखोर, लढाऊ. वर पृ० २६ टी० ३ पहा.

‡ पंढरपुरानजीक ब्रह्मपुरी येथें, इ० स० १६९७ साली, बादशहाचा तळ पडला. एल्फिन्स्टन.

२८ राजगड, पांडवगड वगैरे आणखीही किल्ले १७०१ मध्यें घेतले.

२९. आपले=पादशहाचे. 'तिकडे लोक गेले' असें पाठांतर आहे त्यांत 'तिकडे' म्हणजे महाराजांचे फौजेवर असा संबंध.

३०. वस्तु=हातून.

३१. स० इ० १६९१.

देऊन [ ज्या प्रांताच्या ] सनदा द्याव्या त्या प्रांतांत जाऊन पाळेगारीने मुलूख मारून, चौथ सरदेशमुखी घांसदाणा अंमल बसवून राहातो ऐसें ज्यांनीं ह्मटलें त्यांस त्या प्रमाणें किताब व सरंजामाच्या सनदा करून देऊन रवाना केलें. त्यांणीं येऊन आश्रयें करून झाडींत रहावें. पाळेगारी करून त्या त्या मुलकांत अमल बसवावा, घ्यावा. फिरोन पळावें. ऐसें करूं लागले. व तिकडे पयकें लोक चाकरीस ठेवून चाकरी करावी. ऐसें करून पराक्रमें पुढें राज्य क्षयास न जाणें वृद्धि व स्थिति होय या योगें घडूं लागलें. पवार वगैरे सर्व बहुतच श्रम करूं लागले. याजवरून पवार यांस विश्वासराव किताब दिला. आटोळे यांस समशेरबहादूर किताब दिला. चौथ व सरदेशमुखी दक्षणेचा अमल जसा हात पोंचेल तसें घेत जावें सांगितलें. जसा शिवाजी महाराज यांणीं प्रताप करून अंमल बसविला तसेंच करूं लागले. चंदी प्रांत बहुत द्रव्याचा, सुवर्णाचा मुलूख, राज्य बहुत चांगलें. लोकांस तैनाता पूर्वील धारेप्रमाणें सरंजाम गांव लावून दिले. आणि सर्वही प्रधान, सर कारकून, सरदार लोक भाग्यवान [ होत ] ऐसी संपत्ती. सुखी सर्व झाले. जे जे गेले त्यांस त्यांचीं पूर्वील पदें ३२महाराजांनीं दिल्हीं तीं त्यांचीं त्यांजकडे व ज्यांचे दरख, कारखाने, महाल त्यांचे त्यांस स्थापून ज्यांची जशी योग्यता तसे वाढवून महाराज ज्यांजवर कृपा करीत होते त्याहून अधिक त्यांजवर करावी. मातबर सरदार व सर कारकून प्रधान यांचे विचाराखेरीज व मसलतीखेरीज तिळमात्र कार्य करूं नये. दुर्व्यसन व नीचाचा सहवास न करणें व दुर्व्यसनी यांचा बहुत तिरस्कार. ऐसें करून सर्वांस बहुत प्रियकर ऐसें राज्य पूर्व मर्यादेप्रमाणें पूर्वी धारे महाराजांनीं करून दिल्हे त्या अन्वयें चालवूं लागले. आणि राज्याचे अधिकारी शिवाजी राजे यवनांचे कारागृहांतून सुटतील त्यांस राज्याभिषेक करावा म्हणून आपण राज्याभिषेक न करितां सुमुहूर्ते मंचकारोहण करून आपले नांवें राजमुद्रा करून राज्य चालविते झाले. प्रल्हादपंत शहाणे, बहुतच कर्ते निघाले. त्यांचे ठायीं बहुत विश्वास सर्व मसलतीचे मुळापासून माहीत. तजविजा करणें [ वगैरे गोष्टींत ] अध्यक्ष तेच केले. त्यांस अष्टप्रधानांतील सरकारकून पद द्यावें तरि सर्वही ज्याचे ते आले. तेव्हां यास काय सांगावें [ हा ] विचार करून आपले प्रत्यम्नेंच३३ हे वास्तव प्रतिनिधी ऐसें पद नवेंच योजना करून* राज्याभिषेक [ शक ] एकोणीस व शालीवाहन शके

३२. महाराज—थोरले—शिवाजी.

३३. प्रत्यम्न=प्रत्याम्नाय ? ' प्रतिभेचे ' पाठांतर.

* शिवाजीच्या शकास ' राज्याभिषेक ' शक असें नांव आहे. अर्थात् याचा प्रारंभ इसवी सन १६७४ पासून.

१६१४ अंगिरानाम संवत्सरे यांत प्रतिनिधिपद प्रल्हाद निराजी यांस चंदीचे मुक्कामीं कृपा करून दिलें. प्रतिनिधीपद पूर्वी थोरले महाराज यांचे कारकीर्दीत राज्याभिषेक-समयीं युवराजा म्हणोन प्रतिनिधी हें पद देण्याचें तें पुत्रास किंवा बंधूस [ द्यावयाचें. ] बंधु नाहींत तथापि [ सावत्र ] आहेत ते अव्यवस्थित. तत्रापि शिक्षेकडून प्रौढतेस आणोन त्यांस पद द्यावें तरि ते चंदावर प्रांतीं पृथक राजधानी वडिलोपार्जित करीत आहेत. ज्येष्ठ पुत्र संभाजी राजे यांस युवराज पद द्यावयाचें, परंतु आज उपयोगी नाहीं. अव्यवस्थित [ आहेत ] म्हणोन कनिष्ठ पुत्रास पद द्यावें तरि ज्येष्ठ पुत्र असतां देतां नये म्हणोन पद अनामत ठेविलें होतें. तें पद हल्लीं मनांत आणोन मशारनिले [ प्रल्हादपंत ] यांची योग्यता जाणोन राजाराम साहेब यांणीं मशारनिलेस युवराज-पद [ म्हणून ] दिलें. * मुख्य प्रधान याजप्रमाणें सन्मानानें, वस्त्रें, जवाहीर, ढाल, तलवार, शिक्के, कटार, चौघडा जरीपटका, तुरा, झगा, हत्ती, घोडा, साहेबनौबद ऐसें देऊन राजपत्रावर प्रधानांचे मुद्रेपाशीं उजवे बाजूस यांची मुद्रा दुसरी व्हावीसें करून दिलें.

धनाजी जाधवराव यांणीं देशींहून चंदीस येतांनां मार्गांत बहुत मेहनत केली. शूर, मर्द, चंदी प्रांतीं पादशाहाकडील फौज आली असतां आपली फौज घेऊन जाऊन शर्तमर्दीनें लढाई करीत. म्हणोन [ महाराजांनीं ] नवांजीस बहुत करून जयसिंगराव हे किताबत पूर्वी पन्हाळे मुक्कामीं दिलीच होती, हल्लीं त्या किताबतीस सेनापतीप्रमाणें सन्मान साहेबनौबतसुद्धां देऊन वाढविलें. महादजी नाईक पानसंबळ यांस सेनापति पद[३४] दिलें.

संताजी घोरपडे पूर्वी महाराजांचे नवांजीस,† इतबारी, देशींहून येतां बहुत उपयोगीं पडले व चंदीस आलियावरि फौज घेऊन हिंडणें, पादशाई फौज आली त्याशीं लढाई करणें, मर्दुमीनें करूं लागले; याजवरून संताजी घोरपडे [यांस] हिंदूराव ममलेकत[३५] मदार ऐसा किताब दिल्हा.

---

* ही 'प्रतिनिधि' पदाची मूळपीठिका 'चिटणीस' प्रतींत नाहीं. 'इंदूर' प्रतींतून घेतली आहे. ही प्रत राव बहादूर नीळकंठ जनार्दन कीर्तनें यांणीं श्री० किबे साहेब यांजकडून मिळवून दिली. ही कोल्हापूर येथील महाराजांचे चिटणीस यांजकडील प्रतीची नक्कल आहे असें कळतें. ह्या 'इंदूर' प्रतीविषयीं विशेष हकीगत पुढें देऊं. एकंदरीत पाहतां हिजमध्यें दिलेला वृत्तांत चि० प्रतींतील वृत्तांतापेक्षां ज्यास्त खुलासेवार आहे. दोहोंच्या भाषेंत फरक पुष्कळच आहे. वृत्तांतांत फरक दिसेल तो जागोजाग देऊं.

३४ पानसंबळ देशींच होता. चंदीस गेला नव्हता. ग्रां० ड०.

† महाराजांचे नवांजीस=शिवाजी महाराजांनीं नांवाजलेले, त्यांच्या शिफारशीचे.

३५. ममलकत मदार=प्रांताचा मध्य, देशांत मुख्य, श्रेष्ठ.

यानंतर **चंदी**स गेलियावरि तेथें नाटकशाळी[३६] **स**गुणाबाई इजला पुत्र बहुत चांगला जाला. तो बहुत चांगला सुरतपाक[३७] जाला. त्याजवर **म**हाराजांची बहुत प्रीति जाली. त्याचें नांव **रा**जा **कर्ण** ऐसें ठेऊन त्याजला इतमाम पांच हजार फौजेचा सरंजाम सरदारी ऐसें करून, महाल लावून त्याचा कारभार दिवाणगिरी **नि**ळो **ब**ल्लाळ **चि**टणीस यांस दिली व **प्र**धान यांजबराबर चिटणीसाचे कामावर [ ही ] गेले. असे दोन्ही धंदे मशारनिल्हेस सांगितले.

त्याजनंतर **रा**यगडींहून **शि**वाजी राजे व **ये**सूबाई साहेब पादशहास हस्तगत जालीं. त्यांणीं बहुत मर्यादें करूनच ठेविलीं. त्यांचे आणवणें [याचा] निरोपायच जाला. आपलें वर्तमान त्यांस पोंचवणें [व] त्यांजकडील वर्तमान आपणांकडे आणवणें हें काम अति विश्वासूक थोरले **म**हाराज यांजपाशीं **भ**क्ताजी हुजरे व [३८]बंकी **गा**यकवाड हे [ दोघे होते ते ] उभयतां अन्यवेष फकीर, बैरागी, इत्यादि वेष धरून जावें यावें निरोप पोंचवावा आणि आणावा. हा पाठ करून असतां, त्याकाळीं **ये**सूबाई साहेब यांचा निरोप [ आला ] जे, येथें "आम्हांस आणवून बेगम यांचा पुत्र **शि**वाजी राजे [ झाले तेव्हां ] हे आपले नातू असें मनांत आणोन [ पादशहांनीं ] मरातब[३९] राखून ठेविले आहेत. आपण आपला इलाखा[४०] पृथक करून कबिल्यासुद्धां निघोन गेलेत, आणि आमचे निसबतीचा कबिला टाकून गेलां हें पादशहाच्या मनांत भरोन [ ते ] लोभ बहुत करितात. आपला आमचा संकेत आहे, तो परस्परां मनोमन आहे. आम्हांस येथून हर तऱ्हेनें नेऊन नंतर आपले कुटुंबास व आम्हांस एकदांच **चंदी**स घेऊन जावें तेव्हां एके ठिकाणीं व्हावें असा मनांत संकेत करून [ तुम्हीं ] **त्रि**शाळगडीं कुटुंब त्रिवर्ग बायका ठेविल्या. त्यास आपण **चंदी** प्रांतीं, बाया या प्रांतीं, [ असें ] रहाणें हें चांगलें नव्हे. आपल्यास पुत्र जहाला ह्याचा आम्हांस आनंद वाटला, परंतु आपली व त्यांची भेट नाहीं हें बरें नव्हे. आम्ही येथें सर्वोपरि सौख्यांत आहों, परंतु अति विषवत महान संकटांत आहों. ईश्वर-इच्छेनें व थोरले **म**हाराज यांचे पुण्यप्रभावें करून यांतून पार होऊं तो सुदिन. आपले मनोरथ पूर्ण करणार **श्री**देवी व **श्री**स्वामी समर्थ आहेत. यास्तव आपण राज्यचिन्हादिक वाळगून पूर्वील चालीप्रमाणें सर्व व्यवहार करीतच आहां त्याप्रमाणें करून बाया **त्रि**शाळगडीं ठेविल्या आहेत त्या घेऊन जाव्या. यास अनमान

---

३६. नाटकशाळा=वेश्या. **स**गुणाबाई हे नांव **चि**० प्रत देत नाहीं.

३७. सुरतपाक=सुंदर चेहऱ्याचा, देखणा.

३८ "बकी ति द्वारपालकः" राजव्यवहार कोश.

३९. मरातब=पदवी, मान.

४० इलाखा=भाग, वाटा, कुटुंब.

करूं नये." याप्रमाणें निरोप उभयतांनीं सांगितला. त्याजवरून बहुत संतोष होऊन येसूबाईंचे गुणानुवाद [ महाराजांनीं ] बहुत वर्णन केले, आणि शिवाजी महाराज यांजबद्दल बहुत श्रमी जहाले. त्यांचा आमचा ऋणानुबंध दर्शन घडावयाचा योग ईश्वरानें योजिला असेल ते दिवशीं घडेल. येसूबाई साहेब यांच्या निरोपाची अवज्ञा करूं नये.[४१] [ असा विचार केला. ].

तेव्हां विशाळगडीं ताराबाई साहेब आहेत त्यांस आणावीं, परंतु मार्गें करून निभाऊन येतात कशीं हा विचार बहुत पडला. मध्यें सर्व प्रांतांत जागां जागां पादशहाचीं ठाणीं बसलीं. फौजा हिंडतात. आपली फौज जाती त्यांचे झगडे लढाई होऊन मुलूख मारितात. कबिले येणें कसें घडतें? याजवरून जलमार्गानें आणावीं, राजापूर येथें खंडो बल्लाळ यांचे मातुल लिंगो शंकर व विसाजी शंकर सावकारी करून रहातात, तारवेंही त्यांचीं चालतात, विश्वासूही आहेत. जलमार्गें येणें तरि गुप्तरूपें राजस्त्रिया ऐसें न कळतां कोणा एकाचें कुटुंब येतें ऐसें करून आलें पाहिजे. याजवरून सरकारचे विश्वासू कारकून हुजरे व खंडो बल्लाळ, यांजकडील कारकून पत्र ऐसे रवाना केले. ते येऊन राजापुरीं पावले. याचे पूर्वीं ताराबाईसाहेब चंदीस महाराज यांची स्वारी जातांना महिन्या दोन महिन्यांची गरोदर होतीं, त्यांस पुत्र विशालगडींच जाले. शके १६१३ प्रजापति संवत्सरे.[४२] त्याचें नांव राजा शिव [ असें ठेविलें;] कारण पूर्वीं कैलासवासी महाराजांचे मुखांतून भविष्योत्तर "शिवनामें राजा होईल तो दिल्लीपर्यंत राज्य सोडवील," त्याजवरून त्या आशयें करून ताराबाई साहेबीं तेंच [ नांव ] ठेविलें होतें.[४३] राजापुरींहून हुजरे व कारकून यांणीं रामचंद्रपंत यांजकडे कळविलें. त्याजवरून त्यांणीं विसाजी शंकर आणून जाण्याचा विचार वगैरे सर्व पक्केपणें करून, हे विश्वासू खंडो बल्लाळ यांचे आप्त, यांजबरोबर बायांची रवानगी करावी ऐसें सिद्ध करून ताराबाईसाहेब पुत्रासुद्धां, राजसबाई

---

४१. हा येसूबाईच्या व शाहूच्या निरोपाचा मजकूर चि० प्रतींत नाहीं. इं० प्रतींत मात्र आहे.

४२. "शके १६११ शुक्लनाम संवत्सरे" इं० प्र०.

४३. "कारण थोरले शिवाजी पादशहापाशीं असतां त्यांचें नांव तेंच ह्यांचें ठेवावयाचा भाव [ असा कीं, ] कैलासवासी थोरले महाराज यांचे मुखांतून भविष्योत्तर निघालें जे, शिवनामें राजा होईल तो दिल्लीपर्यंत राज्य सोडवील. संभाजी राजे यांचे पुत्र त्यांचें नांव शिवाजी [ पण ] तो बंदीस आहे. सुटून येईल; राज्य करील, असा अर्थ नाहीं. हा पुत्र जो जहाला त्याचा पिता पराक्रमी [ आहे ह्मणून ] हाच दिल्लीपर्यंत राज्य सोडवील, असा आशय करून ताराबाई साहेबीं पुत्राचें नांव शिवाजी ठेविलें होतें." इं० प्रत. थोरले शिवाजी=संभाजीचा मुलगा शाहू.

साहेब व अंबिकाबाई साहेब[४४] घाटाखालीं रवाना केलीं. तीं त्यांचे जहाजांत बसोन निघालीं; बराबर त्रिंसाजी प्रभुही गेले. येशवंतगडचे बंदरांत बसोन मध्यें एकेठायीं बंदर करून उतरून, पुन्हा जाहाजांत बसोन, चंदी प्रांतीं जहाज लावून चंदीस पोहोचलीं. याजवरून महाराज त्यांजवर बहुत कृपावंत होऊन, त्यांची तारीफ करून, विश्वासू खरा म्हणून जाहाजांत बसलीं तो गांव ठिकाणें त्यांस इनाम देऊन राजपत्रें करून दिल्हीं. चंदीस गेलियावरि राजसबाई साहेब यांचे उदरीं पुत्र जाले. शके × × × × त्याचें नांव महाराजानीं ज्येष्ठ बंधूचें संभाजी राजे [असें] ठेविलें. शके १६१५ मध्यें श्रीमुखनाम संवत्सरीं अंबिकाबाई साहेब यांस कन्या[४५] झाली ती थोडक्या दिवसांत निवर्तली.

[ इकडे ] सेनापति पानसंबळ वारले. कर्तृत्वही विशेष नव्हतें. याजवरून संताजी घोरपडे यांस सेनापति [ पदवी ] दिली. परसोजी भोसले यांस सेनासाहेब सुभा दिल्हा. सन्मान सेनापतीप्रमाणें, वस्त्रें दिलीं, जरीपटका दिल्हा. सिदोजी नाईक निंबाळकर बहुत कार्यकर्ते जाले, त्यांस सरलष्कर ऐसें पद देऊन सन्मान सेनापतीचे बरावरीचे, जरीपटका, चौघडा दिल्हा. चंदीचे कारकीर्दींत अष्टप्रधान व सरदार केले, किताब दिल्हे त्यांचीं नांवें:—

१. प्रतिनिधि पद प्रल्हाद निराजी यांस दिलें. ते कायम. याचा मजकूर सदरीं सविस्तर लिहिला आहे. कलम.

१. निळो मोरेश्वर पिंगळे मुख्य प्रधान. कायम. कलम.

१. अमात्यपद [प्रथम] रामचंद्र नीळकंठ यांजकडे होतें. चंदीस स्वारी गेल्यानंतर रघुनाथराव तिमाजी हणमंते हे बहुत कर्ते, पूर्वींचे मुजुमदार मालोजी राजे व शहाजी महाराज यांजपासून [ होते, ] त्यांजकडे थोरले महाराज यांणीं निळो सोनदेव यांसि मुजमी सांगितली होती, परंतु हणमंते यांजकडे सांगितल्यानंतर जनार्दन तिमाजी मुजमी करीत असतां राज्याभिषेक समयीं रामचंद्र नीळकंठ यांस अमात्यपद सांगितलें. थोरले महाराज असतां पुन्हा रघुनाथराव यांसि [ हें ] पद सांगिलें होतें. त्यानंतर कर्नाटकच्या बंदोबस्तास हणमंते राहिले सबब संभाजी महाराज यांणीं रामचंद्रपंत यांस अमात्यपद सांगितलें होतें. सांप्रत चंदीच्या मुक्कामीं हणमंते बहुत उपयोगीं पडले, आणि देशीं रामचंद्रपंतही उपयोगीं [ पडले सबब ] उभयतांची भीड सारखी, उभयतां कर्तेही सारखे, परंतु हणमंते यांचें म्हणणें पूर्वींपासून आमची मुजमी [ आहे ती ] आम्हांस

४४. 'अंबिकाबाई' हें नांव इं० प्रतींत मात्र आहे. चि० प्रतींत दोनच स्त्रिया होत्या असें आहे.

४५. हा अंबिकाबाईचा मजकूर चि० प्रतींत नाहीं.

सांगावी, त्याजवरून रघुनाथराव तिमाजी यांस अमात्यपद सांगितलें. रामचंद्र नीळकंठ यांस हुकमतपन्हीं[४६] किताबत दिली, परंतु ते हुकूम जे करितील ते छत्रपतींनीं मोडूं नये असें केलें. अष्टप्रधानांप्रमाणें योग्यता देऊन विशाळगड मुक्कामास [ त्यांस ] वस्त्रें पाठविलीं. कलम.

१. सचिव संकाजी मल्हार नरगुंदकर, हेबळी इनाम वगैरे चालत आहे. कलम.

१. रघुनाथराव पंडित [ राव ] यांचें कोण्हीं नाहीं सबब श्रीकराचार्य कालगांवकर यांस पद सांगितलें. कलम.

१. जनार्दन पंडित हणमंते सुमंत. कार्यमें.[४७] कलम.

१. दत्तो मंगाजी मंत्री यांजकडे [ मंत्री ] पद होतें त्यांचा काल जहाला. त्यांस संतत नाहीं. त्यांचे कनिष्ठ बंधु अंताजी मंगाजी यांस पद देत असतां मशारनिलेनीं विनंती केली. रामजीराव पिंडे यांस पद देवविलें. ते पदाधिकारी जहाले.[४८]

१. बाळाजी पंडित न्यायाधीश यांचा काल जहाला. सबब निराजी रावजी यांस पद दिल्हें.

१. महादजीराव पानसंबळ सेनापति चंदीचे मुक्कामीं लढाईंत पडले, सबब पुढें संताजी घोरपडे यांस पदाधिकार सांगितला.[४९]

प्रतिनिधी शिवाय अष्टप्रधान एकूण नऊ पदाधिकारी [ झाले. ] पूर्वीं सचिव

---

४६. हुकुमतपन्हा=आज्ञाश्रय, हुकुम चालविणारा.

वरील मजकुरांत व ग्रां० ड० यांचे लिहिण्यांत फरक आहे. १६७६ सालीं पंत अमात्य हें पद रामचंद्रपंताकडून काढून शिवाजीनें रघुनाथ नारायण हणमंते यांस दिलें. त्या वेळेस रघुनाथपंताचा भाऊ जनार्दनपंत याजकडे सुमंत पद होतें. संभाजीच्या कारकीर्दीत रघुनाथपंत वारल्यावर अमात्यपद जनार्दनपंत याजला दिलें, व जनार्दनपंत १६९८।९९ च्या सुमारास वारल्यावर तें पद रामचंद्रपंतास पुनः प्राप्त झालें. वर 'रघुनाथ तिमाजी' म्हटलें आहे तेथें 'तिमाजी रघुनाथ' असावें. ग्रां० ड० ह्मणतात हा तिमाजी रघुनाथ जनार्दनपंताचा पुत्र; पण ही उघड चूक आहे. तो जनार्दनपंताचा पुतण्या व रघुनाथपंताचा पुत्र असें म्हटलें पाहिजे होतें.

४७. चि० प्रतींत 'सुमंत' असें ह्मणून पुढें जागा कोरी टाकिली आहे. वरील इ० प्रतीचा पाठ चुकीचा आहे. (वर टी० ४६ पहा.)

ग्रां० ड० 'महादाजी गदाधर सुमंत' असें म्हणतात. चि० प्रतींत अमात्य हें पद जनार्दनपंताकडे असें आहे तें बरोबरच आहे.

४८. चि० प्रतींत 'दत्ताजीपंत मंत्री' इतकेंच लिहिलें आहे. 'रामचंद्र त्रिंबक पुंडे मंत्री' असें ग्रां० ड० यांचे ग्रंथांत आहे.

४९. चिटणीस प्रतींत पानसंबळ यांचें येथें नांव दिलें नाहीं. ग्रां० ड० म्हणतात तो देशींच होता, चंदीस नव्हता. मागें टी० ३२ पहा.

पद अंणाजी दत्तो यांजकडे होतें. संभाजी महाराज यांचे कारकीर्दीत त्यांचा काळ झालें[५०]. त्यांचे चिरंजीव बरोबर नव्हते सबब संक्राजी मल्हार यांस पद दिल्हें.

अष्टप्रधानां शिवाय कर्ते माणसें यांसि अष्टप्रधानांचे योग्यतेनें वागवावें असें केलें. त्यांस किताबती देऊन वाढविले ते:—

१. परसोजी भोसले बहुत कर्ते, मर्द ह्मणोन सेनासाहेब सुभा पद देऊन सन्मान सेनापतीप्रमाणें, वस्त्रें, अलंकार, जरीपटका, चौघडा देऊन गोंडवण, देवगड, चांदे, वराड वगैरे येथें अंमल [ त्यांनीं ] बसविला तो सुभा त्यांस दिला.

१. सिदोजीराव निंबाळकर बहुत कर्ते, त्यांस सरलष्कर असें पद देऊन सेनापतीचे बरोबरी जरीपटका, चौघडा वगैरे देऊन गंगातीरचा[५१] अंमल त्यांनीं बसविला, तो सुभा त्यांसच दिला.

१. खंडेराव दाभाडे हेही शूर, मर्द, कर्ते [ म्हणून ] सेनापतीप्रमाणें सन्मान व सेनाधुरंधर हें पद देऊन, गुजराथ, बागलाण वगैरे अंमल त्यांणीं बसविला, तो सुभा त्यांस सांगितला.

१. धनासिंगराव जाधवराव यांस जयसिंगराव म्हणोन किताब पूर्वी पन्हाळे मुक्कामीं दिलेला तो कायम करून सेनापतीप्रमाणें जरीपटका व साहेबनौबत दिली[५२].

---

याप्रमाणें चार किताब दिले.

सरकारकून वागवावयाचे ते बितपशील:—

१. खंडो बल्लाळ चिटणीस, कायम.

१. अंताजी मंगाजी व गंगो मंगाजी वांकनीस यांचे बंधु यांजकडे वांकनिशी व पोतदारी यांची मुतालि[५३]की कायम.

१. बाबजी निळो पारसनिस, कायम[५३].

१. आनंदराव महादेव व त्रिंबकराव महादेव यांजकडे खासनविशी व पोतनविशी कायम.

१. निळो बल्लाळ प्रधानाकडील चिटणीस व कर्णराजाकडील दिवाण हे कायम.



५०. यास संभाजीनें हत्तीच्या पायीं दिलें. सं० म० च० पृ० ८ पहा.

५१. गंगातीर=गोदातीर.

५२. चि० प्रतींत येथें धनाजीचा उल्लेख नाहीं.

५३. हीं नावें चि० प्रतींत दिलीं नाहींत.

कितेक सरदार बहुत उपयोगीं पडले म्हणोन त्यांस किताबती देऊन वाढविले. ते बितपशील:—

१. परशुराम त्रिंबक कुळकर्णी[५४] किनईकर नि॥ हुकुमतपन्हा यांस समशेरबहादर शहाजंग [ पद दिले ]

१. नरसो बल्लाळ फौजेचे सबनीस.

१. घाटगे बाजी बुंदकर[५४].

१. घाटगे सरजेराव कागलकर[५४].

१. फत्तेसिंग बहादूर.

१. कडू रुस्तुमराव[५५] समशेरबहादर.

१. आटोळे धुरंधर सेनासमशेरबहादर.

१. आटोळे सेना-बारासहस्त्री.[५६]

१. बडगर अमिरुल उमराव.

१. पांढरे शरफन मुलुख.[५७]

१. चांदजीराव व हणमंतराव व पदाजीराव साळुंके पाटणकर[५४] समशेरबहादर.

१. संकराजी नारायण कुळकर्णी नि॥ हुकमतपन्हा यांस मदारुलमहाम[५८] किताबत दिली.

१. बाळोजी पवार यांसि विश्वासराव कितावें[५९].

१. घाटगे झुंझारराव मळेवाडकर.

१. कांकडे दिनकरराव.

१. वागमोडे सेना—बारासहस्त्री.

१. आटोळे सफेजंग बहादर[६०].

१. थोरात दिनकरराव.

१. पांढरे शहाजात मुलूख[६१].

१. पांढरे समसेरबहादर.

१. नरसोजी व जीवाजी पाटील[५४] शिंदे तोरगळकर पागनीस.

१. ठोके विश्वासराव.

१. महार्णव फत्तेजंगबहादर.

---

२३*

येणेंप्रमाणें कर्ते मनुष्यांची बूज वाढवून किताबती व पदें देऊन त्यांचे हातें कार्यें करविलीं. त्यांणींही राजश्रीचा लोभ आपल्यावर असावा, चहातील तें देत

---

५४. हीं नावें चि० प्रतींत नाहींत.

५५. रुस्तुम् ' हा पर्शियन लोकांत प्राचीनकाळीं मोठा नामांकित योद्धा होऊन गेला त्यावरून त्याचें नांव एक किताबच होऊन बसलें. भाऊसाहेबांचे बखरींत दत्ताजी शिंद्यास 'भीमबहादर' असें म्हटलें आहे तें पहा. असो, रुस्तमराव याचा अर्थ रुस्तम्सारखा प्रतापी असा होतो.

५६. बारा सहस्त्री=बारा हजार फौजेचा सरदार. हा किताब मोंगलांच्या हफ्तहजारी, पंजहजारी वगैरे किताबाप्रमाणें तयार केला असावा.

* इ० प्र० २४ अंक आहे पण वर टी. ५१प.

५७. शरीफनमुलुख=प्रांतांत मुख्य.

५८. इं० प्रतींत 'नारो शंकर गांडेकर' असें आहे. तें चुकीनें पडलें असावें. ग्रां० ड० आडनांव 'गौडेकर' असें देतात. मदारुल्महाम=कामकाजाचा मध्य, कामकाजांत प्रवीण.

५९. या नांवाशिवाय पुनः 'पवार विश्वासराव' असें इं० प्रतींत आहे तें चुकीचें दिसतें. चि० प्रत पवाराचें नांव काय तें देत नाहीं.

६०. सफेजंग बहादर=लढाईच्या तोडीं शूरकर्म करणारा.

६१ 'शहाजंग मुलुख' इं० प्र०.

आहेत, यास्तव सरकार काम [ बजावण्यांत ] जीवादारभ्य श्रम, साहस करीत असावें. याप्रमाणें दौलत जमवून पादशहाचे फौजेशीं लढोन, देश, दुर्ग व ठाणीं वगैरे बागलाण, गुजराथ, गोंडवण, गंगातीर, स्वदेश, कर्नाटक प्रांत, चंदी वगैरे मुलुख काबीज करीत चालले. पादशहाची फौज प्रांतांत फिरत असतां खातरेंत न आणितां रामसैन्याप्रमाणें [ महाराजांचे लोकांहीं ] काम करीत असावें. याप्रमाणें पांच चार वर्षे दौलत जमत चालली. पादशहास असें वाटलें, मराठी आपण मोडीत असतां मोडत नाहीं. म्हणोन ते वरचेवर फौजाही करनाटकांत रवाना करीत गेले. महाराजांकडील फौजा जाऊन त्यांसि लढून सारीत गेले.

[ पुढें ] संताजी घोरपडे यांणीं कांहीं कारण करून चंदींत महाराजांकडील लोकांशीं खटला करून झुंजले. अमर्यादा केली. याजवरून माने सरदार पाठविले [ व ] हल्ला करविली. तेव्हां सरदार लोक यांणीं बहुत रतबदली करून मातबर माणूस चाकरीवर मारावे म्हणून रहाविले. इतराजी झाली. सेनापति-पद धनाजी जाधवराव यांस दिल्हें. ऐशी दोन तीन वर्षे कारकीर्द जाली.

यानंतर जुल्फकारखान फौजेसुद्धां चंदीचे मुलुकांत असतां पादशहा बेनवा[६२] होऊन खानास लिहीत कीं, अद्याप मराठी मोडत नाहीं. जलद पारपत्य करून राजाराम हस्तगत करावा. यावरून झुल्फकारखान याणें विचार केला जे, पादशहा बेनवा झाले; शत्रू यांस कोणी नाहीं. रहातांना दक्षिणेंत मराठी मात्र राहिली आहे, हे राखोन करणें तें करावें. म्हणोन वरकड दोन सरदार आपणाबरोबर किलीजखान व दाऊदखान यांस टाकून महाराजांकडेस संधान केलें कीं, आमच्या गळां तुम्हीं पडूं नये. तुमच्या गळां आम्हीं पडत नाहीं. फौजे फौजेची गांठ पडली असतां बेषक लढाई करावी. मोड होईल त्याचा पाठलाग करूं नये, आणि तुम्हांकडील फौजेनें आम्हांशीं लांडगेतोड करीत असावें. असें संधान खानाकडील आलें. यांसही अवश्य कर्तव्य जाणोन खंडो बल्लाळ यांजला खानाकडे पाठवून संधान केलें. संकेताप्रमाणें लढाया होत असाव्या. पादशहाकडील दुसरे सरदार गळां पडले असतां बेषक लढाई करून त्यांचे फौजेची धुळधाणी करून द्यावी. खान व महाराज यांणीं संकेतानें चालावें. याप्रमाणें होत चाललें.

महाराजांकडील फौजेच्या टोळ्या तीन सेनापति, सेनासाहेबसुभा व सर लष्कर मिळोन साठ सत्तर हजार [ फौज होती. ] शिवाय महाराजांपाशीं नेहमी जमियत दहा हजार असावी. शिवाय हिंडती फिरती पंधरा वीस हजार होती. याप्रमाणें फौजेनिशीं लढाई करून स्वदेशीं येऊन प्रांतांत खंडण्या घ्याव्या.

---

६२ बेनवा–जुना, म्हातारा, भुकेला ?

पादशहाचीं ठाणीं असतील तीं उठवावीं व आपले नाके जागा, किल्ले, कोट यांस दील भरंवसा देऊन बरायखुद[६३] पादशहाचा मुक्काम असेल तेथें जाऊन छापा घालावा, मुलूख मारावा, पादशहाकडील कही[६४] लुटून हत्ती, घोडे, उंटें न्यावीं. पादशहाची फौज तीन लाख नेहमी जवळ [ असून ] शिवाय पांच चार टोळ्या लाख लाखाच्या असतांनाही खातरेंत न आणितां धांदल करीत चालले. कांहीं फौज चंदीकडे रहावी. कांहीं फौज देशीं[६५] असावी. कांहीं फौज देवगड, चांदें, बागलाण, गुजराथ इकडेही रहावी. [ येणेंकरून ] मराठी फौज किती आहे याचा अदमास लागूं देऊं नये. वराड मुलूख मारून पन्हाळ्यापर्यंत फौजा बेषक याव्या. गंगातीर प्रांतीं फौजा जाऊन भागानगरपर्यंत खंडण्या घ्याव्या. एखादें ठाणें बळावून झाडीचे आश्रयानें छावणीस रहावें. चंदीकडे [ पादशाही ] फौजा रवाना होतील त्यांस आडवावें, लढाई करावी, प्रसंग पडल्यास लुटावें, अथवा छापा घालावा, आणि त्यांचा पल्ला पोंहोचूं देऊं नये. [ तेव्हां ] जुल्फकारखान याजकडून पादशहास अर्जी येत असावी जे, मराठी फौजेपुढें आमचा उपाय राहिला. फौज कुमकेस जलद पाठवावी. चंदीस वेढा वसूं देत नाहींत. हें वर्तमान पादशहांनीं ऐकून मसलत कशी करावी याचाही विचार पादशहास होत असावा. महाराजांकडील सरदार लोकांनीं गंगातीरीं आटोळे व समशेरबहादूर वगैरे [ यांनीं ] झाडींत राहून पाळेगारी[६६] करून मुलूख मारावा. चौथाई वगैरे अम्मल घ्यावा. चोहोंकडून धामधूम एकदांच करावी. याप्रमाणें लढाया जागां जागां झाल्या. मोंगली फौज मोठी, एके ठिकाणीं उभे राहून लढाई करणार. मराठे यांणीं आज एके ठायीं [ तर ] दुसरे दिवशीं वीस पंचवीस कोसांवर जावें. पुन्हा एकाएकीं येऊन छापा घालावा. कांहीं लढाई देऊन लुटून पळावें. कही रसद मारावी. असें करूं लागले. तेव्हां यांशीं कसें लढावें ऐसें मोंगलांनीं म्हणावें. कदाचित् गांठ पडल्यास, कबजेंत आल्यास, मराठे लोक पळणार, यांजवर हत्यार कशास [ धरावें म्हणून ] यांच्या गळ्यांत कमाणी[६७] आडकवावी. यांणीं त्यांजवर

---

६३. बराय खुद=स्वतः, जातीनें.

६४. 'कही, कबाड, रसद.' चि० प्र०. दाणा वैरण, लांकुडफाटे वगैरे सामान.

६५. देशीं=स्वदेशीं, महाराष्ट्रांत.

६६. पाळेगारी=सरकाराविरुद्ध बंड करून, डोंगरांत व झाडींत राहून राज्यांत खंडणी घेणें, लुटणें वगैरे.

६७. "कोठें गांठ पडल्यास कबजेंत आल्यास म्हराठे लोक यांजवर हत्यार कशास पाहिजे म्हणून कमाण गळ्यांत घालून राऊत पाडून घोडे घ्यावे ऐसे सेर [ सर ? ] झाले असतां राजाराम यांचें सैन्य रामचंद्राचे वानर तसे" इत्यादि चि० प्रतीचा पुढील दोन चार ओळींचा पाठ आहे. कमान=धनुष्याची कांब, धनुष्य. 'शार्ङ्गःकमान मित्युक्तम्' रा० व्य० को०. एकदरींत हा कमाण गळ्यांत घालणे वगैरे मजकूर स्पष्ट नाहीं.

हत्यार करून हात तोडून पळून जावें. कदाचित जेरर्दस्तीस[६८] आले तरि गळ्यांत कमाण आडकवून चिखलांत अगर भुईस लोळवावें. यांणीं मिष घेऊँनें[६९] पडावें. सोडल्यानंतर जावें. सारांश राजाराम यांची फौज राम-सैन्याप्रमाणें अकस्मात भलतेकडून पांच दहाशें, दोनशें असे गंळ्यांनीं[७०] शिरून [ शत्रूस ] दुभंग करावें, हाणावें, मारावें, पळून जावें. किल्लेचे लोकांनीं स्वाऱ्या कराव्या. रात्रीं बेरड लोक घालून घोडीं चोरून न्यावीं. याप्रमाणें करिते झाले. सारांश महाराजांचे लोकांनीं प्राण तृणप्राय करून महाराजांचें राज्य व्हावें हें सर्वांचें मनोगत [ तेव्हां ] हिंदु ज्ञाती [ यांणीं ] प्राणाची गरज न धरितां राज्याविशीं झटावें. चंदीकडून महाराजांनीं पाठविले ते व या प्रांतांतील लोक [ यांणीं एकमेकांचे ] कुमकेस मिळावें. इकडील लोकांनीं कामकाजें केल्यानंतर महाराजांकडील सरदारांनीं त्यांची नवांजीस[७१] करावी. बक्षीस द्यावें. मोठें काम केलें असतां महाराजांकडे विनंती लिहावी. किताबत व सरंजामाच्या सनदा आणोन द्याव्या. योग्य मनुष्यास उमेद चढून दुसऱ्यानें अरेतरनें[७२] कामें करीत असावें.

याप्रमाणें होत चाललें. जे कर्ते जहाले त्यांस गांव जमिनी इनाम द्याव्या. ब्राह्मणांनीं राज्यवृद्धि व्हावी म्हणोन अनुष्ठानें केलीं, त्यांणीं चंदीस जाऊन तुमचे कल्याणार्थ अनुष्ठान केलें [ असें सांगावें. ] हें ऐकोन त्यांस इनाम जमीन अथवा गांव करून द्यावें. अमकें देवस्थान जागृत आहे [ असें ऐकिल्यास ] त्यास गांव इनाम द्यावें. कृष्णातीरींचे ब्राह्मणांस पूर्वीं थोरले महाराजांनीं अग्रहार[७३] करून दिलीं आहेत, आपणही नूतन करून द्यावीं [ असें ] म्हटल्यावरून दिल्हीं. त्यांतील मुख्य स्थानें चंदी प्रांतीं अरणी इत्यादि अग्रहार करून देऊन स्वदेशींही अग्रहार करून दिल्हे ते [ येणेंप्रमाणें. ] श्रीजयराम स्वामींस वडगांव दरोबस्त इनाम करून दिल्हें. श्री रंगनाथ स्वामी यांस मौजे निगडी हुकमतपन्हा यांणीं इनाम करून देऊन राजपत्रही

---

६८. जेरदस्ती=बलहीनता, विकलता.

६९. मेल्याचें सोंग घेऊन (?)

७०. गद्वा=झोळी, जूट.

७१. नवांजोस=स्तुती, शिफारस. चि० प्रतीचा पाठ निराळा आहे तो असा:— “ काया वाचा मनें मराठे, ब्राह्मण, हिंदू तितके तिकडून पाठविले व हिकडेही होते; ज्यांस जशी संधी पडली त्यांणीं तेथें बळावून लोक धरावे कामकाज करावें महाराजांस लिहून पाठवावें अमुक काम मी केलें व करितों. महाराजांनीं नावांजीस करून पद किताब सरंजामाच्या सनदा इनाम गांव जमीन ऐसें करून पाठवावें.”

७२. अरेतरेनें=तूं मीं करून, घे घे मार मार करून, त्वेषानें.

७३. अग्रहार=ब्राह्मणांस इनाम दिलेला गांव किंवा जमीन.

करून दिलें. श्रीकृष्णातीरीं ककुद्मती सैदापूर हा गांव कराडकर ब्राम्हणांस अग्रहार करून दिल्हा. मौजे कोणेगांव मसूरकर ब्राम्हणांस अग्रहार करून दिल्हा. कसबे स प ळ गे प्रांत हुकेरी येथील क्षेत्रस्थ ब्राम्हणांस मौजे माण-कोपूर[७४] इनाम करून दिलें. याशिवाय जे जे जसे जसे समजावून देतील तसे तसे ग्राम व भूमि व वर्षासन करून देते जहाले. त्यांतील कारण; ज्याणें जसें म्हणावें तसें करून द्यावें, म्हणजे मनुष्यमात्र आपले वेधीं लागावें, राज्याची अभिवृद्धी व्हावी, यास्तव इनाम अग्रहार गांव देते जहाले. कार्यकर्तेस इनाम द्यावें त्या योगें मनुष्यमात्र पेशजी[७५] पेक्षां प्राणही जावो परंतु महाराजांची सेवा घडोन राज्याची अभिवृद्धि व्हावी असें इच्छूं लागले आणि महाराजांचे मनांतील भाव संभाजी महाराज यांणीं राज्य गमाविलें तें कसेंही साध्य करावें. औरंगजेब पादशहासारखा शत्रु [ ज्याची ] लाखों फौज [ व ] खजीना बेमुबलक, छकड्यास छकडे द्रव्याचे भरोन कोटिशा [ ज्याचे ]बरोबर चालत आहेत [ अशाशीं लढणें ], आणि आपलें सैन्य [ तर ] थोडें यास्तव मनुष्य राखून, जायां होऊं न देतां,. मसलतीनें त्यांच्या सैन्या सभोंवतें हिंडोन फिरोन त्यांस लांडगेतोड * करावी; रयतेची मात्र वैरण राखून रानांतील वैरण जाळून टाकावीं; रसद चालू देऊं नये; आपल्या फौजेंत मणाची धारण, त्यांच्या लष्करांत शेराची धारण; अशा तऱ्हेनें करीत मराठी फौज किती आहे हा अदमास ध्यानांत येऊं देऊं नये; त्यांचे फौजेस चैन पडूं [ देऊं ] नये; त्यांचीं ठाणीं [ व ] त्यांजकडे प्रांत मुलूख वहिवाटींत होते, तेथील लोकांनीं इकडे लक्ष ठेवून वागावें; आपली फौज ज्या प्रांतीं जाईल त्या प्रांतांतील लोकांनीं, जमेदारांनीं, खंडणी देऊन त्यांचा बचाव करावा. मोंगलांची फौज असेल तेथें तेथें पंचविसां तिसां कोसांचे छटयांनीं राहून त्या फौजेस चैन पडूं देऊं नये. असें महाराज करिते झाले. लोभ करीतच असत. मोंगलांचे घोडे पाण्यावर आले असतां पाणी न पीत त्यांस मोंगली लोकांनीं म्हणावें जे, पाण्यामध्यें धनाजी व संताजी दिसतो कीं काँय[७६] ? रात्रीं दिवसा कोणीकडून येतील, काय करतील असें केलें. मोंगलाई फौजेंत आठही प्रहर भय बाळगीत. पादशहासि बहुत आश्चर्य जहालें कीं, " मराठी फौज ही बळावत आहे. अकस्मात यावें, बक मच्छ उचलून नेतो तसा घाला घालावा, शिपाईगिरीची शर्त करावी, प्रसंग पडल्यास माघारें पळून

---

७४. हो विशेष माहिती चि० प्रतींत नाहीं. जुने अग्रहार चालवून नवीन करून दिले इतकें मात्र तींत लिहिलें आहे.

७५. पेशजी=पर्वी, मागें.

* लांडगेतोड=लांडग्यासारखें अवचित येऊन घाला घालून तोडातोड मारामार करणें व पळून जाणें वगैरे.

७६. "घोडें नदीस पाणी पेईना तर धनाजी सदा पाण्यांत दिसतो कीं काय ? असें म्हणावें " चि० प्रत.

जावें. खाण्यापिण्याचा दरकार बाळगीत नाहींत. पाऊस, ऊन, थंडी व अंधारी कांहीं न पहातां घोड्यावरच हरभरे व भाकरी, चटणी, कांदे खाऊन धांवतात. त्यांस कसें जिंकावें ? एक्या मुलकांत फौज आली म्हणोन त्यांजवर [ फौजेची ] खानगी करावी, तों दुसरेकडे जाऊन ठाणीं घेतात. मुलूख मारितात. हे आदमी नव्हत, भूतखाना आहे."

[ ऐसें ] म्हणोन आपण खासा स्वारी **सा**तान्यास आली आणि किल्यास मोर्चे बैसविले. किल्ला न ये. लढूं लागला. **चं**दन **वं**दन कांहीं दिवस लढले. ते दोन्ही किल्ले घेतले. आपण खांसा स्वारी **क**रंजेवर डेरे देऊन राहिली. त्याचें नांव **पा**दशापूर म्हणोन ठेविलें. शहाजादे यांस फौज देऊन **प**रळीचे रस्त्यावर ठेविले. **श**हापूर असें त्या जागेचें नांव पडलें. किल्याभोंवता खंदक खटला. **स**रजेखान यांस **सें**दें[79]-च्या नजिक ठेविले. त्याणीं पूर्वेकडील **चां**भार टेंकडीच्याखालीं डोंगर फोडून खिंड पाडली. तो रस्ता केला. त्यास **स**र्जाखिंड म्हणत आहेत. **कों**डोलीवर **शा**स्तेखांन फौजसुद्धां ठेविले. याप्रमाणें जिकडे तिकडे सरदार ठेऊन वरतीं रसद जाण्याची बंदी केली. किल्ल्याभोंवते खंदक केले तेव्हां अगदीं बंदी जहाली. **बा**जारखेंडीवर धबधवा रचून तोफ दरवाज्यावर सुरू केली. **ये**वतेश्वराचे डोंगरावरही तोफ चालविली. तसेंच पूर्वेकडील **चां**भारखेंडीवर **स**रजेखानांनीं तोफा चढविल्या. याप्रमाणें पादशहानीं पुरीच अडचण करून जकडबंदी केली. परंतु किल्ला न ये. किल्यावरील लोक हिंमतीचे, **प्र**यागबावा **प्र**भू हे सुभेदार, त्याणीं बहुत शर्त केली. किल्ला लढूं लागला. **प**रळीवर **प**रशुराम **त्रिं**बक होते. त्याणीं **श**हाजादे **अ**ज्जमशहा यांशीं राजकारण राखून किल्यावर मदत व रसद पावती करणें ती व सामान दारूगोळा पावता करावा. लोकांसही दील दिलासा[81] देऊन किल्ला लढविते जहाले. ते समयीं पादशाही लष्करांत धारण बहुत [82]पडली. लष्करांत दाणा चारा मिळेना तेव्हां हलाखींत आले. बाहेरून **म**राठी फौजेची लांडगेतोड. रसद चालेना, कही येईना व किल्लाही येईना. जाणोन पादशहा यांणीं हल्ला करण्याची तजवीज करविली असतां, **स**रजेखान व पादशहाजादे

---

७७. सातान्याच्या वेढ्याचें काम १६९८। ९९ इ० स० सालीं सुरू झालें.

७८. **क**रंजें–**सा**तारच्या उत्तरेस १ कोसावर आहे.

७९. **सें**दरें–**सा**तान्याच्या दक्षिणेस.

८०. "**ता**रबियतखान हा पूर्वेच्या बाजूस होता. व त्याच्याचकडे सुरुंग तयार करणें, धमधमे बांधणें वगैरे काम मुख्यतः होतें" असें **का**फीखान आपले 'मुंत खबुल्लुबाब्' नांवाचे ग्रंथांत लिहितो. **का**फीखान याणें **औ**रंगजेबाच्या सर्व कारकीर्दीचा व पुढील १२।१५ वर्षांचा इतिहास लिहून त्यास वरील नांव दिलें आहे. **शा**स्ताखानाचा उल्लेखही त्यांत नाहीं.

८१. दीलदिलसा=धीर भरवसा, हिमत.

८२. पडली= मांदी पडली, महाग झाली.

यांच्या सर्वांच्या विचारें मसलतें[83] वाढवावी, पादशहास मराठे जातीचे कजाख हें समजावें, असाच बेत [ ठरला तो ] खांनें[84] ही राखीत आले. पादशहांनीं श्रम केले ते निर्फळ होत असावे. तेव्हां किल्लेचे पूर्व भागीं ईशान्य कोनेस मंगळाईच्या बुरजाखालीं पादशहांनीं सुरंग करविला. पाटीभर माती काढून आणतील त्यांस एक मोहोर द्यावी असे लक्षावधि रुपये खर्च करून सुरुंग करविला.[85] उडवावा ते वरच्यांस बातमी न समजावी, असा बेत राखून, बुरजाखालीं दारूचे बुधले पुरून, मोर्चे हुशार राखून, आपण खांसा तक्तरींव्यावर[86] बसोन स्वारी बाहीर आली. त्या समयीं वत्ती देवविली. किल्यावरील लोक पादशहाची स्वारी पहाणेस मंगळाईचे बुरजावर उत्तरेवरील तटावर उभे राहिले. त्या समयीं मंगळाईचे बुरजाची सोंडे[87] शें दोनशें हात वरतीं उडोन जेथील तेथें कायम जाली. त्या काळीं वरील लोक शें दोनशें तटाखालें पडोन मेले. खालील लोक मोर्चे बंदीचे बहुत मेले, व जांया झाले. कड्याचे दगड फुटोन तोफेच्या गोळ्याप्रमाणें लष्करांत पडोन कांहीं [ लोक ] जांया झाले व[88] मेले. बुरुज उडाला ते समयीं धुरळ्याची गर्दी होऊन घटकाभर धुंदी जाली. धुंद निवळल्यानंतर किल्यावरचे लोक हुशार होऊन नगारे, कर्णे, तुतारे वाजवून तोफा [ त्यांणीं ] सुरू केल्या. जागां जागां लोक उभे राहून तटावरून धोंडे लोटले. तें [ कृत्य ] पादशहांनीं पाहून बहुत आश्चर्य मानून, मराठे बहुत कजाख, आपण केल्याचे योगानें आपला नाश जाला [ असें पाहून ] तेणेंकरून संताप पावले.

सुरुंग उडाला ते समयीं प्रयागजी प्रभु सुभेदार बुरुजानजीक झोंडाखालें[89] बसले होते तेथें दगड येऊन पडले. त्यांचे आयुष्य बलोत्तर! तीन धोंडे तिहींकडे, मोठा धोंडा वर्ता एक, आंत घराप्रमाणें जालें. आणि वर मातीचा ढीग पडला. तेव्हां घरांत खोलींत असावें असा भास त्यांस होऊन ईश्वरांनीं [त्यांचा] बचाव केला.

---

८३. "आसदखान व शहाजादे यांच्या मनांत" चि० प्र०. मसलत=मोहीम, लढाईची कामगिरी.

८४. 'खान कोणते? झुल्फिकारखान कीं सर्ज्याखान? झुल्फिकारखान असावे असें वाटतें.

८५. "वेढ्याच्या कामांत हुशार असो फौज व मावळे लोक ह्यांच्या कामगारीबद्दल १ लक्ष ६० हजार रु० खर्च केले." काफीखान.

८६. तक्तरावा=एकाला एक फळ्या जोडून केलेलें तक्त; हें स्वारीच्या वेळेस माणसांनीं डोकीवर वाहायाचें.

८७. सोंड=डोंगराचा पुढें आलेला भाग, नाक. पायऱ्यांच्या वगैरे कडेला चुन्याची भिंत घालतात ती.

८८. 'सुमारें दोन हजार मेले.' काफीखान.

८९. मंगळाईचे देवळा नजीकच प्रयागजीवर हा प्रसंग गुदरला. ग्रां० ड०.

तेसमयीं लोकांनीं चहूंकडे पहातां हरंळी[१०] जहाली जे, सुभेदार दिसत नाहींत. तेव्हां सर्व दरखदार व लोक मिळोन ज्या स्थळीं बसले होते तेथें येऊन पहातां मातीचा ढीग बुरजाप्रमाणें पडलेला. उकरून पहातात तों झग्याचा पदर दृष्टीस पडला. त्याजवरून येथें आहेत असें ओळखून माती काढूं लागले. तों दगडाच्या आंतून [ ते ] बोलिले कीं, मी जीवंत आहें. असें म्हटल्यावरून लोकांनीं माती, दगड युक्तीनें काढून आंतून बाहेर काढिले. ते खैरें[११] होऊन निघाले. पुनर्जन्म जाला. म्हणोन लोकांस पुन्हा हुशारी होऊन नगारे आदि वाद्यें केलीं. पुन्हा तोफा सुरू कर्ते जाले.

तेव्हां सुरुंगानें किल्ला न आला, आपलाच नाश जाला, [हें व] किल्यावरील लोकांची शर्तमर्दी पाहून पादशहास अति कोप येऊन तमाम लष्करांतील आपलीं हत्ती, उंटें जमा करून आणविलीं व तीं मारून रचून किल्यावर पायवाट करून हल्ला चढवावी म्हणोन हुकूम करून, खासा तख्तराव्यावर बसोन पुढें चालू जहाला. हें वर्तमान असदखान वजीर अमीर यांस कळलें. त्यांणीं येऊन बहुत प्रकारें अर्ज केला, परंतु आग्रह न सुटे. हें पाहून असदखान वजीर यांणीं शहाजादे यांस जलदीनें सांगून पाठवून बेहादर[१२] शाहा जादे यांस आणविलें. ते व आपण पुढें उभे राहून हात जोडून अर्ज केलाजे, "हे लक्षावधि जीव ईश्वराचे, यांस मारूं नये. ही गोष्ट खुदास मानणार नाहीं. आम्हांस हुकूम करावा. दोन चार दिवसांत हरप्रयत्न करून किल्ला फत्ते करितों. ही गोष्ट आम्हांकडून न घडल्यास नंतर हजरतांनीं[१३] मर्जीस येईल तसें करावें." असें सांगोन पादशहाची मर्जी ठिकाणावर आणोन डेऱ्यास जाणेविशीं विनंती केली. ते डेऱ्यास गेले. शाहाजादे यांणीं परशरामपंत यांजकडे सांगून पाठविलें कीं, "पादशहाची मर्जी बहुत रुष्ट जहाली, आग्रहास पडले, [ आतां ] तुम्हीं आग्रह टाकावा. आग्रह न टाकिल्यास बहुत जीवांचा नाश होतो. हां[१४] द्रोहो तुमच्या माथां, यास्तव आग्रह सोडून पादशहाची मर्जी राखावी. सुभेदार यांस सांगून पाठवावें. तह करून आपल्या लोकांचा बचाव करून किल्ला द्यावा." तेव्हां परशरामपंतांनीं विचार केलाजे, खासाच आग्रहास पडले, प्रयत्न वीरश्रीनें करतील, तेव्हां नाश करून किल्ला द्यावा [ हें भाग ] येईल. कारण हल्यानें [ ते ] घेतील. हत्ती, उंट मारून वाट करून खासा हल्लेस चढणार त्यावर गोळे टाकणें

१० हरळी=आरोळी, हांकाहांक.
११. खैर=कल्याण, देवाची कृपा ?
१२ अज्ञमशहा—परळीच्या बाजूवर होता तो.
१३. हजरत=सरकार, आपण.
१४. द्रोहो=द्रोह, अभिश्राप, वाइटपणा.

हें बेहिसाबें[१५]; आणि शहाजादे यांचाही मनोगत रक्षिला पाहिजे. पूर्वीपासून कित्येक प्रकारें त्यांचें राजकारण करून सुभे रक्षिले आहेत. पुढे ही कारणें आहेत. असा विचार परशरामपंतीं करून सुभेदार यांस सांगून पाठऊन दिलें कीं, सर्व लोकांचा बचाव करून चीज, वस्त, हत्यार, सुद्धां घेऊन उतरावें असें शहाजादे यांचे विद्यमानें करून, त्यांचे लष्करांत उतरले. त्यांचा निरोप घेऊन लोक सर्व परळीस निघोन गेले. पादशहाचें निशाण, लोक चढले. किल्ला फत्ते केला. याप्रमाणें सातारा[१६] घेतला.

नंतर परळीस[१७] जाऊन वेढा बसला. पश्चमेचे डोंगरावर तोफा चढवून लढते जाले. परंतु परशरामपंतीं सहा महिने किल्ला लढविला. बराय खुद्द पादशहा सहा महिने बसोन किल्याशीं लढत असतां परजन्यकाळचे दिवस प्राप्त होऊन अतिवृष्टि होती जाली. लष्कर बहुत सडलें. परळीवर बहुत चमत्कार जहाला जे, सहस्त्रावधि वानर येऊन तटावर बसावे, असें होऊं लागलें. एके दिवशीं पूर्वेकडून व उत्तरेकडून हल्ला चढविली. दोहींकडून लोक आले. त्याकाळीं वानर किल्यावरून दगड मारूं लागले. कोठें दगड ढकलूं लागले. आणि भोंगे उठले त्यांणीं हल्ला फिरविला. असा चमत्कार जाला[१८]. पाउसांनींही लष्कर बहुत सडूं लागलें. पादशहा मनांत खजील होऊन अशा किल्याचे कामास आपण बसोन खराब व्हावें यांत फायदा नाहीं.

---

१५. बेहिसाब= बरें नव्हे, अयोग्य या अर्थी.

१६. 'छ० १६ जिल्काद रोजीं किल्लेदारानें किल्या स्वाधीन केल्या. याचें नांव 'अझिम तारा' असें औरंगजेबानें ठेविलें.' काफीखान.

१७. परळी ज्यास 'सज्जन-गड' असें नांव यापूर्वीच पडलें होतें. रामदासांस हा किल्ला शिवाजीनें अर्पण केल्यावर तेथें सर्व संत-मंडळी मिळवून देवाचा उत्सव करावा अशी रामदासांची एकदा मनीषा झाली. तिजप्रमाणें गांवोगांवींहून तुकारामादि संत-मंडळी, बळावणीं पाठवून राजानें आणविली. उत्सवाचे अतीं रामदास "या गडाचें भाग्य विशेष। सत मिळाले बहुवस। तरि सज्जन-गड म्हणावें यास। ऐसें रायास सांगती॥" असें हें नांव पडण्याचें कारण महीपतीनें आपले 'संतविजय' ग्रंथांत लिहिलें आहे.

१८. चि० प्रतींत "परळीवर चमत्कार झाला जे सहस्त्रावधि वानर येऊन तटावर बसावे ऐसें होऊं लागलें" इतकेंच आहे. ह्या चमत्काराविषयीं महीपतीनेंही आपल्या संतविजय ग्रंथांत लिहिलें आहे; पण शिवाजीचे वेळीं रामदास स्वामी परळीवर असतां हा चमत्कार घडून आला असें तो ह्मणतो.
"परी कांहीं केल्या ह्मातासि नये। मग अविंध करीत उपाय। दुसऱ्या पर्वतीं जाऊन पाहें। मार लवलाहें देतसे॥ उल्हाट यंत्रांचे भडिमार। गोळे येऊन पडती अपार। तेणें मोडोनि जाती घरें। तेणें घावरे सकळिक॥ समर्थांसि कळतां वर्तमान। केलें मारुतीचें चिंतन। तों सज्जनगडावरी

( पुढें चालू. )

मराठे लोक हरामजादे, रानचे हयवानें[९९], कजाखी करितात. असें चित्तांत दिलगीर होऊन [ बसले. ] तीन चार दिवस पाऊसामुळें सरपण नाहीं, लोक उपोषित राहिले. शाहू महाराज बराबर होते. जोत्याजी केसरकर याणें तेलांत कांकडे भिजवून त्यांजवर भात करवून महाराजांस घातला. लष्कर सरपणामुळें बहुत हैराण जहालें. पाउसाबद्दलें[१००] हत्ती, घोडे, उंटें बहुत मेलीं. किल्ला सहा महिने परशरामपंतीं लढविला. पादशहा बहुत जिकीरीस आले. तेव्हां शहाजादे यांणीं निरोप परशरामपंतास पाठविला. त्यावरून तह करून हत्यारें वगैरे सुद्धां जावें असें ठरवून, श्रीरामदास स्वामींचे समाधीचें दार चिणोन, श्रीरामाच्या[१] मूर्ति घेऊन, देवळांत दगडाच्या बसवून, सर्व पश्चिमेच्या मुऱ्यांतून[२] चढून किल्ले वासोटा[३] येथें गेले. परळीवर निशाण चढलें[४]. श्री रघुपतीच्या मूर्ती वासोटें येथें सहा महिने होत्या. पादशहाचा आग्रह सरला. पर्जन्यामुळें कूच करून वर्धनगडचे पाळमाळावर छावणी केली. पर्जन्य गेला. देशांतील किल्ले घ्यावे अशी मसलत केली. कोकणांतील सह्याद्रीचे किल्ले आपण अथवा फौज बसोन घेण्यास पैका बहुत खर्च लागेल. व लोकांची खराबी होईल. तेव्हां मुख्य [ राजाराम ] वगैरे मोठे मोठे सरदार चंदीकडे आहेत त्यांजवर मसलत करावी असें पादशहाचें मत होतें.

इकडे परशरामपंतही वासोट्यास गेल्यानंतर नारोपंत गांडेकर हे मुजमीकडील दप्तरदार यांणीं राजगड, तोरणा व भोर, कजाखी करून राखिले. कोकणपट्टी रक्षून पुण्यापर्यंत स्वारी करीत होते. त्यांस पंतांनीं सांगून पाठविलें कीं, सातारा व परळी हे पादशहाबरोबर एक संवत्सर आम्हीं लढविले. तुम्हीं हुशार असावें. धनगडानजीक खांसा

---

जाण। वानर-सैन्य प्रकटलें ॥ बळें धोंडी उचलोनि त्वरित। अविंधाच्या सैन्यांत टाकित। तेणें कित्येक यवन पावले मृत्य। सरदार विस्मित जाहला ॥ म्हणे येथ करामत दिसे बहुत। औरंगजेबासि जाणवी मात। × × × पादशाह म्हणती ' तो फकीर। भेटिसी सत्वर आणावा ' ॥ × × × ' फकीर नाहीं कोणा स्वाधीन। परी अवलियाचें दिसे चिन्ह '। × × × मग औरंगजेब आज्ञा करीत। ' त्यास उपद्रव न द्यावा किंचित ॥ ' संतविजय, अ० २५.

९९ हयवान=( प्राणी ) जनावर.

१०० पाउसाबद्दल=पाउसासाठीं, पाउसास्तव, पाउसामुळें.

१. " ह्या मूर्ति कर्णाटकांतून आणल्या होत्या. " संतविजय अ० २५. ह्या पंचरसी धातूच्या अगर पितळेच्या असाव्या.

२. मुऱ्यांतून=खोऱ्यांतून, दऱ्यांतून.

३. ' व्याघ्रगड ' असें नांव शिवाजीनें या किल्ल्यास दिलें होतें.

४. " दीड महिना वेढा पडला होता. शेवटीं फतुल्लाखान या सरदाराच्या पराक्रमानें तो मोहरमचे प्रारंभीं हातीं आला. त्याचें नांव ' नौरस तारा ' असें औरंगजेबानें ठेविलें. " काफीखान.

मुक्कामीं आहे. वरचेवर बातमी राखून कळवीत असावें. तुम्हांस आम्ही कळवीत जाऊं. धनगडनजीक मुक्काम असतां मराठी फौजेनीं रसद बंद करावी, लुटावें, छापा घालावा, बेरड घालून घोडीं न्यावीं. असे अनेक उपद्रवें लांडगेतोड करूं लागले. पादशहास बहुत घुस्सा येऊन याचें मुख्य बीज चंदीस राजाराम जाऊन बळाविलें [तें] चंदी घेऊन त्याचें पारपत्य जालें म्हणजे आटोपेल. इकडील किल्ले घेतले, अंमल बसला, राहिले तेही येतील. मध्यें लांडगेतोड मराठे करितात, हें खूळ मोडेल. असा मनसबा करून पाळेमाळानें* निघोन पन्हाळ प्रांतीं आले. कांहीं दिवस राहून भीमातीरानें विजापुरीं गेले.

तों इकडे रामचंद्रपंत हुकमतपन्हा विशाळगडीं होते. पादशाहा विजापूर प्रांतीं गेले हें जाणोन किल्याचें राजकारण करून पन्हाळा, पावनगड येथील हवालदार वगैरे मंडळीचें साधन करून किल्लेस माळा लाऊन किल्ले घेतले. प्रांतांतही अंमल बसविला. परशरामपंत यांणीं परळी, सातारचें साधन करण्यास अणाजीपंत यांस सांगितलें. मशारनिलेनें गोसांवी याचा वेष घेऊन सातारेवर जाऊन भिक्षाहारी, निस्पृह, द्रव्यस्पर्श न करणें [ असा बेत घातला. ] किल्याचे उत्तरेचे तटास रेडका बुरुज, तेथें पर्णशाळा बांधोन राहोन भेद करून, परशरामपंतास संकेत करवून, बातमी राखून लोक आणवून, माळ लाऊन किल्ला पुन्हा घेतला. तसेंच परळी घेऊन वासोटेहून श्रीरघुपतीच्या मूर्ती नेऊन [ त्यांची पुनः ] स्थापना केली. आणि समाधीचें द्वार मोकळें केलें. श्रीसमाधीचें दर्शन करून संतर्पण केलें. आणि पंत खालीं उतरले. ठाणीं घेणें, अंमल बसवून मुलुख मारणें, असें करूं लागले.

तेव्हां पादशहा यांणीं मनांत विचार केला कीं, चंदीचें पारपत्य करून राजाराम हस्तगत जाले विना निःशल्य होत नाहीं. तेव्हां असदखान वजीर यांस बोलावून रागास आले. जुल्फकारखान यांणीं जाऊन पांच चार वर्षें मसलत वाढविली अद्याप चंदी हातास येत नाहीं. सर्व फौज खांसानिशीं तिकडे जावें तर इकडे बंदोबस्त रहाणार नाहीं. पुन्हा ते इकडे येऊन शिरतील. बळावितील. यास्तव स्वारी येथें असोन तिकडील पारपत्य करावें. सामान फौज पोक्त गेली असतां त्यांच्या फौजा फिरतात, चंदी येत नाहीं म्हणोन खान लिहितात, ही गोष्ट कामाची नाहीं. आतां असें लिहावें [कीं] कजाखी करून चंदी घेणें आणि राजाराम हस्तगत करणें. नाहीं तर खान इतराजींत येतील. म्हणोन पत्रें इजायेत[५] नामे व सजावार आहादीवर आहादी

---

* 'पालेमाळ' किंवा 'पोळमाळ' असेंही होईल.

५. इजायत नामे म्हणजे काय ? 'इताबनामे' तर नव्हे ! इताबनामे म्हणजे इतराजी पत्र. सजावार = योग्य. आहादी = मनुष्य, इसम.

रवाना केले. ते पावले. असदखां वजीर याचें लिहिणें, याउपरी तुम्हीं मर्दुमीकरून कजाखी करीत जावी. पादशाहाची गैरमर्जी होईल. इतराजींत येतां. मराठी फौज तुम्हांस लढाईनें हातीं लागत नाहीं हें सर्व पादशहाचें ध्यानीं भरलें. परंतु चंदीवरच येलगार करून किल्ला सत्वर फत्ते करावा. तरीच बरी गोष्ट. असें लिहिलें गेलियावर जुल्फकारखानें महाराजांकडे सांगून पाठविलें, या रीतीनें हुकूम आला. तेव्हां किल्यावर खर्स्त[६] होईल. तसें करणें प्राप्त आहे. तुम्हीं आपला विचार आठ चार दिवसांत पाहिजे तसा करावा. कांहीं सबुरी केल्यास आह्मांबरोबर सरदार पादशहाचे कृपेतील [आहेत] ते आमची नालस्ती कळवितील यास्तव आम्हांस निकड करणें आलें. असें सुचविलें.

ते समयीं महाराजांनीं विचार केला कीं, चंदीवर किल्लेबंद होऊन लढाई देऊन पुरुषार्थ काय करावा? येथून निघून पुन्हा देशीं जावें. रामचंद्रपंत फौज, किल्ले बेलाग राखून आहेत. नारो शंकर* व परशरामपंत कर्ते, ते राज्य रक्षावें तसें रक्षीत आहेत. बाहेर आपले सरदारही आहेत. पुन्हा चंदी घेणें ती फौजा गेल्यावर अशक्य नाहीं. निघणें बेहत्तर†, तरी तहाच्या रीतीनें संकेतानें निघावें. हस्तगत होणें ठीक[७] नव्हे. त्यांचें ऐकावें, आग्रह कांहीं कामाचा नव्हे. कारणेंही बहुत आहेत. सांप्रत काबेबाजीनें निघावें. दौलत खजीना बहुत जमला [ तो टाकिला पाहिजे. तथापि ] जेथें जाऊं तेथें पुन्हा सृष्टि करितां येईल. खानांनीं आजपर्यंत आमचे संकेताप्रमाणें यश दिलें. सांप्रत त्यांस यश देणें प्राप्त आहे. परंतु कबिले कोणते रीतीनें काढावे तें हुन्नर कळेल तसें काढावें. यवनाशीं प्रसंग बनला. मोठें संकट प्राप्त झालें. हा विचार कसा करावा? असे बहुत विचारीं पडले. खंडो बल्लाळ यांस देशीं रवाना करावें तर जुल्फकारखान यांणीं चंदीस वेढा घातला. कूच दर कूच करून येऊं लागले. तेव्हां धनाजी जाधवराव सेनापति यांजबराबर फौज देऊन खानाशीं लढाया पांच चार दिल्या. त्यांत त्यांचे फौजेचा नामोहरम जाला. खंडो बल्लाळ यांस रामचंद्रपंत हुकमतपन्हा यांजकडे रवाना केलें. त्यांणीं जाऊन रामचंद्रपंतांस सर्व कळवून तिकडील फौज जमा करवून फिरोन सत्वर यावेंसें ठरवून पाठविलें होतें. ते त्रिवेदी प्रांतीं अरुणाचलाचे ठाणेंत वस्तीस

---

६. खस्त, कस्त=कष्टी मेहनत.

* चि० प्रतींत नारो शंकरचें मात्र नांव येथें दिलें आहे. परशुराम पंताचें नाहीं. हा नारो शंकर कीं संकाजी नारायण? मागें पृ० ३२ टी० ५८ पहा. येथें दोन्ही प्रतींचा पाठ नारो शंकर असा आहे.

† बेहत्तर—‘ अनुकूलस्तु बेहतर् ’ रा० व्य० को०.

७. “ परंतु निघणें तें तह करून निघणें हस्तगत होणें ठीक नाहींच. काबेबाजीनें निघालें पाहिजे.” चि० प्र०

गेले. तेथें कोणी एक द्वेषी ओळखीचा होता त्याणें चाहाडी करून कैद करविलें. ते वर्षभर बेडी पायांत, गळ्यांत जंजीर[८] तोफेची. त्यांजबरावर कारकून होता, त्याच्याही पायांत बेडी. याप्रमाणें उभयतां एक संवत्सर होते. तेव्हां यांणीं बहुत वारकाईनें जुल्फकारखानाकडे सांगून पाठविलें कीं, कारकून धरून बेडींत आहेत ऐसें बाह्यात्कारें करून त्यांणीं चौकशीकरितां न्यावें [ असें केलें ][९] त्यांचा निरोप कीं, चौकशीस इकडे पाठवावें. त्यावरून मशारनिले व कारकून खानाकडे पाठविले. खानांनीं समक्ष नेऊन चौकशी करावयाची म्हणोन एकांतीं चौकशी करितात तों खंडो बल्लाळ ओळखीचे. हे मातबर माणूस राज्योपयोगी चतुर, दरखदार ओळखून त्यांजवर बहुत संतोषित जहाले. महाराजांचे विश्वासू, माहीतगार, कितेक बारीक मोठे निरोप सांगणें ते यांजपाशीं सांगून हे कारकून रोजगारशीर म्हणोन सोडिले. ते किल्यांत जाऊन महाराजांस भेटून सकल वृत्त निवेदन केलें. कोंडो विठ्ठल यांणीं आपणांस धरविलें सांगितलें [ त्या ] वरून त्याचें पारपत्य महाराजांनीं करोन खंडो बल्लाळ यांचा बहुत मान केला.

जुल्फकारखान याजकडील फौजेशीं व महाराजांचे फौजेशीं लढाई होत, खानाचा नाश पुरा होत, हें वर्तमान खान आहादीवरून वरचेवर पादशहास लिहीत असत. या संधींत शंकराजी नारायणं[१०] यांणीं पादशहाची स्वारी विजापुराकडे गेली, ही संधी पाहून पुन्हा सिंहगड व पुरंदर राजगड, व तोरणा व रोहिडा व पुणें वगैरे घेतलें. मोठी शर्त केली. हें वर्तमान हुकुमतपन्हा यांणीं महाराजांस चंदीस लेहून कळविलें. बहुत खुषी जहाली. आणि खानाकडे अन्य वेष धरून खंडो बल्लाळ व आवजी निळो व अंताजी मंगाजी[११] या त्रिवर्गांनीं जावें यावें असें करीत असत. तेव्हां "पादशहाकडील आम्हांस निरोप वरचेवर येतात, आम्हीं लिहितों मराठी फौज अनिवार, परंतु हा मजकूर गाळून चंदी घ्यावी, कजाखी करा, हें वारंवार लिहून येतें यास्तव आम्ही किल्यास वेढा देणार" असा खास निरोप खानाकडील आला. त्याजवरून छत्रपति यांणीं सर्व मुत्सद्दी जमा करून निघावयाचें ठरविलें. धनसिंगराव जाधवराव सेनापति व संताजी घोरपडे ममलकतमदार इत्यादि सर-

---

८. जंजीर=साखळी, सांखळदंड.

९. "ठाणेदारानें खानाकडे निरोप पाठविला" असें इं० प्रतींत आहे.

१०. वर टीप ५८ व * पहा. येथें दोन्ही प्रतींचा पाठ 'शंकाजी नारायण' असाच आहे व हाच बरोबर आहेअसें म्हटलें पाहिजे. नारो शंकर हा शंकाजी नारायणाचा पुत्र. हा आपले बापा पाठीमागें शाहूचे कारकीर्दीत सचिव झाला.

११. चि० प्रत खंडो बल्लाळाचें मात्र नांव देते, दुसरे दोघांचीं देत नाहीं.

दार यांसि सांगितलें कीं, फौजा चहूंकडे पसरल्या त्या जमा करून बेंगरूळचे
रस्त्यांनीं झाडीचे आश्रयें करून रहावें. याप्रमाणें सांगून मालमत्ता, खजीना,
पागा, पीलखाना[१२] वगैरे झाडून काढून खानास सांगून पाठविलें कीं, आठ दिवस
निकड करूं नये. त्याजवरून खानाचाही निरोप आला, जलदी निघावें. त्या
काळीं महाराज बाहीर निघाल्यानंतर किल्यांत राहून किल्ला कोणी लढवावा,
याचा विचार पडला. या मसलतीस आठ दिवस गुजरले गेले. या संधींत
वेढा येऊन बसला. तेव्हां मराठी फौज बाहीर कांहीं होती त्यांची यांची लढाई
शर्तीची जहाली. मोंगली फौज बहुत, यांची फौज दहा पांच हजार परंतु
पराकाष्ठेनें लढोन निभाव न पडे. निघोन गेले. किल्याभोंवते मोर्चे बसले.
तेव्हां सर्वत्रांस विचार पडला, महाराज बाहेर कसे निघतात? मोंगली फौजेनें
वेढा घालून मोर्चेबंदीची निकड बसली. बाहेर खानाकडील कही जात असे,
त्याजवर महाराजांकडील फौजेंतील सरदार जाधव, घोरपडे, आटोळे, थोरात
इत्यादिकांनीं [ पडून ] लुटावें, छापा घालावा, हत्ती, उंटे, घोडीं न्यावीं,
रात्रंदिवस लांडगेतोड करावी. परंतु वेढा उठेना. त्या काळीं चि-
टणीस, वांकनवीस, पारसनीस यांणीं दरवाज्याचे मोर्च्यांचें साधन करून
खानास भेटून, " नेम केला [ होता ] त्याप्रमाणें निघणें जहाले नाहीं. पुढें मसलत
कशी करावी ?" [ असें विचारिलें. खान ] बोलले कीं, " तुमचा नेम केलेला जाला
नंतर आम्हीं आलों. आम्हांकडे दोष काय ? " " आपल्याकडे दोष नाहीं. परंतु पुढें
कसें करावें हें सांगावें, " [ असें विचारिलें. ] त्याजवरून खान यांणीं सांगितलें
कीं, " तुमचे फौजेनीं आमचे फौजेची लांडगेतोड करावी. किल्यांतून तुम्हीं
निघोन मोर्चे बेलाशक मारावे. बाहेरून आंतून संकेत करून बाणांची गर्दी
करावी. तशा संधींत निघोन जावें. अशी गोष्ट न घडल्यास आमच्यांत मराठी
फौज आहे. त्यांतील सरदार मोर्चेस आहेत ते तुमचे सोइरेधाइरे असतील.
त्यां [ शीं ] संधानें करून त्याद्वारें जावें." अशी मसलत सांगून या त्रिवर्गांस
पाठविलें.

त्यांणीं येऊन छत्रपतीस सविस्तर सांगितल्यावरून मसलत चांगली [असें म्हणाले.]
त्याप्रमाणें तीन वेळां लढाई रात्रंदिवसा केली. कुटुंबें ठेवून सरदार काढून दिल्हे.
परंतु महाराजांस प्रल्हाद निराजी प्रतिनिधि यांणीं जाऊं दिलें नाहीं. यांतील कारण
लढाईचा प्रसंग, रात्रीचा विषय, त्यांत गोळी अथवा बाण लागल्यास कसें करावें ?
यास्तव छत्रपतींस जाऊं दिल्हे नाहीं. चिटणीस यांस सांगितलें कीं, मोर्च्यांचें
साधन करून महाराजांस काढावें हें चांगलें. त्याजवरून मोर्चेबंदीस मराठे

१२. फीलखाना = 'पील-स्थान', 'गजशाला पीलखाना' रा० व्य० को०.

कोण कोणत्या ठिकाणीं आहेत त्याचा शोध केला. किल्याचे नैर्ऋत्येस शिर्के यांचे मोर्चे आहेत, त्यांत मुख्य गणोजी व राणोजी शिर्के आप्त, परंतु संभाजी महाराज यांनीं शिरकाण[१३] केलें त्या दहशतेनें उभयतां शिर्के पादशाहींत येऊन, इकडील द्वेषी हें समजून त्यांजवर बहुत इतबार ठेवून सरदारी देऊन [ पादशहानीं ] वाढविले. असे इतबारांत आहेत. पांच सात हजार फौजेचे सरदार, त्यांजकडे एक अंग नैर्ऋत्येकडील. त्यांजकडे राजकारण करावें तरि ते पूर्व स्मरतील. परंतु कसेंही असो. आपले आप्त याहून अधिक कोणी मोंगलाईंत नाहींत. त्यांस हरएक प्रकारें वश्य करावें म्हणून खंडो बल्लाळ यांस सांगितलेवर बहुत युक्तीनें रात्रीचे ठायीं बुरुजावरून पाळणेंत बसोन जाऊन भेटले. त्या बोलण्यांत शिर्के यांचा अति आग्रह. "जसें आमचें शिरकाण केलें तसें भोंसले यांचा निरवंश झाल्यास चिंता नाहीं. हें फार चांगलें होतें." हें बोलणें ऐकून चिटणीस बोलले कीं, "या समयास तुम्ही बोलतां हें योग्य नव्हे. तुमचें शिरकाण केलें तसेच आमचे तीन पुरुष हत्तीचे पायांखालीं मेले, तेही गेले. परंतु हिंदूंच्या दौलतीकरितां आम्ही झटतच आहों. ज्यास जसा प्रसंग पडेल तसे झटतच आहेत. आणि तुम्हीं तो आप्त, शरीख[१४] आहां. या समयास महाराज व कबिले काढून द्यावे. तुमचे भाच्याचेंच राज्य. या समयीं राजाराम साहेब यांस कुटुंब सुद्धां पार करून दिल्यास तुमची कीर्ती होईल." असें बहुत रीतीनें बोलून, ताळ्यावर आणोन राजकारण सिद्ध केलें. ते समयीं त्यांनीं आड घातला जे, "तुम्हांस दाभोळेचें वतन दिल्हें तें आम्हांस द्यावें म्हणजे आम्ही मराठे आहों, मराठी राज्य कसेंही सुटावें, वृद्धीस जावें, हेंच आम्हांस श्रेयस्कर. पुढें परंपरेनें कार्यास तेंच येईल. हे आमच्या कामास किती दिवस येणार?" असें बोलिले. तेव्हां खंडो बल्लाळ यांणीं "स्वामि-कार्याहून वतन व जीवित्व कांहीं आम्हांस अधिक नाहीं. सर्व अर्थ आमचे स्वामींचे पाय आहेत." म्हणोन तात्काल वतनाचें पत्र करून देऊन, दुमाल्यास राजपत्र करून देतों म्हटल्यावरून शिर्के बोलिले कीं, "मोहितेही आप्त, या राजकारणांत त्यांस घेतले पाहिजे. यास्तव त्यांस रत्नागिरि तालुक्यांत कुटरी [ कुचरी? ]

---

१३. शिरकाण = शिरक्यांचे निर्मूळ, सत्यानाश. मागें सं० म० च० पृ० १६ पहा. चि० प्रतींत वेढा बसल्यावर "मोर्चेबंदी तरी बहुतच. चौकी पहारे भोंवते सरदार सरकारी. यांतून पार पडणें व कबिले निघणें हा विचार खानाचे विचारेंही निवेना. तेव्हां गणोजी शिर्के व रामाजी शिर्के" इ० इतकेंच लिहिलें आहे. शिर्के यांजकडे संधान लावण्यास खानानें सुचविलें असा आशय या प्रतीचा नाहीं. ही युक्ती खानानेंच सांगावयास पाहिजे होतें असेंही वाटत नाहीं.

१४. शरीख=वांटेकरी, भागीदार.

गांव आहे तो इनाम करून द्यावा. आम्हांस भोर तालुक्यांत तीन गांव व रत्नागिरी तालुक्यांत पांच गांव इनाम करून द्यावे." तेंही कबूल करून माघारे येऊन राजश्रीस[१५] कळविलें. बहुत संतोष जहाले. करार करून आल्याप्रमाणें शिर्के व मोहिते यांस गांवच्या व दाभोळ येथील देशमुखीच्या सनदा करून घेऊन अंताजी मंगाजी वांकनीस व खंडो बल्लाळ चिटणीस हे उभयतां पुन्हा पाळण्यांतून उतरोन जाऊन, सनदा देऊन, अमके दिवशीं निघावें हा संकेत ठरवून, राजश्री बराबर कबिले निघणार नाहींत, त्यांस खानाच्या विचारें ठरवूं त्याप्रमाणें तुम्हीं कबिलेही पार करून द्यावे असा निश्चय करून, पुन्हा उभयतां येऊन महाराजांस भेटले. नंतर जुल्फकारखान यांस जाऊन भेटले आणि समजाविलें कीं, आम्ही महाराजांसहवर्तमान हरतऱ्हेनें निघतों, परंतु कबिले आपण काढले पाहिजेत. असें म्हटल्यावरून खान साहेब यांणीं बेत सांगितला कीं, " महाराजांनीं निघोन जावें. कबिले खाशा वाड्यांतून बाहीर असावे. सेवेच्या बाइका व ते एकत्र असावे. आम्ही झाडा काढून चौकशी करून सोडितांना शिर्के व मोहिते मराठे मंडळ यांणीं आपल्या आप्तांच्या बाइका म्हणून सोडून घेऊन बाहेर न्याव्या. आम्ही वाड्याची चौकशी बंदोबस्त करून झाडा घेऊन सोडवून देऊं." याप्रमाणें राजकारण शिर्के व खान यांजकडील सिद्ध करून दोहींकडील बेत जिकडे तिकडे समजावून पुन्हा आले. आणि रात्रीं निघावयाचा निश्चय करून किल्यांत हरजी महाडीक याचा फर्जंद ठेवून, छत्रपति यांणीं मोठे मोठे सरदार मुत्सद्दी मंडळ घेऊन, पाळण्यांत बसोन उतरोन शिर्के, मोहिते यांच्या गोटांत सर्व मंडळी सुद्धां गेले. तेथें रात्रीं गुप्तरूपें राहून बाहीर जाधवराव वगैरे सरदार होते त्यांस सूचना करविली. आणि दुसरे दिवशीं शिर्के मोहिते वगैरे मंडळी शिकारीचें निमित्त करून दहा पांच कोश जाऊन धनसिंगराव जाधवराव सेनापति, व घोरपडे व दाभाडे सुचनेप्रमाणें तेही आले [ होते ] त्यांत नेऊन पोंचविलें.

नंतर किल्यामध्यें महाडीक यांचे फरजंद[१६] होते. ते किल्ला लढवीत असतां महाराज निघोन गेले, मोठे मोठे सरदार कबिल्या सुद्धां [ गेले, ] हें शहरांतील किरकोळ लोकांनीं ऐकून बहुत हवालदील जहाले. वेढा घातला त्या दिवसापासून किल्ला ६ महिने लढत होता. कबिल्या सुद्धां महाराज गेले सबब लोक बहुत हवालदील झाले हें फरजंद यांणीं पाहून तहाचें बोलणें लाविलें. तहास खानाकडील सल्ला पडेना. हल्ला करून लोकांचा कत्तल[१७] करूं. आमचा

१५. हा मोहित्यांचा व भोरचा मजकूर चि० प्रतींत नाहीं.

१६. फरजंद=मुलगा.

१७. कत्ता=कत्तल.

नाश बहुत केला. असें बाह्यात्कारें मोठ्या रोषानें बोलूं लागले. ते समयीं शिर्के, मोहिते इत्यादिकांनीं खानापाशीं सक्तीचा अर्ज केला कीं, "तहाचें बोलणें आल्यानंतर असें सरदारांनीं बोलूं नये. बरायखुद पादशहांनीं पनाळा, सातारा वगैरे किल्ले घेतले तेव्हां तहानें लोक उतरले. त्यांस तहाप्रमाणें खाशांनीं पार करून दिल्हें. आपल्या लष्करांत आम्हीं सर्व शिवशाईंतील चाकरीस आहों. आपले फौजेंतील मोंगली लोक शिवशाईंतच चाकरीस आहेत. आमचे सोइरे धायरे एकमेकांनीं [ एकमेकासाठीं ] बोलावें. त्या अर्थीं साहेबीं तह करावा." तेव्हां खान बोलले कीं, "पादशाहा यांनीं तह करून लोक सोडिले, तेथें खांसा राजाराम नव्हता. येथें खांसा आहे त्यास आम्हीं हस्तगत करणार. तहानीं खांसा सोडिल्यास खांसे आम्हांस काय म्हणतील? गैरमर्जीत येऊं. यास्तव तह करावयाचा नाहीं." तेव्हां शिर्के, मोहिते बोलिले कीं, "महाराज जाऊन सहा महिने जहाले. महाराज आहेत असें असल्यास आम्हीं बोलणार नाहीं. लोक सरदार सोइरे धाइरे यांचे कबिले आहेत यांविशीं बोलूं. आपण तह करून त्याप्रमाणें पार करावें- कबिले असतील ते जिम्मेस घेऊं." याप्रमाणें सक्त[१८] भीड घालून खानसाहेब यांचा करार करून घेऊन ठरविते जहाले. खान [ यांस ] बोलिले कीं, "इतके तुम्ही झटतां [ पण ] राजाराम असल्यास तहांत येणार नाहीं. आमचे आप्त सोइरे धाइरे, आमच्या बहिणी वगैरे प्रत्यक्ष आहेत. सर्वांची अबरू सारखी. आप्तांचे कबिले जिम्मेस घेऊं. लोक उतरतील त्यांस हत्यारबंद सुद्धां पार करून द्यावें." अशी बहुत सक्त भीड पडली. तेव्हां साहेब ऐकेनात. दाऊदखान व सर्ज्याखानही बोलिले कीं, "सरदार बोलतात हें ऐकावें" [ असें ] म्हटल्यावरून तहाचा सल्ला दिल्हा. त्यावरून खांसा साहेब यानें किल्याच्या दरवाज्यापुढें बिचोबा[१९] आणोन देऊन तेथें राहिले. तह केला. सोडावयाचे ते सोडून दिल्हे. शिर्के यांणीं आपले आप्तांचे कबिले म्हणोन महाराजांच्या तिघी स्त्रिया व पुत्र दोघे व इष्ट मित्रांच्या स्त्रिया वगैरे मंडळी सुद्धां आपल्या गोटास नेलें. शके १६१८ धातानाम संवत्सरीं चैत्र शुद्ध १ प्रतिपदेचे दिवशीं जुल्फकारखान यांणीं चंदीचा किल्ला घेतला. कोणी कोणी शहरांतील गृहस्थांनीं येऊन भेटावें. त्यांची चौकशी करून त्यांस पार करून द्यावें. राजाराम नाहीं असें दर चौकशीस खानानीं म्हणत असावें.

त्या संधींत आवजी निळो पारसनवीस खानास येऊन भेटले. त्यांणीं

---

१८. सक्त=मोठी, जबरदस्त.
१९. बिचोबा = छोटा तंबू. यास काठी नसते.

विचारिलें कीं, तुम्ही कोण ? ते बोलले कीं, आम्ही पारसनिवीस[२०] आहों. त्यावरून पारशी बोलण्याचें भाषण जहालें. अकबरनामे[२१] वगैरे यांतील रहस्य समजून घेतलें. त्यावर खान साहेबांचा लोभ बहुत जहाला. त्या काळीं सिकंदरनामा[२२] वाचून अर्थ करून सांगितला. महिना पंधरा दिवस सिकंदरनामा वाचावयास लागले. वाचणें झाल्यावर खानाची मर्जी बहुत खूष होऊन, बक्षीस मागावें म्हणून बोलिले. तेव्हां पारसनवीस बोलिले कीं, आम्ही देशाहून पोट भरावयासि मंडळी कुटुंब सुद्धां आलों तरि देशीं जाण्यास आम्हांस सर्व मंडळी सुद्धां कृपा करून परवानगी द्यावी. हेंच बक्षीस देणें द्यावें. त्यावरून कुटुंब सुद्धां निरोप दिला. निघोन[२३] गेले.

त्या संधींत गांवांतील माहितगार खानापाशीं येऊन बोलिला कीं, मोठे मोठे सर्व मंडळी धरून देतों, व सावकारही दाखवितों. असें बोलिला. तेव्हां [ हा ] हरामखोर [ असें मनांत जाणलें ] परंतु कचेरींत पादशाही सेजावले[२४] वगैरे जवळ होते तेव्हां बरें आहे, शाबास ! म्हणोन बोलिले. त्याचें कांहीं ऐकावें कांहीं न ऐकावें असें करिते जाले. त्याचे सांगितल्यावरून शहरांतील मालमत्ता लोकांचा बहुत काढिला. चौकशी करितांना मोठे मोठे लोक सांपडले ते कैदेंत ठेविले. गोरगरीब खलक‡ चीजबस्त घेऊन सोडून दिल्हे. महाराज व कबिले आंत असतील म्हणोन बहुत बारकाईनें शोध केला. ते निघोन गेले असें समजोन चीज बस्त, मालमवेशी, द्रव्य, जवाहीर, हत्ती, घोडे, अपरमित सांपडलें तितकें याददास्त करून छकडे भरले. त्याचा बंदोबस्त करून ठेऊन महाल, मुलुक, किल्ले, ठाणीं, घेऊन बंदोबस्त करिते जाले.

राजाराम साहेब आपले फौजेंत येऊन मिळाले. आणि दोन टोळ्या केल्या. धनसिंगराव जाधवराव सेनापति एक्या टोळींत, संताजीराव घोरपडे ममलकत मदार वगैरे मंडळी आपल्या टोळींत घेऊन निघाले. मोंगलाची फौज मागें लागली असतां लढाई होत होत खांसा स्वारी विशाळगडास येऊन पोंहोचले. सेनापति यांच्या मागें मोंगली फौज कांहीं लागली. त्यांस लढाई देत धनगीरीचे[२५] आश्रयास येऊन, तेथें राहून, मोंगलाई फौजेचा पराभव करून, तेही देशीं विशाळगडास आले. मागाहून शिर्के, मोहिते यांणीं महाराजांचे

---

२० पारसनवीस=फारसी लिहिणारे, फारसी भाषा जाणणारे.

२१. अकबरनामा = अकबर पादशहाचा इतिहास. हा फारसींत लिहिलेला आहे.

२२. शिकंदर नामा = शिकंदर [ आलेक्झांदर ] याचा वृत्तांत.

२३. ही पारसनवीस यांची हकीगत चि० प्रतींत नाहीं.

२४. सजावल=शूर सरदार.

‡ खलक = महार, चांभार वगैरे नीच जातीय.

२५. 'कनकगिरे' चि० प्र.

कुटुंब व उभयतां पुत्र व नाटकशाळा वगैरे विशाळगड मुक्कामीं पोंचते केले. त्यांचे बहुमान करून चंदीच्या मुक्कामीं इनाम वगैरे देऊं केलें, त्याप्रमाणें त्यांस दिल्हें.

इकडे जुल्फकारखां याणें चंदीकडील महाल मुलूक यांचे बंदोबस्त करून आपण फौज सुद्धां कूच करून पादशहा विजापूर प्रांतीं [ होते ] तिकडे जाऊन भेटले. आणि "राजे कुटुंब सुद्धां पळून गेले. किल्ला फत्ते केला. मातबर बंदे[२६] बहुत आणिले. मालमत्ता, हत्तीघोडे, जवाहिर, खजीना, आणिला" [ असें सांगून ] तो रुजू केला. यावरून पादशहा बोलिले कीं, "तुमचा वेढा पडावयाचेपूर्वीं राजे निघोन विशाळगड प्रांतीं आले[२७] असें आम्हीं ऐकिलें." खान यांणीं खजीना हत्ती घोडे बहुत आणोन दिल्हे म्हणोन बहुत खुषी होऊन नवाजीस केली. बंद आणिले त्यांतील लोक साठ पांसष्ट असामी दावणीस देऊन शिरच्छेद करविले. चंदींत ज्याणीं पुढें होऊन नांवें सांगितलीं त्यांस काम जाहलियावर हा निमकहराम म्हणोन चंदीच्या मुक्कामीं तोफेच्या तोंडीं उडविलें. पादशहापर्यंत नेहला असतां काय समजावील नकळे म्हणोन तेथेंच मारून टाकिला. तिमाजीपंत हणमंते बंदांत सांपडले होते. सारे बंदीवान यांच्या गळ्यांत एक जंजीर, त्यांत हे [ होते ] त्यांस हगवणीचा उपद्रव जहाला याजवरून बंदीवान यांणीं खानास अर्ज केला, "आज आम्हांस मारावें, नाहीं तर हगवणकरी यांतन काढावे." [ असें ] म्हटल्यावरून कोंडो विठ्ठल व हणमंते व दोन चार असामी सोडून दिल्हे. त्यांत हणमंते मात्र वांचून विशाळगडीं आले.

[ इकडे ] परशरामपंत व नारोपंत व हुकमतपन्हा यांणीं पन्हाळा, सातारा वगैरे किल्ले घेतले. ते किल्ले ज्याचे त्याजकडे कायम करून ठेविले. कोंकण प्रांत सुभा सिदोजी गुजर याजकडे संभाजी महाराज यांणीं सांगितला होता; त्याचे हाताखालीं कान्होजी आंगरे होते. शहाणे, शूर, मर्द जाणोन सिदोजी गुजर चंदीकडे स्वारीबरोबर जातांना आंग्रे यांस सुवर्णदुर्गीं ठेविलें. त्यांणीं तेथें राहून बहुत खबरदारीनें सर्व जंजिरे व प्रांत राखिला. कांहीं किल्ले ठाणीं पादशाहींत गेलीं तीं जवामर्दीनें घेतलीं. झाडींतून हिंडणें, स्वाऱ्या करणें [ असें करूं लागले. ] जागा पादशाई लोक याणें खराब केलेले उठले, मोडिले, ते नीट करून स्वारी शिकारी करणें असे बहुत कर्ते [ झाले. ] त्याज-

---

२६. बंद=कैदी.

२७. विशाळगडास दिसेंबर १६८९ मध्यें राजाराम पोंचला व ज्यानेवारी १६९८ मध्यें खानानें जिंजी सर केली.

वरून महाराज आलियावर त्यांणीं सर्फराजी[२८] करून त्यास सेरेखेल[२९] असा किताब दिल्हा. रामचंद्रपंतांनीं बहुत पराक्रम [ करून ] स्वारी गेलियावर राज्य रक्षून पुन्हा स्वारी येऊन बसावयास जागा राखिले म्हणोन त्याजवर कृपावंत होऊन सर्व यख्त्यार[३०] त्याजवर ठेविला. आणि कामकाज दौलतीचें करणें तें त्यांचे विचारें करीत चालले.

इकडे जुल्फकारखान पादशहास भेटल्यानंतर विचार केला जे, " शिवाजीचें राज्य निष्तोषें[३१] मोडत नाहीं. राजाराम देशीं येऊन विशाळगडीं राहिले. सह्याद्री बंदारीचे किल्ले मात्र आहेत. बहुत करून प्रांत तालुक्याचा बंदोबस्त आहे. या प्रांतीं सुभे ठेऊन बंदोबस्ती करितां येईल. " अशी मसलत केली. बराणपुराकडेस छावणीस[३२] गेले.

राजाराम साहेब यांणीं आपल्या दौलतीबद्दल श्रम साहस ज्यांणीं ज्यांणीं केलें, ज्याची जशी योग्यता जसजसे श्रम तसतसें इनाम जमिनी देऊन [त्यांस] सरफराजी करिते जाले. त्यांत खंडो बल्लाळ चिटणीस यांणीं आपलें वतन दाभोळचें पंचवीस हजारांचें दिल्हें; चंदीस जातांना मोठें धाडस करून महाराजांस काढून आपण[३३] राहिले; पुन्हा येतांना निघणेचें राजकारण खानाचें व शिर्के यांचें करून निघण्याची शर्त केली; आणि आपले पोटचें पोर जातीची विजात[३४] केली; कैदेंत सांपडले असतां बुरुजांतून उडी टाकून निघाले[३५], त्याणें शरीरही अदू जालें; आपले दौलतीबद्दल अप्रतिष्ठा बहुत भोगिली; व पूर्वी संभाजीराजे यांणीं बाप भाऊ चुलते मारिले हें मनांत न आणितां स्वामी सेवा निष्ठेनें केली; हें जाणोन छत्रपति कृपाळू होऊन पंधरा वीस हजार आकाराची सरदेशमुखी चौलप्रांतीं व नाडगौडीचें[३६] वतन देऊन इनामपत्रें दिल्हीं. याप्रमाणें पदरचे मनुष्याची सर्फराजी केली. त्या काळीं मनुष्यमात्रास वाटावें जे, " आम्हांवर महाराज बहुत लोभ करितात. निष्ठेनें सेवा करावी. " असे सर्वत्र लहान थोर सेवा करीत असत. अंताजी मंगाजी वाकनीस व आवजी

---

२८. सरफराजी=( कामगिरीबद्दल ) नवाजीस, बढती.

२९. " सर्खेल इतितु प्रोक्तो ध्वजवृंदाधिकारवान् " रा० व्य० को०.

३०. यख्त्यार=अखत्यार, अधिकार.

३१. निष्तोष=निस्तुष=साफ, अगदीं.

३२. बराणपुरास छावणीस गेल्याबद्दल इंग्रजी ग्रंथांत आधार नाहीं.

३३. बेंगरूळ मुक्कामीं. मागें पृ० पहा.

३४. पोटच्या पोराच्या जातीची विजात केल्याबद्दल पूर्वी कोठें मजकूर आलेला नाहीं. हा प्रसंग चिटणिसांवर केव्हां आला बरें ?

३५. हाही प्रसंग मागें आलेला आठवत नाहीं. हें कोठें झालें ?

३६. नाडगौडा—चौथेच्या आकारांतून दर शेकडा ३ प्रमाणें घेण्याचा हक्क.

निळो पारसनवीस यांची सरफराजी करून, बहुमान योग्यता वाढवून, कांहीं इनाम कांहीं सरंजाम देऊन, उभयतांस हुकुमतपन्हा यांचे निसबतीस ठेऊन, त्यांच्या हातून कामें मोठमोठीं घेत चालले. उभयतांवर विश्वास बहुत. निष्ठेनें वागत.

नंतर मोंगली फौज या प्रांतीं त्यांशीं लढाई करून नामोहरम करून ठाणीं घासदाणा सरदेशमुखीचा अम्मल घेऊन फौजेंतील घोडीं आणावीं, त्यांस चैन पडूं देऊं नये, फौजेंत यांचा दरारा पुरा, हें वर्तमान बराणपूर मुक्कामीं वरचेवर सुभाकडून कळत होतें. त्यावरून पादशहाचे मनांत आलें कीं, मराठी मोडत नाहीं. यास कसें करावें? तेव्हां असतखां वजीर वगैरेनीं विनंती केली कीं, "हजरत पैन्हा[३७]! मराठे लोक कजाखी[३८], बहुत नेकजाते[३९], एकदील. ज्याचें निमक[४०] खातात त्याची चाकरी हलाल[४१] करितात. आज पंधरा सोळा वर्षे खुदावंत त्यांची खामी[४२] करवितात तरी ते मोडत नाहींत, यास्तव तह करून चाकर असें ठरवून चाकरी घ्यावी. कर्नाटकचा बंदोबस्त करतील. मोठमोठे ठिकाणीं आपले सरदार सुभेकरून ठेवावे. हे व ते मिळून दक्षिण साडे सहा सुभेचा बंदोबस्त करतील. साहेबीं असें करवावें. दिल्लीहून येऊन बहुत वर्षें जहालीं. दिल्लीस स्वारी जावी." हें ऐकून पादशहा बोलिले कीं, "फार चांगलें बोलतां. आमच्या मनांत नाहीं असें आहे कीं काय? शिवाजीपासोन आम्हीं उद्योग करीत आहों. म्हराठी यांणीं चाकर म्हणवावें, यांचें राज्य राखावें, यांच्या हातून चाकरी घ्यावी [ असा आमचा इरादा. ] परंतु ते चाकर म्हणवीत नाहींत सबब त्यांचें पारपत्य करावें, असा आरंभ केला. संभाजी राजे मारिले. संभाजीचा बेटा शाहू आम्हांजवळ आहे. दौलत दरोबस्त बुडविली असतां संभाजीचा भाऊ राजाराम यांणीं पुन्हा दौलत जमवून फंद करीत आहेत. त्याजकरितां तुम्हीं त्यांचे पारपत्य करावें, आणि शाहूची स्थापना करून याच्या हातून चाकरी घेऊं. नाहीं तर राजाराम यांशीं तह करून त्यांणीं चाकरी करावी. शाहू व ते एकरूप होऊन आम्हांशीं सरळ चालवें, याप्रमाणें करावें[४३]." म्हणोन वजिरास हुकूम जहाला.

इकडे राजाराम साहेबांस रामचंद्रपंत हुकमतपन्हा व परशरामपंत व संकराजीपंत व नारोपंत सर्वत्र एकत्र होऊन विनंती केली, "स्वामींचे राज्य आजपर्यंत

३७. हजरतपन्हा=सरकार, खावंद.
३८. कजाखी=भांडखोर, लढाऊ.
३९. नेकजात=प्रामाणिक, सचोटीचे.
४०. निमक=मीठ, अन्न.
४१. हलाल=धर्माप्रमाणें, नेकीनें.
४२. खामी=नुकसान, नाश.

४३. इतकीं वर्षें औरंगजेबानें मराठेशाही मोडण्याकरितां मेहनत केली पण शेवटीं तिला 'मोडण्याचें' टाकून 'अंकित करून ठेवण्याचा' ही त्यास विचार पडला !

कळलें तसें राखिलें. आतां स्वामींनीं बंदोबस्त करावा." म्हटल्यावरून स्वामींनीं उत्तर केलें कीं, "पूर्वी तुम्हींच केलात, पुढेंही तुम्हींच करणार." याप्रमाणें बोलोन वस्त्रें देऊन सन्मान केला. आटोळे, दाभाडे, बंडगर, पोंवार, पाटणकर, इत्यादि सरदार यांसि वस्त्रें भूषणें देऊन सन्मान करून नवाजीस केलें, आणि "पहिल्याप्रमाणें मुलकांत अंमल करीन आहां त्यापेक्षां अमल जोरतलबीचा[४४] सुरू करावा. तुरुकें[४५] याचा गुमानें[४६] धरूं नये. शिवाजी[४७] महाराजांचें पुण्य विशिष्ट आहे. त्यांचे नांवावर आजपर्यंत यश आलें. पुढेंही यश येईल. त्यांची आमची भेट होय तें सर्वत्रांनीं करावें. येवढी जोडी[४८] द्यावी. पादशहाच्या फौजेशीं लढाई देत आहां तशी देत असावी. कर्नाटक प्रांतांतील संस्थानी लोकांस बहुत मान देऊन आपले लक्षें वागवावें. व बहिरजी हिंदुराव[४९] घोरपडे याणीं गुतीस राहून कर्नाटक सुरूं[५०] करावें. वगैरे सरदार याणीं चंदी प्रांतीं जाऊन दंगा करीत असावा. ठाणीं घ्यावी." याप्रमाणें सांगितलें. त्या संधींत प्रल्हाद निराजी प्रतिनिधी याजवर कांहीं शब्दाचा अपवाद आला. महाराजांचा निरोप श्री पंढरपुरास जातों म्हणोन घेऊन श्रीपांडुरंग दर्शन घेऊन, कांहीं दिवस वास करून, तेथेंच केण्याची[५१] समाधी पुंडलीकाच्या देवालयासमीप घेऊन मृत्यु पावले[५२]. हें वर्तमान महाराजांस समजलें. बहुत श्रमी जहाले. नंतर त्यांचे पुत्र यांस पदाचीं वस्त्रें शके १६१९ ईश्वरनाम संवत्सरीं दिलीं. रामचंद्र निळकंठ हे पूर्ववतप्रमाणें काम-

४४. जोरतलब=बलात्कार, जबरदस्ती. जरब ?

४५. तुरुक, तुर्क= (येथें) मोंगल लोक, मुसलमान.

४६. गुमान=काळजी, बख्ता, हिशेब.

४७. शिवाजी=संभाजीचा पुत्र शाहू.

४८. जोडी, जोड= मिळकत, वित्त रूपा.

४९. संताजी घोरपडे याचें व राजारामाचें नीट नव्हतें तथापि प्रल्हाद निराजी जीवंत होता तोंपर्यंत संताजीच मराठे सरदारांत मुख्यत्वें वागे. पुढें धनाजीचें व त्याचें वांकडे आलें तेव्हां राजारामानें धनाजीचा पक्ष स्वीकारून संताजीला हांकून लाविलें. संताजी भटकत फिरत असतां त्याचा दुस्मान म्हसवडचा देशमुख नागोजी माने याणें त्याचें एका ओढ्यांत तो स्नान करीत असतां डोकें कापलें. (१६१८) पुढें संताजीचे दोन मुलगे राणोजी व पिराजी यांणीं फौज जमवून कर्नाटकांत स्वतंत्रपणें धूम उडविली. असो; हा बहिरजी घोरपडा संताजीचा भाऊ होय.

५०. कर्नाटक सुरू करावें=कर्नाटकांत अंमल सुरू करावा ?

५१. केण्याची समाधी–केणें म्हणजे पीतांबर वगैरेच्या भोंवतीं गुंडाळण्याची दोरी. यावरून पंतानीं फांस लावून घेतला कीं काय ?

५२. प्रल्हाद निराजी यांस चंदीसच देवाज्ञा झाली असें चि० प्रतींत आहे. ग्रां० ड० ही असेंच म्हणतात. तेथेंच त्यांच्या चिरंजिवास प्रतिनिधि पद दिलें. त्यास जिंजी घेतल्यावर झुल्फिकारखां याणें ठार मारिलें, असें ग्रां० ड० म्हणतात.

काज करीत, परंतु अर्जुर्देपणानें[53] वागत. यांतील कारण अंताजी मंगाजी वाकनीस व पारसनीस यांणीं समजाविलें कीं, "आपली मुजमी हणमंते यांसि सांगितली, याकरितां दिलगीरपणानें स्वामी सेवा करीत आहेत. हें वर्तमान स्वामींनीं मनास आणोन पंतांस मुजमी सांगावी." उभयतांची विनंती ऐकोन महाराजांनीं विचार केला जे, "हणमंते व पंत या उभयतांची योग्यता मोठी. यास कसें करावें?" म्हणोन खंडो बल्लाळ यांस कळविलें. त्यांणीं विनंती केली, "उभयतां कार्य कर्ते धन्यानें वागवावे तसे स्वामी वागवीतच आहेत. सांप्रत प्रल्हाद निराजी यांचा काळ जहाला. त्यांचे पुत्र नारो प्रल्हाद यास प्रतिनिधि पद दिल्हें. त्यास तो वडिलांप्रमाणें कार्यकर्ता दिसत नाहीं. हें जाणोन हणमंते यांस प्रतिनिधि पद दिल्हें पाहिजे. पंतास अमात्यपद द्यावें. म्हणजे पंत हुशार होऊन कर्ते-पणानें वागतील. हणमंते हुशार होऊन वीरश्रीनें कार्यें करतील. नारो प्रल्हाद यास सरंजाम इतमाम देऊन मातबरीनें वागवावें. मेल्याचीं मुलें जित्याचे हातीं. हें करणें स्वामींनीं करावें." अशी चिटणीसांनीं विनंती केली. ती गोष्ट छत्रपतींस मानली. योग्य सांगितलें. नारो प्रल्हाद यास पद सांगून नऊ महिने झाले होते. नंतर मशारनिल्हेकडील पद दूर करून रघुनाथ राव तिमाजी हणमंते यांशीं प्रतिनिधि पद सांगितलें. व रामचंद्र नीळकंठ यास अमात्यपद दिल्हें. शके १६१९. नारो प्रल्हाद यास इतमाम सरंजाम चिटणीस यांचे विचारें ठरविला. मातबरीनें वागवीत. हणमंते यांस पद सांगितलें. यावर सहा महिन्यांनीं वारले[54]. नंतर त्यांचे पुत्र तिमाजी रघुनाथ यांस पद सांगितलें. शके १६२० बहुधान्य संवत्सर राज्याभिषेक २५. राजधानी पहिल्याप्रमाणें जमवीत चालले. चंदीकडूनही सर्व येऊन पोंहोचले. मुलकांत धामधूम चंदींत असतांना करवीत होते त्यापेक्षां जाजती करवून ठाणीं तालुके जबरीनें घेत चालिले.

नंतर पादशाजादे व वजीर यांजकडून पादशहाचे हुकुमाप्रमाणें निरोप आला[55]. त्याचें उत्तर सांगून पाठविलें कीं, "चाकर म्हणवावयाचें नाहीं. तथापि तुमची

५३. अर्जुर्देपणा=उदासीनता, खिन्नता.

५४. हे हणमंते जनार्दनपंत असावे. तिमाजी त्यांचा पुतण्या झुल्फिकारखानाचे बंदांतून मुक्त होऊन आला होता तो.

५५. हें राजकारण राजाराम निवर्तल्या नंतर धनाजी जाधव याजकडे आलें व त्यानें याचा विचार करण्याकरितां सर्व मराठे सरदारांस बलावून आणिलें होतें. पुढें विचार होणार तों औरंगजेबास हें या बंडखोरांचें सांनिध्य व त्यांचा शिरजोरपणा न आवडून त्यानें तें बोलणें तसेंच तहकूब केलें. या वेळीं साडेसहा सुभ्यांची सरदेशमुखी मराठ्यांस देऊन त्यांस आपले अंकित म्हणून ठेवावें असा औरंगजेबाचा मनसुबा होता. का० खा० व ग्रां० ड०

मर्जी तर शिवाजी राजे आमचे तुम्हांपाशीं आहेत तेच आमचे आम्हांकडे पाठवावे. ते आम्ही एकत्र होऊन याचा विचार करून सांगूं." असें उत्तर जाऊन पोंहोचल्यावर वजीर यांनीं पादशहास मजकूर कळविला. त्यावरून पादशहाची गैरमर्जी होऊन, "आज पर्यंत तुम्हीं सर्वत्रांनीं मसलत वाढविली. राजाराम चंदीकडेस गेले होते ते लांब [ होते ]. हल्लीं नजीक आले. लवकर त्यांचें पारपत्य करावें अथवा हस्तगत करावें," म्हणोन हुकूम झाला. हुकुमासरशी जुल्फकारखान यास रवाना केलें.

हे बातमी छत्रपतीस कळतांच आपणही अवसान धरून फौज जमा करून सेनापती वगैरे सरदार टोळी एक व परशराम त्रिंबक व कांहीं सरदार एक टोळी व नारो शंकर याजबराबर कांहीं सरदार एक टोळी. असे रवाना करून आपण विशाळगडाहून पन्हाळ्यास आले. जाधवराव सेनापति यांची व खानाची पंढरपूरचे अजमासें लढाई जहाली. ती [५६]अरेतुरेची होऊन खानाची फौज नामोहरम जहाली. सर्जेखान व नारो शंकर यांची लढाई पुढें पुणें देशीं व ळींत लगत जहाली. खानाची बहुत तसनस जहाली. कुवारी किल्ला वगैरे मदारुलमहाम यांणीं घेऊन अंमल बसविला. परशराम त्रिंबक समशेर बहादर शहाजंग यांची व किलीजखान याची लढाई यादव [ग] डा नजीक जहाली. त्यांचाही मोड जहाला यांणीं कांहीं ठाणीं तालुके घेऊन अंमल बसविला. हें वर्तमान तिहींकडून पादशहास कळलें. त्यावरून बहुत घुस्सा येऊन आपण बराणपुराहून कूच करून औरंगाबादेस आले आणि बोलिले कीं, "म्हराठे सैतान लांब होते ते जवळ येऊन लढाया देऊं लागले. [५७]बादलबरसात गेले नंतर खुद्द जाऊन पारपत्य करावयाचें. आमचे वजीर व सरदार सारे मतलबी व फितूर." असें बोलून औरंगाबादेवर छावणी करून राहिले. राजाराम यांणीं तिघां सरदारांस वगैरे यांस वस्त्रें भूषणें देऊन बहुत सन्मान केला. मर्जी संतोष जहाली.

नंतर पन्हाळ्यावर स्वारी असतां मसलत केली जे, "मोंगली फौजेशीं आमचे फौजेनीं बहुत वेळां लढाया घेतल्या. पादशहाचा मुक्काम स्वदेशीं औरंगाबादेवर आहे. तेथें जातीनें जाऊन लढाई करावी. पादशहास कळावें शिवशाई फौज आहे. त्यांत राजाराम आहे हेंही मालूम व्हावें. खाशांस पक्कें समजावें जे, मराठी फौज हयात आहे." असें म्हणून पन्नास हजार

---

५६. अरेतुरेची = हातघाईची, घेघे मारमार करून.

५७ बादल = ढग; 'मेघो बादलनामा स्यात्' रा० व्य० को० बरसात = पर्जन्यकाल.

फौजेनिशीं सातारे मुक्कामास आले. तेथून सिंहगडीं येऊन औरंगाबादेस पादशहाचा मुक्काम असतां फौजा त्याच्या चोहोंकडे गेल्या. खांशा मुक्कामावर लाख फौज होती. इकडे राजाराम साहेब यांणीं आपल्या फौजा चहूंकडे होत्या त्या जमा करून तयारी केली. खांसा स्वारी जाऊन पादशहाचे मुक्कामावर छापा घालावा, हरतऱ्हा करून शिवाजी महाराज हस्तगत करावे, ये विशीं सर्व मुत्सद्दी यांचे विचारें [ मनसुबा ] केला. आणि पादशहाचे लष्करांत साधन करून स्वारी तयार केली. पादशहाही शत्रु जवळ म्हणोन हुशारीनेंच होते. राजाराम साहेब सिंहगडाहून कूच करून पन्नास साठ हजार फौज सडी घेऊन तीस कोसांचे पल्यावर मुक्काम केला. पुणें मुक्कामीं पंचवीस हजार फौज व नारो शंकर व परशराम त्रिंबक ठेवून आम्हांस बलकुबल[५८] पडल्यास कुमक करावी. याप्रमाणें बेत राखोन राहेरि व वोरी वरून पुणतांबें पाशीं गंगा उतरोन औरंगाबादेस खंडोबाचे सातारियास जावयाचे माळावर मुक्काम होता, त्यावर छापा घालावा असे बेतानें गेले. पादशहाकडील फौजेचा छबीनां[५९] उभा शास्तेखान याकडील [ होता. ] यांचा त्यांचा संकेत पूर्वीं जहालेला. त्या संकेताप्रमाणें वाट दिल्ही. छबीन्याचे लोक म्हणोन लष्करांत शिरले. ते दिवशीं बेगम यांणीं पादशहास आपले मुकरब्यांत[६०] मेजवानी केली. आपले चिरंजीव शाहू महाराज यांस मंडळी सुद्धां नेहलें होतें. ते दिवशीं मुक्काम तेथेंच जहाला. ते दिवशीं राजाराम साहेब यांणीं रात्रीं छापा घातला. टोळ्या दोन केल्या. पूर्वभागेस पांच हजार स्वार दर स्वारापाशीं एक एक बाण त्यांणीं जाऊन बाणाची मारगिरी करावी. म्हणजे फौजेची ओढ तिकडे पडेल. आपण गुपित घाला घालोन दक्षिणेकडून जाऊन शिवाजी महाराज यांस हस्तगत करावें. म्हणोन संकेत करून अशा रीतीनें छापा घातला. छाप्यांत पादशहाचे फौजेची तसनस बहुत जहाली. खजिना लुटला. परंतु पादशहाचा मुक्काम व शिवाजी महाराज यांचा मुक्काम लष्करांत नव्हता. महाराजांची मर्जी बहुतच दिलगीर[६१] जहाली. संकेत पूर्वीं समजता तरि मुकर-

---

५८. बलकुबल = धोक्याचा किंवा संकटाचा प्रसंग, कठीण वेळ.

५९. छबीना = पहारा ( स्वारांचा ).

६०. मुकरबा = मुकर्रबा = तंबू.

६१. सौप्तिकपर्वांतील अश्वत्थाम्याच्या निराशे प्रमाणेंच राजारामाची येथें निराशा झाली! कृष्णानें शिबिरांतून पांडवांस एकीकडे काढून नेलें असल्यामुळें जसे ते अश्वत्थाम्याच्या असिलतेच्या झपाट्यांतून वांचले तसाच येथें औरंगजेब ह्यास बेगमनें गोटांतून आपले मुकर्रब्यांत नेल्यामुळें तो राजारामाचे हातून वांचला.

ही बादशाही गोटावर छापा घातल्याविषयींची हकीगत चि० प्रतींत नाहीं. काफीखान ही आपले ग्रंथांत ह्या छाप्याविषयीं कांहीं उल्लेख करीत नाहीं. तथापि गोटावर हल्ला केल्याबद्दल मागें ह्या बखरींत वर्णन अनेकदा आलें आहे.

त्यावरच घाला घातला असता. ईश्वर इच्छा. म्हणोन तोफेचे जंजीरें[६२] तोडून फौज सहवर्तमान निघोन जालनापुरास[६३] येऊन पेठ लुटून जाळून टाकिली. दुसरे दिवशीं पादशहा यांणीं विस्मय केला. यांपुढें उपाय नाहीं! राजाराम साहेब गंगातीरीं आंबेड, पैठण, बीड इत्यादि कांहीं लुटून कांहीं जाळून कांहीं खंडण्या घेऊन पुण्यास येतांना कात्राबाद मांडवगण येथें फकीर यांचा तकिया[६४] मातबर होता त्यांत पादशहा कडील लोक होते, ते राजाराम यांचे स्वारीवर धांवले, त्यांशीं लढाई करून तकियाचा विध्वंस करून लुटून फत्ते होऊन पुन्हा नेमाप्रमाणें पुण्यास दाखल जहाले. अमात्य वगैरे मुत्सदी सरदार [ ह्यांणीं ] आश्चर्य केलें. तेव्हां महाराज बोलले कीं, "श्रमास ईश्वर सहाय होतो. इच्छा त्याची."

[नंतर] कांहीं दिवस हुशारीनें मुक्काम करून सिंहगडास गेलेवर नवज्वरें जहाला. उपाय कांहीं चालला नाहीं. त्या समयीं अमात्य वगैरे मुत्सद्दी यांस बोलावून सांगितलें कीं, "तुम्ही थोरले महाराजांपासून राज्याचे साधनास श्रम साहस करीत आलां व करीत आहां. एक एक प्रतिसृष्टी करणार आहां. आमचा तो काळ समीप आला. याच्या मागें सर्वत्र मिळोन हल्लीं करितां तसें करावें. आम्हीं गेलों म्हणोन श्रमास अंतर न करितां शिवाजी महाराज सुटोन येत तें करावें. त्यांचे ठायीं लक्ष ठेऊन करणें म्हणजे त्यास यश येईल. हें तुम्हांस ठावेंच आहे. त्यापेक्षां फार काय सांगूं?" म्हणोन रामचंद्रपंताचे स्वाधीन सर्वांस केलें. सर्वांचे स्वाधीन पंतांस केलें. अमात्याचे आज्ञेंत सर्वत्रांनीं चालावें, असा बंदोबस्त करून आपण ईश्वर-भजनीं लक्ष ठेऊन परधामा प्रति जाते जहाले. त्या समयाचें वर्णन काय ल्याहावें? राज्याभिषेक २६ प्रमाथी संवत्सर शके १६२१ फाल्गुन वद्य अष्टमीसह नवमीस काल जहाला. सर्वत्रांस शोक जाला. परंतु प्रसंग प्राप्त झाला तो विठोजी राजे भोंसले यांचे वंशांतील जीवजी राजे भोंसले वावीकर यांणीं विधी केला. रामचंद्रपंत यांणीं दानधर्म बहुत केला. थोरले महाराजांचे शिवपूजेचा बाण, नित्यशः

६२ जंजीर = सांखळदंड.

६३. वराड प्रांत मारून परत येतांना जालना पेठ लुटिली, परंतु झुल्फिकारखां हा समयास येऊन पोंचल्यामुळें राजारामास पळून जावें लागलें. ग्रां० ड०.

६४. तकिया = विश्रांतिस्थान.

६५. झुल्फिकारखां पाठीस लागला असतां राजारामास दौड फार पडली त्यामुळें त्याचें फुफ्फुस सुजून तोंडावाटे रक्त पडूं लागलें होतें. एक महिनाभर तो दुखणाईत होता. ग्रां० ड०.

६६. हें राजारामाचें म्हणणें प्रल्हादनिराजी, रामचंद्रपंत अमात्य, संताजी, धनाजी वगैरे मंडळीस किती अनुरूप होतें हें सांगितलें पाहिजे असें नाहीं.

त्यांतून उदकस्राव होत आहे, तो बाण, राजाराम साहेब त्याची नित्य पूजा करीत होते. त्या बाणाचें अधिष्ठान सिंहगडीं करून ब्राम्हण पूजेस, नैवेद्य, नंदादीप, नगारखाना, भालदार, चोपदार इत्यादि नेमणुकेचा बंदोबस्त करून राजश्रींचा पुण्यतिथीचा समारंभ करावा या खर्चास सरंजाम नेमून दिल्हा. तेथील हवलदार यांणीं पंतानीं पाठ घालून दिल्हेप्रमाणें व्यवहार करीत असावें. ती चाल अद्याप चालत आहे.[६७]

महाराजांचा काळ जहाला ते समयीं तारा आई साहेब व राजसबाई साहेब व उभयतां पुत्र पन्हाळ्यास होते. व अंबिका बाई साहेब विशाळगडीं होतीं. इकडे वर्तमान रामचंद्रपंतीं लिहिलें. पन्हाळ्यास कळोन बहुत शोक जहाला. व विशाळगडीं कळलें त्या समयीं चार सहा घटका दिवस होता. अंबिका बाई साहेबांस समजल्यानंतर वाड्यांतून निघोन सदरेस आलीं. हवालदार इत्यादिकांनीं मुजरा करून श्रमी जहाले. तेव्हां बाई बोलली कीं, "हा मृत्यु लोक आहे. श्रमी कां होतां? आम्ही सहगमन करणार. साहित्य लवकर करावें." यावरून सरनोबत बोलिला कीं, "महाराज असतां वाड्या बाहेर निघतां येत नव्हतें. मनुष्य दृष्टीस पडत नव्हतें. हल्लीं या मिसें लोक पहावेत अशी इच्छा जहाली." म्हणोन बोलिला. हें ऐकून, "माझें सतीचें जाणें ज्याचे दैवीं असेल ते पहातील." अशीं बाईचे मुखांतून अक्षरें निघतांच सरनोबत याचे डोळे अंध जहाले. त्या काळीं सरनोबत घाबरा होऊन [ त्याणें ] पायांवर डोई ठेविली. "महाराज! मी चुकलों! मजवर कृपा करावी." म्हटल्यावरून हंसून बोललीं कीं, "सती जाण्याचें पहावें." म्हणतांच दिसों लागलें. हा चमत्कार सर्वांनीं पाहून विनंती केली कीं, "महाराजांचा काल सिंहगडीं जहाला, आज तिसरा दिवस. तेव्हां सहगमन कशास करावें?" तेव्हां उत्तर केलें, "आपल्यास कळला तोच दिवस मुख्य. तुम्ही कोणीं संशय न धरितां साहित्य लवकर करा. अनमान कराल तरि तुम्हांस महाराजांचे पायाची शपथ." तेव्हां हवलदार यांनीं विनंती केली, "दिवस थोडा राहिला. मलकापुराहून साहित्य येणें, [ त्यास ] रात्र होईल. गलबलीचे दिवस, किल्याचें काम, येविशीं आज्ञा?" "स्वार पाठवून जलदीनें

---

६७. "स्वारी फत्ते करून सिंहगडास आले. तेथें शरीरास समाधान नाहीं ऐसें झालें. महिना पंधरा दिवस दुखणें होऊन × × × समाप्त झाले. ते समयीं ताराबाई साहेब यांणीं आक्रम करून राजा शिव याचे नांवें मुद्रा करून बंदोबस्त चालविला." इतकीच कायती चिटणीस प्रतींत राजाराम याचे मरणाची व पुढील बदोबस्ताची हकीगत आहे. वरील मजकूर इंदूर प्रतींतील होय.

६८. "सदर:सभा" रा० व्य० को०.

आणवावें. मी गेल्यावांचून सूर्य अस्तास जाणार नाहीं." तेव्हां एक मेकांकडे पाहूं लागले. "तुम्हीं खोटें मानूं नका." [असें सांगून] सदरेची सावली पडली होती त्या सावली जवळ किंचित मातीचा ढीग करवून त्यावर पळसाचें पान रोविलें. [आणि] "यास ओलांडून सावली जाणार नाहीं." म्हटल्यावरून हवालदारांनीं विनंती केली कीं, "आज्ञेप्रमाणें स्वार रवाना करितों. अस्तमान जहाल्यास दरवाजे लावीन. साहेबीं रागें भरूं नये." नाहीं, असें उत्तर केलेवर स्वारामागें स्वाराची डांक ठेविली. पळसाचे पानावरून सावली गेली नाहीं. प्रकाश आहे तसा होता. मलकापुराहून साहित्य येऊन महाराजांचें पागोटें बरोबर बाईनीं सहगमन केलें. स्नानविधी सर्वत्र करीत तोंपर्यंत प्रकाश दिसतच होता. सर्वत्र सदरेस आल्यानंतर चार तास रात्र जहाली. अंधकार दिसूं लागला. हेंही पाहून सर्वत्रांस आश्चर्य वाटलें. "सतीचा प्रताप!" असें सर्वत्र म्हणों लागले. सतीचा मजकूर पन्हाळ्यास पंतांकडे लेहून पाठविला. हें ऐकून आश्चर्य मानिलें. पंतांनीं विशाळगडीं दानधर्म बहुत केरविला.

या उपरि राजाराम साहेब यांचें वर्तमान पादशहास [कळलें.] व लष्करांत भक्ताजी हुजरे जाऊन येसूबाई साहेब व शाहू महाराजांस जो शोक जहाला तो काय ल्याहावा? बाह्यात्कारीं शोक करितां नये. शाहू महाराजांस असें वाटलें कीं, थोरले महाराज व संभाजी महाराज आज मेले. राज्यही बुडालें. बेगम यांच्या योगें येथें सुखी आहों. तरी पादशहा आम्हांस मुसलमान करितो अशी गोष्ट एक दोन वेळ जहाली असतां प्रतापजी गुजर यांचे चिरंजीव खंडेराव, राजाराम साहेब यांचा मेहुणा, आमचा मामा, आम्हांबद्दल मुसलमान जहाले. आम्हांसही करणार. परंतु बेगम यांनीं वांचविलें. काका साहेब सोडवून नेतील [अशी] खातरजमा होती. आतां ईश्वरांनीं निराश्रित आम्हांस केलें! असा शोक संतापेंकडून महाराज [यांस] ज्वर प्राप्त जहाला. महिना पंधरा दिवस जहाले. पादशहासही वर्तमान कळलें तेव्हां बोलिले कीं, "दुस्मान दाणा[७१] गेला. हिंदु गनीम कांहीं असतील त्यांजवर फौजा पाठवा. असा हुकूम कीं, हिंदु नाहींसा करों[७२].

---

६९. पन्हाळ्यास व विशाळगडास लिहून पाठविल्याचा मजकूर व विशाळगड येथील अंबिकाबाईच्या सती जाण्याचा उपक्रम व चमत्कार ह्यांचा वृत्तांत चि० प्र० देत नाहीं—वर टीप० ६७ पहा.

७०. ह्यावरून ह्या वेळीं प्रसंगास अनुसरून कांहीं मराठे लोकांस मुसलमान व्हावें लागलें असें दिसतें. वर चिटणविसांविषयींही असाच मजकूर आला आहे. "आपलें पोटचें पोर [याच्या] जातीची विजात केली" पृ० ५८ पहा.

७१ दाणा=शहाणा, उमदा, उत्कृष्ट.

७२ हा शाहूचे शोकाचा व औरंगजेबाचे हुकुमाचा मजकूर चि० प्र० देत नाहीं.

तेव्हां वजीरांनीं पाठविल्या त्या क ड व ळींतें[७३] फौजा आल्या म्हणोन अमात्य यांस सिंहगडीं कळलें. शत्रु समीप लाखों फौजा घेऊन आले. [ एक ] धनमान चारले. एक कैदेंत. असो, धन्याचे पायांच्या प्रतापाचा आश्रय करून अमात्य रायांनीं धनसिंगराव जाधवराव सेनापति, संताजी[७४] घोरपडे ममलुकत मदार रवाना केले. परशराम त्रिंबक समशेरजंग बहादर शहाजंग व नारो शंकर मदारुलमाहाम या उभयतांपाशीं पंचवीस हजार फौजेनिशीं पुणें मुक्कामीं ठेविलें. आपण सिंहगडचे माचीचे मैदानांत दहा हजार फौजेनिशीं राहिले. सेनापती [ यांणीं ] भीमा उतरून, शास्तेखानाशीं लढाई दिली. ती अति दुंबळ जहाली. महाराज असतां लढाया झाल्या त्यापेक्षां अति वीरश्रीनें लढाई केली. शास्तेखान याचा नाश होऊन, औरंगाबादेस परत गेला. पादशाहास वाटलें कीं, "हिंदूंची पराकाष्ठा[७५] आहे."

हेही माघारें पुण्यास येऊन सिंहगडीं आले. पंत कोशभर आडवे जाऊन समारंभें घेऊन आले. वस्त्रें भूषणें देऊन नवाजीस लोकांस केलें. "शिवाजी महाराज व संभाजी महाराज लहान तुम्हांपाशीं आहेत. थोरले महाराज यांनीं राज्य मिळविलें तें तुम्हां सर्व हिंदूंचें राज्य आहे. रक्षण करावें हा धर्म तुमचा. धणी हातास येई असें करावें." याप्रमाणें पंत बोलिले तें ऐकोन सर्वत्रांनीं उत्तर केलें कीं, "महाराज होते तेव्हां पेक्षां जीवाची आशा न धरितां चाकरी करूं. आपण आमचे महाराजच असें मानितों. काळजी करूं नये." पंत बोलिले कीं, "सर्व लज्या तुमची[७६] आहे." परसोजी भोसले सेनासाहेब सुभा, खंडेराव दाभाडे सेनाधुरंधर. सिदोजीराव निंबाळकर सर लष्कर, आटोळे, पांढरे वगैरे सरदार यांस अमात्य यांनीं सर्वत्रांस महाराजांचा मजकूर कळविला. राज्यरक्षण करण्याचा [मजकूर] लिहिला. त्यावरून सर्वांचीं उत्तरें आलीं कीं, "महाराजांचे ठिकाणीं आपण आहां. खासास्वारी असतांना कामकाज उदयीक करूं म्हणत होतों, सांप्रत उद्यांचें आज करून आपणांस विनंती लिहीत जाऊं. आपल्या हुकुमासरसी तृणवत् प्राण मानून उडी घेऊं. कांहीं काळजी करूं नये." याप्रमाणें सर्वांचीं लिहिणीं आलीं. पंत संतोष मानून [ म्हणाले ] "शिवाजीचें दैव उदित आहे." किल्ले, कोट यांचे बंदोबस्ताचा मजकूर लेहून उत्तरें आणविलीं.

---

७३. एकदां कापल्यानंतर पुन्हा फुटलेलीं जोंधळ्याचीं शेतें, जमीन ( ? ).

७४. संताजी तर या पूर्वींच मारला गेला होता.

७५. ह्या लढाईचा उल्लेख चि० प्रतींत नाहीं.

७६. हें व वरील अशीं दोन्हीं ही पंताचीं भाषणें मोठे शहाणपणाचीं व पोक्त बुद्धीचीं खरीं.

नंतर लष्करांत शाहू महाराजांस ज्वर आला हें वर्तमान बेगम यांणीं ऐकून बहुत घाबरीं होऊन आपण नेहमी जवळ राहून उपाय करितीं जालीं. पादशहास वर्तमान कळल्यानंतर खांसास्वारी समाचारास आली. जवळ बसोन आंगावरून हात फिरविला. यांणीं पायांवर डोई ठेविली. तेव्हां बोलिले कीं, "तुमारा चिंच्या[77] मर गया उसवास्ते तुमारी तबियत बिगडगई, आजार हुवा." असें बोलिले—तेव्हां महाराज हात जोडून बोलिले कीं, "आमचा बाप व चिच्या आँब्[78] खुदावंत! दुसरें कोणी ठावूक नाहीं. जर आमचे काका असते तर आमचा कबिला रायगडीं ठेवून कां जाते?" हे शब्द ऐकोन, बहुत खुष होऊन पुन्हा आंगावरून हात फिरवून दाढी धरून बोलिले कीं, "तुम चिंता मत करो. दखनमे सब चोर, तुम साहू. तुमारा राज्य तुमकू देऊं गा. तुम हमारे बेटीके बेटे हो. कुच् फिकीर मत करो." असें समाधान करून "राजारामही बहुत अच्छा था." असें बोलून बेगमेस सांगितलें कीं, "आपने बेटे कू जलदी अच्छा करना." असें सांगून स्वारी गेली. भक्ताजी हुजरे याणें पाहिलें. भक्ताजीस [महाराजांनीं] निरोप सांगितला. "उभयतां आई साहेबांच्या पायांवर डोई ठेविली. आणि उभयतां बंधूंस आशिर्वाद सांगावा. काकांचे ठिकाणीं तुम्ही[79] आहां. सर्व कार्य कर्ते मोठमोठे त्यांस तुम्हीं काकासाहेबच आहां. काका साहेबांचे मागें आपण लढाई केली, हें वर्तमान कळून बहुत संतोष जाला. काकासाहेबांचे व थोरले महाराजांचे पुण्यें यश आलेंसें खचीत वाटलें. आम्हांस नेहर्णेचा उद्योग करीतच आहां. श्री इच्छेनें घडेल तो सुदिन. तत्रापि काकासाहेब यांणीं राज्य रक्षण केलें तें आपण रक्षावें. श्री कृपें सुदिवस प्राप्त होईल." असा निरोप भक्ताजी व गायकवाड यांजबरोबर सांगून पाठविला. हा निरोप पोंचल्यानंतर रामचंद्र पंतास बहुत संतोष वाटला. नेत्रांस उदक आलें. "शिवाजी महाराज बहुत योग्य आहेत," अशी कचेरींत तारीफ केली. सेनापति वगैरे यांणींही तारीफ केली. ऋणानुबंध [असेल तसें घडेल] असें बोलिले.[80]

पुढें आठ पंधरा दिवशीं पुणें येथें सिंहगडचे आश्रयानें पंचवीस हजार फौज ठेऊन आपण प्रतापगडीं येऊन, श्रीचें दर्शन करून, बंदोबस्त पाहून, तेथून

---

७७. चिच्या=चुलता, काका.

७८. 'आबा' असेंही होईल. आबा=बाप.

७९. 'तुम्ही' म्हणजे रामचंद्रपंत अमात्य असें पुढील संदर्भावरून ध्यानांत येईल.

८०. भक्ताजीचें येणें, शाहूचा शोक व आजार, बेगमेची काळजी, बादशहाची भेट व आश्वासन, शाहूचा परत निरोप, रामचंद्र पंतांनीं केलेली शाहूची वाखाणणी वगैरे वृत्त चि० प्रतींत नाहीं.

सातारे यास येऊन, तेथील बंदोबस्त करून, परळीस येऊन, श्री स्वामींचे समाधीचें दर्शन घेऊन, त्रिरात्र राहून, वसंतगडावरून पन्हाळ्यास आले. तारा आई साहेब व राजसबाई साहेब यांसि भेटोन उभयतांचें दर्शन घेऊन महाराजांसाठीं बहुत श्रमी जहाले. त्या काळीं पंतांनीं बहुत रीतीनें समाधानाच्या गोष्टी सांगोन समाधान केलें. कांहीं दिवसांनीं ताराबाई साहेब यांणीं पंतांस बोलावून सांगितलें कीं, "शिवाजी महाराजांची मुंज करावी, आणि राज्याभिषेक करावा. तेव्हां पंतांनीं विनंती केली कीं, "एव्हांच मुंजीची गडबड कां? थोरले शिवाजी महाराज लष्करांत आहेत. त्यांची मुंज अद्यापि जहाली नाहीं. त्यांचें वीस वर्षांचें वय जहालें. तेही लवकरच येतील असें जोशीराव[८१] वगैरे यांचे सांगण्यांत आहे. त्यांचाही निरोप भक्ताजी हुजरे व बंकी गायकवाड यांजबरोबर आपल्यास आलाच आहे. ते आलियानंतर त्यांची व यांची मुंज एकदांच बहुत समारंभें करून करूं. ते तक्तारूढ होतील. हे उभयतां युवराज्यपद करतील." असें पंत बोलिल्यावर "ते धनी, हे चोर आहेत असा अर्थ नाहीं. यांची मुंज अगत्यमेव मला कर्तव्य" म्हणोन आई साहेब बोलिलीं. त्याजवरून पंत बोलिले कीं, "मी अशा भावनेनें बोलिलों नाहीं. राजाराम साहेब हे राज्याभिषेक करून न घेतां मंचकारूढ जहाले. तक्तारूढाचे अधिकारी ते, असें वास्तविक लक्षांत वागवून त्यांचे ठायीं अंतःकरण लक्ष तसें होतें—मरणांतसमयीं बोलिले तें सर्वांस माहीत आहे. त्यावरून मी बोलिलों. तुमच्या मनांत द्वैत उत्पन्न होऊन कर्तव्य असल्यास अगत्यमेव करावें." असें बोलून उठून गेले. त्या काळीं परशराम त्र्यंबक व नारो शंकर हे उभे राहोन हात जोडून पंतांस विनंती केली कीं, "आपण या गोष्टीस आग्रह कां करितां? धन्यांची मर्जी त्यास आपण रुकार द्यावा." म्हटल्यावरून, "धनी म्हणतील तसा रुकार द्यावयाचा मी नव्हे. तुमच्या सर्वत्रांचे मर्जीस आल्यास लक्ष प्रकारें करावें, मी कांहीं नको म्हणत नाहीं." असें बोलोन निघोन घरास गेले. आई साहेब यांणीं सांगितलें कीं, "पंतांचे घरीं जाऊन पंतांचा राग शांत करून रुकार घेउन उद्योग करावा." म्हणोन परशराम पंत व नारोपंत यांस आज्ञा केली. त्यावरून जाऊन उभयतांनीं मर्जी पाहून विनंती केली कीं, "आपण बरायखुद[८२] धणीपणा करीत आलां, तसाच महाराज धणी चालवीत गेले. परंतु आई साहेबांची मर्जी एक तऱ्हेची. आपण रुकार दिलाच पाहिजे." हें ऐकोन बोलिले कीं, "कल्याणप्रद असेल तें करावें." त्यावरून उभयतांनीं जाऊन आई साहेबांस विनंती केली. नंतर मुंजीचा निश्चय करून

८१. जोशीराव हे संगमेश्वर येथील. | ८२. बरायखुद=स्वतः, जातीनें.

समारंभ जहालियावर पन्हाळे मुक्कामीं सिंहासनारूढ जाले. • राज्याभिषेक २८ शके शालिवाहन १६२३ वृषा संवत्सर सु॥ इसने मया [ व ] अह्हक [ सालीं ] शिवाजी महाराजांस राज्याभिषेक जहाला. तेव्हां तिमाजी रघुनाथ हणमंते यांजकडील प्रतिनिधीपद दूर करून परशराम त्रिंबक यांस पदाधिकार सांगितला. संकाजी मल्हार याजकडील सचिव पद दूर[८३] करून नारो शंकर गांडेकर यास दिल्हें. अष्टप्रधान [ व ] प्रतिनिधीपद चंदीचे मुक्कामीं होतें त्यांपैकीं दोंपदाची मात्र घालमेल जहाली. बाकी कायम होते. शिवाजी महाराज यांस सोइरीक बुंरकर घाटगे यांची कन्या केली. तिचें नांव भवानीबाई ठेविलें. रामचंद्रपंत अमात्य कुलकुल्ला[८४] कारभारी [ यांचें ] हुकूम करणें, पहिल्यासारखे झटून करणें, जितकेस तितकें. परंतु परशराम त्रिंबक यांजवर आईसाहेब यांची कृपा बहुत होती. नारो शंकर इत्यादिक सहवर्तमान राज्य चालिविलें.[८५]

शाहू महाराज देशीं येई तोंपर्यंत सात वर्षे [ कारभार ] चालवीत असतां शाहू महाराज म्हणोन तोतया देशांत उत्पन्न झाला. हें कळोन लोक पाठविले. पादशहाचे सैन्यांत असतां हा तोतया, याची चौकशी करून धरून आणिला. नव्हेसा ठरला तेव्हां मारून टाकिला. पुढें शिवाजीचें नांवें राज्य आईसाहेब चालवूं लागलीं. दाब उडत चालला. जिकडे तिकडे सरदार यांणीं राज्य आटपिलें. हुकूम कांहीं मानीत कांहीं न मानीत. मोगलाईचें तेज यांजवर पडलें. पुणें प्रांत भागानगर इत्यादि ठिकाणें पादशहानीं घेतलीं. राजसबाई साहेब व तारा आईसाहेब यामध्यें कलहास आरंभ जहाला.

[ इकडे ] पादशहास शरीरव्यथा बहुत होऊन हैराण जाहले. काळ समिप आला, त्या संधींत बेगम यांणीं महमद शाहाजादे व आसतखान वजीर यांस आपल्या पुत्राची वाट काय म्हणोन विचारलें. उभयतांनीं सांगितलें कीं, "पादशहासि विनंती करावयाची आमची योग्यता नाहीं. तुम्हीं विनंती करावी. तुमच्या विनंती मागें आम्ही अनुमोदन देऊं." त्यावरून बेगम यांणीं पादशहापाशीं समाचारास जाऊन बहुत श्रमी होऊं लागली. त्या काळीं पादशहा यांणीं विचारलें कीं, "श्रमी व्हावयाचें कारण काय?" तेव्हां बेगम यांणीं विनंती केली कीं, "दो गोष्टीविशीं. आपल्यासारिखा पिता यास मृत्युसमय आणि माझा पुत्र बंदीस. म्हणोन

---

८३. शंकाजी मल्हार चंदीहूनच काशीक्षेत्रास गेला होता. ग्रां॰ ड॰.

८४ कुलकुल्ला=सर्व अधिकार पूर्णपणें आहे ज्यास असा.

८५. रामचंद्रपंताची व ताराबाईची भेट, त्यांचें संभाषण, शिवाजीस राज्याभिषेक वगैरे मजकूर चि॰ प्रतींत नाहीं. "रामचंद्रपंत, शंकाजी नारायण वगैरे सरदार लोक कोणी एक हिंमत न सोडितां ज्या अन्वयें राज्य चालत आलें तसेंच चालविलें." इतकेंच चि॰ प्रतींत लिहिलें आहे.

श्रमी." हें ऐकून पादशहा बिछान्यावर बसोन, जवळ होते त्यांस बाहीर काढून, बेगम यांजपाशीं बोलले कीं, आम्हांसाठीं तुम्हीं कष्टी न व्हावें. शतवर्षें वाचलें असतांही मृत्यु आहेच. पुत्रासाठीं श्रमी होतां तरि हा पुत्र तुझा पुनः शिवाजी उत्पन्न जहाला आहे. शिवाजी व आम्ही बद्रिकाश्रमीं राज्य-इच्छा धरून तप केलें. आमची तपश्चर्या अति उग्र, तामसी, त्या योगें म्लेंच्छ झालों. ह्या धर्माची स्थापना करावी हा नेम आमचा. शिवाजीची सात्विक तपश्चर्या म्हणोन हिंदु धर्मांत जन्म होऊन हिंदूंची स्थापना करावी हा नेम त्याचा. आयुर्दाय कमी होऊन तोच शिवाजी हा तुझा पुत्र जन्मला. याचा झेंडा दिल्लीस लागेल. माझे पुत्र याचे आश्रयानें चालतील. असा तुझा पुत्र आहे. श्रमी व्हावयाचें कारण नाहीं. आज पंचवीस वर्षें हिंदु मोडीत असतां मोडत नाहींत. याचें कारण हें." यावरून बेगम यांणीं विनंती केली कीं, "या गुह्य गोष्टी तुमचे तुम्हींच जाणें. मनुष्य लोकांत व्यवहार रीतीनें आपण सार्वभौम दिल्लीपति. तुमचे राज्यांत मराठे गनीम म्हणवितात. सांप्रत कैदेंत आहेत. आपल्या मागें यांणीं सार्वभौमत्व जरी केलें तरी पादशाईंत गनीम म्हणवितील याची वाट काय?" त्यावरून पादशहा बोलिले कीं, "दक्षिणेस साडेसहा सुभे यांत यांचा घोडा गनीम न म्हणतां फिरावा, असें करून देतों. माझे तिघे पुत्र तूं कन्या चौथी. चवथाई तुझे हिशाची तुझ्या पुत्रास दिली." "माझे पुत्रास वतन नाहीं" म्हटल्यावरून साडेसाहा सुभ्यांमध्यें सरदेशमुखी वतनें दर शेंकडा रुपये १२॥ साडेबारा प्रमाणें सनदा करून त्या सनदेचे माथां आपले पंजे आलत्याचे उठवून शाहू महाराजांस बोलावून आणून मुदबकांतून सगळी भाकर आणविली. तों पादशहाजादी इणें आडवी होऊन सगळी भाकर दिली असतां माझ्या मुलांची वाट कोंठें? ह्मणोन अर्धी ठेऊन अर्धी दिल्ही ती व सनदा शाहू महाराज यांच्या ओट्यांत घालून मस्तकीं हस्त ठेवून बहुत दिवस राज्य करशील असा आशिर्वाद दिल्हा. बेगम यांस सांगितलें कीं, "यास मुक्त केलेस आमच्या नेमास अंतर पडेल. आमच्या मागें सोडा." असें सांगितलें.

[ पुढें ] बादशहाचा काळ शके १६२८ व्ययनाम संवत्सरी माघवद्य अमावास्येस

८६. मुदबखू = मुदबख्खाना= महानस, स्वयंपाघर.

८७. पादशहाजादी=पादशहाची कन्या परंतु येथें पादशहाची स्त्री असा अर्थ घेतला पाहिजे.

८८. सुदामजीनें अठरा चिंध्या लावून बांधून आणलेल्या पोह्यांच्या कण्या कृष्ण मक्षूं लागला तेव्हां रुक्मिणीनें पुढें होऊन तिसरी मूठ खाऊं दिली नाहीं–तसाच प्रकार येथेंही घडून आला असें म्हटल्यास हरकत नाहीं.

८९. ही बेगमेची व पादशहाची भेट व पुढील राज्य विभागाचा चमत्कारिक प्रकार हीं इंदूर प्रतींतच वर्णिलीं आहेत.

होऊन निवर्तले. कोठें लिहिलें आहे सत्ताविसांत काल जहाला. रोजेसे[१०] नेऊन कबर केली. ती मोकळी, गुमट नाहीं. बेगम यांणीं त्या कबरेवर जाईचे आळें आपले हातें लाविलें आहे. त्याची छाया त्यावर [ पडते. ] त्या वेलीस बारा मास फुलें येतात. दररोज वर पडतात. ती वेल अद्यापि[११] आहे. पादशा जादेनीं वजीर आदिकरून फौजेचा वगैरे बंदोबस्त केला. अजमशो[१२] वडील बंधु दिल्लीस होते त्यांणीं तिकडील अमीर एक करून पादशाई बंदोबस्त केला. इकडे महमद बाहदरशानीं वजीर असतखां, जुल्फकारखां व फौज मनसबदार अमीर यांचा एक विचार करून आपण आक्रम करावा, दिल्लीस जावें, असे मनसब्यानें छावणी नगरावर करून निघाले ते औरंगाबादेस कांहीं दिवस राहून दिल्लीस गेले.

इकडे राजसबाई साहेब [ यांणीं ] शिवाजी महाराज व महाराजांची मातोश्री ताराबाई साहेब यांस नजरबंद केलें. शिवाजी महाराज कांहीं अव्यवस्थितपणा करीत ह्मणोन संभाजी राजे यांणीं आपले नांवें शिक्का करून राज्य करिते जाले. शिवाजी महाराजांस दोघी कन्या. वडील दुर्याबाई, निंबाळकर यांच्या घरीं दिल्ही. धाकटी कृष्णाबाई, जाधव यांचे घरीं दिल्ही. तिसरी[१३] अहल्याबाई इजला शाहूमहाराज देशीं आल्या नंतर शिंदे यांच्या घरीं देणेचा निश्चय करून आपण लग्न करून दिल्हे. कि व ल वगैरे सरंजाम देऊन स्थापना केली. भवानीबाई गरोदर असतां शिवाजी महाराज यांस काळ्या फोड्या येऊन त्यांचा काल शके १६२८ व्यये[१४] संवत्सरीं चैत्र शुद्ध द्वितीयास जाला. नंतर भवानीबाई प्रसूत जाली. पुत्र जाला तो जिजाबाईच्या भयें करून ताराबाई साहेब यांणीं भगवंत रामचंद्र[१५] अमात्य यांजपाशीं इतर गुप्त स्थळीं ठेऊन पुढें शाहूमहाराज यांस दत्तक दिल्हा. त्याचें नांव राजाराम ठेविलें.

इकडे शाहूमहाराज यांस महंमद[१६] बहादर शाहाजादे यांणीं दिल्लीस जातांना

---

१०. रोजा हें गांव दौलताबादेजवळच आहे. औरंगजेबाचा काळ अहमदनगरासच झाला.

११ हल्लीं ही कबर अगदीं उघडी आहे असें सांगतात.

१२ ही चूक आहे. महंमद बहादरशहा पंजाबांत होता तो तक्तावर बसला. दक्षिणेंत अझमशहा यानें आपणास पादशहा म्हणविलें. पुढें दिल्लीवर चाल करून जात असतां तो माळव्यांत एका लढाईंत मारला गेला यानेंच नर्मदेपार गेल्यावर शाहूची सुटका केली.

१३. वर तर 'दोघी' असें म्हटलें आहे.

१४ '१६२२ शार्वरी' असें इंदूर प्रतींत आहे तें बरोबर नाहीं.

१५. "रामचंद्रपंत अमात्य यांचे स्वाधीन करून ठेविलें. त्यांनीं गुप्तरूपेंच ठेविलें." चि० प्र०.

१६. 'अझमशहा' असें पाहिजे. वर टी० १२ पहा.

नर्मदेवरून पळून गेले अशा तऱ्हेनें बहाणा करून सनदा देऊन मातुश्रीस वोलीस ठेऊन, उभयतां स्त्रिया घेऊन, देशीं आले. शके १६२९ सर्वजित् नाम संवत्सरीं महाराज यावयाचे पूर्वी इकडे संभाजी महाराज यांणीं रामचंद्रपंत अमात्य व परशरामपंत प्रतिनिधि, नारो शंकर सचिव यांस हातीं घेऊन यांच्या अनुमतें राज्य आक्रमण करून चालवीत होते. नंतर शाहूमहाराज देशीं आले. तें चरित्र आलाहिदा व संभाजी महाराज याणें राज्य केलें तेंही आलाहिदा आहे. हें चरित्र श्रीमन्महाराज राजाराम छत्रपती साहेब यांचें समाप्त जहालें. शके १६५६[१७] आनंदनाम संवत्सर माघवद्य १३ त्रयोदशी. सांप्रतच्या प्रती वरून लिहिली असे. समाप्त.

## उपसंहार.

१. संभाजी महाराज व राजाराम महाराज यांचीं चरित्रें ३२ पृष्ठें पर्यंत छापून निघाल्यावर आम्हांस इंदुर येथील श्री० किबे यांजकडील एक व कोल्हापुराहून एक अशा त्याच चरित्रांच्या दोन प्रती मिळाल्या. सातारा प्रत व चिटणीस प्रत यांवरून जो ह्या ३२ पृष्ठांत मजकूर छापून प्रसिद्ध झाला त्यापेक्षां ह्या दोन प्रतींत मजकूर विशेष असून कांहीं ठिकाणीं पाठांतही फरक बराच आहे. तेव्हां तो मजकूर व ते फरक येथें दाखल करितों.

पृष्ठ २ ओळ १० 'अनर्थ घडून' बद्दल 'अनर्थ पडून.' पृ० २ ओ० २४ 'पात्र' बद्दल 'प्राप्त.' पृ० ३ ओ० ५ 'बंकी व' यापुढें 'कृष्णाजी नाईक बंकी व' पृ० ३ ओ० ७ 'होते' यापुढें 'व पाराजी पंत पेडगांवकर.' पृ० ४ ओ० ९ 'घेऊन' बद्दल 'येऊन.' पृ० ४ ओ० १३ 'नाईकवाडी' पुढें 'व.' पृ० ६ ओ० १ 'राजाचे' याबद्दल 'थोरले महाराज यांचे.' पृ० ७ ओ० २ 'करणें' बद्दल 'कारणें.' पृ० ९ ओ० १२ 'करवीत होते,' यापुढें 'सईबाई साहेब यांचे स्वाधीन करून शिक्के करवीत होते, पृ० १२ ओ० ७ 'संक्राजीपंत' यापुढें 'राजाज्ञा.' पृ० १३ ओ० २४ 'घोडीवर' बद्दल 'घोडियावर.' पृ० १५ ओ० १२ 'विचार कळलाच आहे' ह्याजबद्दल 'विचार काय राहिला.' पृ० १५ ओ० १२ 'तजकरे घ्यावे' यापुढें 'ते जे करतील तें मान्य.' पृ० २३ ओ० २८ 'पारे दर शांति' याबद्दल 'पुरंदर शांति.'

पृ० २५ ओळ १० चहूंकडे लागलीं याजपुढें "कांहीं मेलीं कांहीं मारलीं गेलीं." पृ० २५ ओळ १४ 'पांच सहा वर्षांचे' ह्याजबद्दल 'आठ वर्षांचे.' पृष्ठ २६ ओळ ६ 'सईबाई' बद्दल 'येसूबाई.' पृष्ठ २६ ओळ

१७. हें वर्ष इंदूर प्रतींत दिलें आहे चिटणीस प्रतींत नाहीं.

१३ 'गिल्ला' बद्दल 'गळा.' पृष्ठ २६ ओळ १७ 'दम खाऊन' बद्दल 'पल्ला खाऊन', 'पल्ला करून.' पृष्ठ २६ ओळ १८ "तरी" याजपुढे 'तरी करावें परंतु.' पृष्ठ २७ ओळ ५ "मुख्यलें" याजपुढें "उद्धव योगदेव राजाज्ञा नि।। पिंगळे व जोत्याजी राव केशरकर." "उद्धव धोंडदेव."

पृष्ठ २७ ओळ ९ 'विषण्णता' बद्दल 'विषमता.'

पृष्ठ २७ ओळ १२ 'येविषयीं' याजपुढें "पूर्वीं थोरले महाराज बोलले आहेत जे मी येसूबाईचे पोटीं येणार. शके १५९५त कर्नाटक प्रांतीं स्वारी गेली होती त्या समयीं महाराजांचे आंगांत श्री देवी येऊन बोलली जे 'पुढें शिवाजी होईल तो राज्य बहुत दिवस करील. हिंदुस्थानही साधील' असें बोलले मला ठाऊक. तसे तुम्हांस सर्वांसही माहीत. यास्तव सर्वांनीं मनांतील किल्मिष टाकून मजसुद्धां खातरी झाली पाहिजे. म्हणोन राजाराम साहेब बोलून." पृष्ठ २७ ओळ १५ 'दोन लग्नें' बद्दल 'तीन लग्नें'

पृष्ठ २७ ओळ १६ 'ऐशी केली होती' यापुढें "कोणी शिर्के यांची म्हणतात व अंबिका बाई साहेब खानविलकर यांची कन्या. त्या तिघी."

पृष्ठ २७ ओळ १८ 'चिटणवीस' यापुढें 'व बावाजी निळो पारसनीस'

पृष्ठ २७ ओळ २० 'रायगडीं ठेविलें' यापुढें "आपण निघतांना येसूबाई साहेब यांचे चरणीं मस्तक ठेवून श्रमी जहाले. तेव्हां बाई साहेब यांणीं मस्तकीं हात ठेवून 'यशस्वी व्हावें, गेलें राज्य मिळवावें, श्रमी होऊं नये.' म्हणोन सांगितलें. नेत्र पुसून शिवाजीस पोटाशीं धरून पुन्हा भेट होईल तो सुदीन म्हणोन [ राजाराम ] निरोप घेऊन"

पृष्ठ २८ ओळ २ 'प्रार्थना करून' यापुढें, "विनंती केली कीं, 'थोरले महाराज यांचे मस्तकीं वरदहस्त आपला [ होता ] आपले वरें व श्री देवीचे वरें करून [ त्यांस ] राज्य प्राप्त जालें. ज्या देशीं महाराजांचें राज्य नाहीं त्या देशीं स्वामींनीं गांव मागावा. महाराजांनीं सनदा करून द्याव्या. तेथपर्यंत महाराजांचें राज्य व्हावें अशी स्वामींनीं लीला केली. महाराज समाप्त होण्याचे संधीस राज्याचेंही भविष्य सांगोन ठेविलें. उद्धव गोसावी यांचें व आपलेंही भाषण[९९] जहालें. इत्यादि लीला ऐकोन जाणत आहे व कांहीं दृष्टीनेंही मीं पाहिलेलें आहे. आपण समाप्त जालां ते समयीं "माझी काया गेली खरी ।। मी आहे जगदांतरीं ।। १ ।।' हेंही आपलें वाक्य सत्य आहे. तरि महान् शत्रूशीं

---

९८ हें श्रीशैलमल्लिकार्जुन येथें घडलें असावें.

९९. हे भाषण कोठें सांपडेल ?

१००. 'माझी काया गेली खरें । मी आहें जगदाकारें । ऐका स्वहित उत्तरें । सांगेन तीं' ।। इत्यादि.

गांठ पडली आहे. यांत मुलाचें व माझें व राज्याचें संरक्षण करणें स्वामींकडे आहे. लज्या आपली आहे.' असे उभे राहून हात जोडून आनंदाश्रुयुक्त प्रार्थना केली. त्या समयीं पादुकेवरून पुष्पांचा प्रसाद आला तो आकांनीं[1] घेऊन श्रीफल व पुष्प दोन्ही प्रसाद ओट्यांत घातला. तो प्रसाद घेऊन, भोजन करून, आकाची आज्ञा घेऊन रामचंद्रपंत अमात्य [ वगैरे ] मंडळी सहवर्तमान"

पृष्ठ २८ ओळ ९ 'पोंहोचले' यापुढें "तेथें राहोन सर्व सरदार मंडळी मिळोन फौजा जमा केल्या. तीस चाळीस हजार फौज जमली. जुल्फिकारखान यांस पादशहा यांनीं रायगडास पाठविलें. त्यांनीं येऊन मोर्चे दिले. हें वर्तमान पन्हाळ्यास समजल्यानंतर रायगडास वेढा पडला. आपण पांयबंद[2] लावावा. म्हणजे ओढ पडेल. रायगडचा वेढा उठेल. म्हणोन आपली फौज तयार करवून बाळ जोशी संगमेश्वरकर यांजकडून मुहूर्त आणवून अमात्य यांनीं धनसिंगराव जाधवराव मुख्य सरदार, पोटीं सरदार पथके होते त्यांचे स्वाधीन केले. त्यांत संताजी घोरपडे यांचे पथकही स्वाधिन. केलें. फौजेसुद्धां धनसिंगराव जाधवराव यांणीं मसलत करून श्रीमहादेवाकडे[3] गेले. कारण पादशहाच्या फौजेची ओढ आपल्याकडे पडावी. मैदान मुलकांत लढाई द्यावी. मराठी फौज आहे असें पादशहास कळावें. याजउपरि पादशहास मराठी फौज आली हें वर्तमान तुळापुरचे मुक्कामीं समजल्यानंतर रणमस्तखान व शास्ताखान फौजसुद्धां रवाना केले. त्या समयीं जाधवराव यांस संताजी घोरपडे बोलिले कीं, "पादशहा याची फौज एक दोन मुक्कामावर आली आहे. फलटणचे आश्रयास आपण लढाई द्यावी. पाठीवर डोंगर असावा. माझ्या बरोबर दोन हजार स्वार सडे एकांडे निवडक द्यावे. शिवाय माझे पथकानिशीं तुळापुरचे मुक्कामीं जाऊन बरायखुद पादशहा याजवर मी छापा घालितों. मराठे आहेत असें खाशास कळवून येतों." याप्रकारें बोलिले असतां जाधवराव "फार चांगले ! शाबास !" असें बोलून घोरपडे यांचे खासपतकाशिवाय दोन हजार निवड एकांडे व विठोजी चव्हाण असे बरोबर दिले. तितक्यानिशीं संताजी घोरपडे निघोन डोंगराच्या आश्रयानें जेजुरीस येऊन श्रीचें दर्शन करून, दिव्याच्या घाटाखालीं जाऊन, झाडींत मुक्काम केला. तेथून मध्यरात्रीचे अमलांत तुळापूरचे मुक्कामीं जावयास मार्गानें जातांना ऐलीकडे

---

१. आका ही रामदास स्वामींच्या शिष्य मंडळींत ज्या बाया होत्या त्या पैकीं एक.

२. पायाबंद लावणें=अटकाव करावा, बाहेरून हल्ला करून वेढ्याचे कामास व्यत्यय आणावा.

३. श्रीमहादेव म्हणजे शंभुमहादेव असावा.

तीन कोशांवर छबिन्याचे स्वारांची गांठ पडली. त्यास सांगितलें कीं, "पादशहाचे लष्करांतील हिंदु सरदार शिर्के व मोहिते वगैरे आहेत त्यांजकडील आम्ही छबिन्यास गेलों होतों. मुबादल्यास आले म्हणून लष्करांत माघारे जातों." अशी पक्की खूण सांगितल्यावरून त्यांणींही मार्ग दिला. यांणीं लष्करांत शिरून छापा घातला. त्या काळीं लाखों फौज असतां दोन तीन हजार स्वारांनिशीं छापा घालून बहुत तसनस करून पादशहाचे डेऱ्याचे तनावे तिघे बंधु घोरपडे व चव्हाण यांणीं तोडून डेऱ्याचे सोन्याचे कळस दोन्ही घेतले. यांजकडीलही स्वार थोडे बहुत पडले. पादशहाचे फौजेचा दुभाग करून गटानिशीं निघोन सिंहगडचे झाडींत आले. सिंहगडावर प्रतापराव गुजर यांचा लेक सिदोजी गुजर [ हे ] किल्लेवर होते. त्यांस वर्तमान कळलियानंतर खालीं येऊन यांशीं भेटले. यांची बरदास्त केली. जखमी होते ते त्यांच्या स्वाधिन केले. ते किल्यावर नेहले. दोन मुक्काम त्या झाडींत करून तेथोन निघोन भोरावर येऊन, पुन्हा घांटा खालें उतरून, रायगडचें संधान राखून जुल्फकार यांचे फौजेवर छापा घालून, त्यांची तसनस करून, त्यांतील पांच हत्ती घेऊन पारघाट चढून, वाई सातारेवरून पन्हाळेस येऊन, महाराजांचें दर्शन घेऊन, पादशहाचे डेऱ्याचे कळस आणलेले पुढें ठेविले. पांच हत्ती पुढें केले. त्या समयीं महाराजांची मर्जी बहुत खूष होऊन, वस्त्रें भूषणें देऊन, तिघे बंधु व चव्हाण यांस किताबती दिल्या. प्रथम लढाई शिवाजी महाराजांचे नांवावर केली, यश आलें, आणि पादशहाचे डेऱ्याचे कळस हस्तगत झाले, पांच हत्ती मिळाले, हा संतोष मानून संताजी घोरपडे यांस ममलकतमदार ही किताबत व दुसरे बंधु बहिरजी घोरपडे यांस हिंदुराव म्हणून व तिसरे बंधु मालोजी घोरपडे यांस अमीरुलउमराव व विठोजी चव्हाण यास हिंमतबहादर अशा किताबती देऊन शितोळे यांस घोरपड्याचे पथकाची सरनोबती सांगितली. याप्रमाणें संताजी घोरपडे यांचा पराक्रम पंत अमात्य यांणीं पाहून महाराजांस सक्त विनंती केली कीं, "संताजीचा पराक्रम अति पराकाष्टेचा. किताबत दिली ही यास योग्य नव्हे. आपले फौजेंत सेनापति नाहीं. पूर्वी हंसाजी हंबीरराव मोहिते बीडकर [ होते ] हे वारले. सांप्रत त्यांचें कोणी नाहीं सबब घोरपडे यांस सेनापतीचीं वस्त्रें द्यावीं मर्दुमी बहुत केली. पादशहाचे डेऱ्याचे कळसच आणून जुल्फकारखान यांचे पांच हत्ती आणिले. त्यापेक्षां याची मर्दुमी कोठवर वर्णावी? यास्तव स्वामींनीं कृपा करून पदाधिकार द्यावा." असें ऐकोन महाराज बोलले कीं, "आमचे मनांत धनासिंगराव जाधवराव यांस हे पद द्यावें असें होतें, परंतु

तुमची मर्जी यांस देण्याची तरि देतों." असें सांगोन सेनापति पदाचीं वस्त्रें संताजी घोरपडे यांस शके १६१० विभवनाम संवत्सरे श्रावण शुद्ध ५ स दिलीं. तिकडे धनसिंगराव जाधवराव यांणीं फलटणचे मैदानांत पादशहाचे फौजेशीं आरेतुरेच्या लढाया पांच वेळां उभे राहून दिल्या. शास्तेखान व रणमस्तखान यांच्या पांच तोफा पाडाव केल्या. [ते] नामोहरम जाले. धनसिंगराव यांचा मुक्काम फलटणावर असतां शास्तेखान यांकडे कांहीं मराठे सरदार होते, त्यांस सांगोन धनसिंगराव यांचे फौजेवर छापा घालविला. तो सांभाळून त्यांचीच तसनस करून जाधवराव तोफा घेऊन आपल्या सलतनतेसुद्धां पन्हाळ्यास येऊन पोंचले. श्रावणमासाचा महिना, पाउसाळा बहुत. किल्लेखालीं माचीस येऊन मुक्काम करून राहिले. हें वर्तमान छत्रपतींस कळलेवर जाधवराव यास भेटून बहुमान वस्त्रें भूषणें देऊन जयसिंगराव हा किताब दिल्हा. इकडे पादशहा यांणीं मनांत विस्मय केला कीं, "मराठी फौज बुडाली म्हणत होतों परंतु कायम दिसती. संभाजीचा कबिला रायगडीं ठेवून त्याचा धाकटा भाऊ पन्हाळ्यास राहून फौज जमवून आम्हांशीं लढाया देतो. तरी दुतर्फा यास पायबंद लावावा." म्हणोन रायगडास जुल्फकारखानाचे पुस्तपन्ह्यास[४] कांहीं फौज पाठविली, व कांहीं पन्हाळेकडे रवाना केली. हें वर्तमान राजाराम साहेबांस कळलें. नंतर पुन्हा फौज जमाकरून त्यांशीं लढाई द्यावी असा अवकाश पडेना. त्यांच्या फौजा येऊन ठायीं ठायीं दाखल जहाल्या. जुल्फकारखान यास पुस्तपन्ह्यास फौज पाठविली. रायगडास वेध अधिक लागला. तिकडेही फौजा रवाना केल्या."

पृ० २९ ओळ ३ 'पत्रें लेहून' याजपुढें "थोरले महाराजाजवळचा इतबारी बखू[५]ची हुजरे बहुत शहाणे यांजबरोबर पत्र देऊन सांगून पाठविलें" × × × × "परंतु मुहूर्त विचारण करण्यास ज्योतिषी कोणी नाहींत म्हणोन अमात्यांस [ रामचंद्रपंतांस ] आज्ञा जहाली. त्याजवरून त्यांणीं विनंती केली कीं, 'संगमेश्वरीं वे॥ बाळजोशी आहेत. यांजवर संभाजी महाराज यांचा लोभ होता. जोशीराव हे किताबत व पालखी देऊन जवळ ठेविले होते. धनसिंगराव जाधवराव यांसि रवाना केले ते समयीं मुहूर्त जोशीराव यांजकडूनच आणिला होता. त्या मुहूर्तास यशही आलें, आणि बहुत योग्यही आहेत.' असें म्हटल्यावरून त्यास आणवणेंविशीं आज्ञा जहाली. त्यावरून जोशीराव यांस आणवून वस्त्रें भूषणें देऊन बहुत सन्मान केला. त्यांचे विचारें मुहूर्ताचा निश्चय करून त्यांस बरोबर घेऊन निघाले. संताजी घोरपडे हे त्रिवर्ग बंधु व

---

४. पुस्त पन्हा=मदत, साहाय्य. ५ हा 'भक्ताजी' असावा.

विठोजी चव्हाण यांचे सलतनत सुद्धां रामचंद्रपंत अमात्य यांजपाशीं ठेवून धनाजी जाधवराव व खंडेराव दाभाडे व गायकवाड वंकी, प्रल्हाद निराजी व खंडो बल्लाळ चिटणीस, पारसनीस वगैरे. "

पृ० २९ ओळ १३ "तेथें महाराजांचे" इ० वाक्याबद्दल "तेथील मुक्का-मीं छत्रपती पाय धुतांना सेवक लोक एक पाणी घालतो, एक पाय धुतो, एक पुसतो हें तेथील लोकांनीं पाहून."

पृ० ३० ओ० ३–"राखेचा तोवरा दिला असतां ही" याजपुढें—— "आम्ही स्वच्छ यात्रेकरू म्हणोन पृथक् पृथक् माराहाण करून विचारीत असतांही सर्वांचें बोलणें सारखें. तेव्हां कचेरींत चौकशी करणार बोलले कीं."

पृ० ३० ओळ ९. "एकत्र झाले." शब्दांपुढें "नंतर बेंगरूळचें वर्तमान चिटणीस व पारसनीस यांसि महाराजांनीं विचारिलें. त्यांणीं झालेलें सविस्तर सांगितलें. तें ऐकून महाराज बहुत श्रमी झाले. या सर्वांनीं उत्तर केलें जे, 'स्वामी कृपेकरून मुक्त झालों आणि आलों. आतां श्रमी होऊं नये.' असें बहुत प्रकारें समाधान केलें."

पृ० ३० ओळ २६ "प्रांत हस्तगत झाला" याजपुढें "परंतु किल्ला हस्तगत न होय. सबब सरजेखान सरदार पाठवून पन्हाळा व पावनगड यास मोर्चे बसविले. परंतु कागलकर दोन्ही किल्यांवर होते त्यांणीं शर्तमर्दीनें दोन्ही लढविले. खालीं मोर्चे बंदीचे मनुष्यांचीं डोचकीं कापून आणून त्यांचा धबधबा रचून त्याजवर तोफ ठेऊन लढाई करावी. हें सर्जेखान याणें पाहून परम आश्चर्य करून पादशहाकडे सांगून पाठविलें. त्याजवरून खांसा स्वारी येऊन वेढा दिला. त्या काळीं रामचंद्रपंत याजकडून पुस्तपन्हा होईना. संताजी घोरपडे हे फौजबंद, त्यांजकडे पंतांनीं सांगून पाठविलें असतां तेही येऊन कुमक करीनात. अमात्यपंत यांस कागलकर यांणीं सांगून पाठविलें जे, 'पल्ला आपला पोंचत नाहीं. आमची तर लढाईची शर्थ जहाली. पुढें आमचा परिणाम काय?' यावरून पंतांनीं सांगून पाठविलें कीं, 'हरतऱ्हा करून आपला जीव वांचवा. किल्ला दिल्हयास चिंता नाहीं. बाजत बरसात[६] जहाल्यानंतर पुन्हा किल्ला घेण्यास येईल.' याप्रमाणें निरोप आल्यावर यांणीं संधान करावयाच्या पूर्वीं पादशहाकडून निरोप आला कीं, 'तुमचे लढाईची शर्त जहाली. निमकहलाल[७] अहांत. तुमच्या धन्याचा तुम्हांस पुस्तपन्हा होत नाहीं त्या अर्थीं तुम्ही दोन्ही किल्ले सरकारांत द्यावे. मागाल तें बक्षीस देतों.' याप्रमाणें पादशहाचा निरोप आलेला ऐकोन यांणीं मान्य करून पन्हाळा व पावनगड दोन्ही किल्ले

६. बाजत बरसात=प्रजन्यकाळा नंतर. ७. निमक हालल=स्वामिसेवेंत तत्पर.

पादशाहींत स्वाधीन केले. कागलकर हे येऊन पादशहास भेटले, त्यास बहुमान करून सर्जाराव हे कितावत देऊन कागल प्रांताची पूर्वी दे स म त होती ती करार करून दिल्ही. मशारनिलेनीं किल्ला स्वाधीन केला. तो बहुत मर्द मनुष्य म्हणोन पादशहांनीं आपणाजवळ ठेऊन घेतला. आपण पादशहापाशीं राहून आपले बंधु वगैरे मंडळीस घाटगे यांणीं चंदीस महाराजांकडे रवाना करून दिल्हें."

पृ० ३१ ओळ ४ "राखिते झाले" याजपुढें "कोठें मोंगलांचा लगट पडोन जबरी पडल्यास ती जागा टाकून द्यावी. ते गेल्यावर पुन्हा घ्यावी. असें महाराजांकडील लोक करीत गेले."

पृ० ३१ ओळ ११ "भीमा गंगामध्यें ‡ राहिले" याजपुढें "चंदी प्रांतीं राजाराम गेले ते फौजबंदी करून होते. संताजी घोरपडे हे तिघे बंधु अमात्याचे आज्ञेत असावे अशी छत्रपतींची आज्ञा असतां पन्हाळ्याचे वेळेस उपयोगी पडले नाहींत व हुकुमांत चालत नाहींत से डु र प्रांतीं झाडींत राहून तुंगभद्रापर्यंत, दंगा करून, गुतीचा किल्ला घेऊन कांहीं प्रांत ठाणीं घेऊन, तिकडेच राहिले. याविषयीं अमात्य यांणीं सांगून पाठविलें. घोरपडे न ऐकत म्हणोन सविस्तर हुजूर चंदीस विनंती लिहिली त्यावरून महाराजांची गैरमर्जी होऊन महादजीराव पानसंबळ यांसि शके १६१२ सेनापतीचें पद देऊन संताजी कडील पदाधिकार दूर केले म्हणोन पंतास लेहून, संताजी घोरपडे यांजकडे भक्तानी व बहिरजी हुजरे पाठवून शिक्केकटार घेऊन रामचंद्रपंत यांचे स्वाधिन केले. त्याजवरून संताजी घोरपडे पंतांकडे आले. 'तुम्ही आमचे भेटीस येऊं नये. जाधवराव यांसि सेनापती पद देत असतां आम्ही तुम्हांस पद देवविलें त्याचे तुम्ही उत्तीर्ण झालां. महाराजांकडे हुजूर जावें.' याजवरून घोरपडे महिना पंधरा दिवस राहून पंतांच्या भेटीचा प्रयत्न बहुत केला, परंतु पंत कांहीं भेट घेत नाहींत सबब महाराजांकडे चंदीस निघोन गेले. तेथें राहून मर्जी संपादण्याबद्दल सर्वत्रांबरोबर चाकरी करणें ती शर्तीची करूं लागले. उभयतां बंधु बहिरजी व मालोजी पंतांचे आज्ञेत राहून चाकरी करीत होते. त्या संधींत चंदीकडे पादशहाची फौज गेली त्यांचे तोंडावर धनाजी जाधवराव जयसिंगराव व संताजी घोरपडे वगैरे सरदार रवाना केले. यांची त्यांची लढाई होऊन पादशहाचे फौजेचा मोड झाला."

पृ० ३१ ओळ १९ "विशाळगड, रांगणा" याजपुढें "गगनगड बावडा" पृ० ३२ ओळ ११ "करूं लागले." याजपुढें "त्याच अन्वयें

पाटणकर पाटण खोऱ्यांत राहून कराड प्रांत व वाई प्रांत यांत चौथ सरदे-शमुखीचा अंमल घेऊं लागले."

२. आम्हांस ह्या दोन चरित्रांच्या ज्या प्रती उपलब्ध झाल्या त्यांची हकीगत थोडक्यांत देऊन हें प्रकरण आटोपितों.

[ अ ] साताऱ्याहून फ्रेंच कागदावर केलेल्या संभाजी महाराजांच्या चरित्राच्या दोन नकला मिळाल्या. ह्या सातारकर महाराज यांच्या प्रतीवरून तयार केलेल्या असाव्या. ह्या रा० कृ० वि० आचार्य व मु० ए० पळशे यांणीं पाठविल्या. त्यांवरूनच आम्ही हें चरित्र छापण्यास आरंभ केला. इतक्यांत

[ आ ] चिटणीस यांची प्रत उपलब्ध झाली. हें पुस्तक इंग्रजी बुकासारखें कातड्याच्या जाड पुठयानें बांधलेलें आहे. कागद घोंटीव जुन्नरी किंवा दौलताबादी असा आहे. ह्या पुस्तकाची १॥ फूट खाल वर अशी लांबी असून डावेकडून उजवेकडे ११॥ इंच रुंदी आहे. अक्षर दोन तीन प्रकारचें आहे, परंतु सुवाच्य आणि वळणशुद्ध असें आहे. यांत एकंदर ६७६ बंद म्हणजे १३५२ पृष्ठें आहेत. पृष्ठास ११ पासून १६ पर्यंत ओळी आहेत. पैकीं पहिले ११६ बंदांत राज्याभिषेक प्रकरण, सिंहासन प्रकरण, राजगुण प्रकरण, अमात्य व सेवक प्रकरण, अशीं सात प्रकरणें राजनीतीवर आहेत. नंतर ११७ बंदापासून महाराजांच्या वृत्तांतास आरंभ होतो. बंद ११७ तागाईत ३६८ पर्यंत शककर्ते शिवाजी महाराज छत्रपती यांचें सप्तप्रकरणात्मक चरित्र विस्तारें करून लिहिलें आहे. याच्याच पुढें उपदेश प्रकरण म्हणून आठवें आहे. ह्यांत रामदास व तुकाराम यांचा महाराजांशीं संवाद झाला व त्यांणीं उपदेश केला ह्याची हकीगत आहे. यांतील ४।५ प्रकरणें विविधज्ञानविस्तार ह्या मासिक पुस्तकांत छापून प्रसिद्ध झालीं आहेत. बाकीचींही विस्तारकर्ते लवकरच प्रसिद्ध करणार आहेत असें कळतें. ३६९ बंदापासून पुढें शंभुमहाराज, राजाराम महाराज, शाहूमहाराज इ० यांचीं अनुक्रमानें चरित्रें दिलीं आहेत व शेवटीं धाकटे शाहू यांचें चरित्र ६७६ व्या बंदावर संपविलें आहे. यांत थोरले राजाराम यांचें चरित्र दुबार लिहिलें गेलें आहे हें कसें झालें तें समजत नाहीं. ही प्रत रा० रा० खंडेरावजी चिटणीस, सातारकर यांजकडून मिळाली, हें पूर्वीं सांगितलें आहेच.

[ इ ] 'इंदुर प्रत' चिटणीस प्रतीच्या पाठीमागून आह्मांकडे आली. हिचीं कानड्याच्या पुठयानें बांधिलेलीं दोन पुस्तकें आहेत. प्रथम पुस्तकांत शककर्ते यांचा वृत्तांत आहे. हें पुस्तक आम्हांकडे पाठविल्यावर थोडेच दिवशीं रा० ब० नीलकंठराव कीर्तने यांणीं परत नेलें. तेव्हां त्याजबद्दल माहिती आ-

ह्मांस देतां येत नाहीं. दुसरें पुस्तक आम्हांपाशीं आहे. यांत संभाजी महाराज यांचे चरित्रापासून तों थेट धाकटे शाहूमहाराजांचे अखेरीपर्यंत वृत्तांत आहे. ही प्रत इंदुरकर किबे यांणीं कोल्हापुराहून तयार करवून नेली असें समजतें. ह्या दुसऱ्या पुस्तकाची उभी उंची १ फूट व आडवी रुंदी ८॥ इंच आहे. कागद पूर्तकाली जाड आहे. ह्याचे बंद ३०० म्ह० पृष्ठें ६०० आहेत. पहिलें पुस्तकही इतकेंच मोठें असावें असें वाटतें. तेंही सदरप्रमाणें पूर्तकाली कागदावर लिहिलेलें आहे असें स्मरतें. अक्षर एकच प्रकारचें शेवटपर्यंत आहे. ही प्रत कोल्हापुराहून 'राजाज्ञा' यांच्या प्रतीवरून केली असावी असें अनुमान हींतील राजाराम व शाहू महाराज यांचीं चरित्रें कोल्हापुराहून आलेल्या प्रतींशीं ताडून पाहतांना जो दोहींचा मेळ पडत गेला त्यावरून होतें. राजाराम महाराजांच्या चरित्रा संबंधी ह्या प्रतींतील मजकूर ज्यास्त खुलासेवार आहे, असें वर दिलेल्या ज्यास्त मजकुरावरून उघड दिसतें. ही प्रत आमचेकडे रा० ब० कीर्तने यांणीं पाठविली.

( ई ) राजाराम महाराजांच्या कारकीर्दीची एक त्रुटित बखर पुणें येथें उपलब्ध झाली. हिचा आरंभ शाबूद आहे. शेवट मुळींच नाहीं. हिचा व चिटणीस प्रतीचा मेळ बराच पडतो.

( उ ) कोल्हापुराहून रा० रा० विष्णुपंत वीरमाडकर यांणीं राजाराम महाराज यांचें चरित्र पाठविलें. ह्या प्रतीचे उभे खर्चीं बंद ४६ पाठपोट लिहिलेले आहेत. हिचा व 'इंदूर' प्रतीचा मेळ पडतो यावरून ह्या दोहींचें मूळ एकच असावें असें अनुमान होतें. ही शके १७८४ दुंदुभीनाम संवत्सरीं तयार केली गेली, असें तिच्या शेवटीं लिहिलें आहे.